मराठी

# बालभारती



इयत्ता सहावी

# भारताचे संविधान

## भाग ४ क

## नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.


(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

मंजुरी क्र. : जा.क्र. मराशैसंप्रप/अविवि/शिप्र/२०१५-१६/१६७३ दिनांक- ०६/०४/२०१६

मराठी

# बालभारती

इयत्ता सहावी




महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

AT24PV

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA App द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q. R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व प्रत्येक पाठामध्ये असलेल्या Q. R. Code द्वारे त्या पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृकश्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०१६
पाचवे पुनर्मुद्रण : २०२१

© **महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे – ४११ ००४.**

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**मराठी भाषा तज्ज्ञ समिती :**

श्री. नामदेव चं. कांबळे (अध्यक्ष)
फादर फ्रान्सिस दिब्रिटो (सदस्य)
डॉ. स्नेहा जोशी (सदस्य)
डॉ. रोहिणी गायकवाड (सदस्य)
डॉ. माधुरी जोशी (सदस्य)
श्री. अमर हबीब (सदस्य)
श्रीमती अर्चना नरसापूर (सदस्य)
श्रीमती सविता अनिल वायळ (सदस्य सचिव)

**मराठी भाषा अभ्यासगट सदस्य**

श्री. समाधान शिकेतोड
श्री. बापू शिरसाठ
श्रीमती प्रांजली जोशी
श्रीमती वैदेही तारे
श्री. मयुर लहाने
प्रा. विजय राठोड
डॉ. माधव बसवंते
श्री. देविदास तारू
श्री. संदीप रोकडे
श्रीमती स्मिता गालफाडे
डॉ. प्रमोद गारोडे
श्रीमती दीपाली पळशीकर

**प्रकाशक**
**विवेक उत्तम गोसावी**
नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई – २५.

**संयोजन** : श्रीमती सविता अनिल वायळ
विशेषाधिकारी, मराठी
श्रीमती उषादेवी प्रताप देशमुख
विषय सहायक, मराठी

**चित्रकार** : फारुख नदाफ

**मुखपृष्ठ** : रेश्मा बर्वे

**अक्षरजुळणी** : भाषा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**निर्मिती** : सच्चिदानंद आफळे, मुख्य निर्मिती अधिकारी
सचिन मेहता, निर्मिती अधिकारी
नितीन वाणी, सहायक निर्मिती अधिकारी

**कागद** : ७० जी.एस.एम. क्रिमवोव्ह

**मुद्रणादेश** : N/PB/2021-22/40,000

**मुद्रक** : M/S. SHREE SAMARTH QUALITY WORKS, NAVI MUMBAI

# भारताचे संविधान

## उद्‌देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्‌धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्‍वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्‌वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

# राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

# प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

**'राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५'** आणि **'बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम – २००९'** अनुसार महाराष्ट्र राज्यात '**प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम –२०१२**' तयार करण्यात आला. या शासनमान्य अभ्यासक्रमाची कार्यवाही २०१३–२०१४ या शालेय वर्षापासून क्रमश: सुरू झाली आहे. या शासनमान्य अभ्यासक्रमावर आधारित इयत्ता सहावी 'मराठी बालभारती' हे पाठ्यपुस्तक तयार करण्यात आले आहे. हे पाठ्यपुस्तक आपल्या हाती देताना आम्हांला आनंद वाटतो.

अध्ययन–अध्यापन प्रक्रिया बालकेंद्रित असावी, स्वयंअध्ययनावर भर दिला जावा, अध्ययन व अध्यापन प्रक्रिया आनंददायी व्हावी असा व्यापक दृष्टिकोन समोर ठेवून हे पुस्तक तयार केले आहे. प्राथमिक शिक्षणाच्या विविध टप्प्यांवर विद्यार्थ्यांनी नेमक्या कोणत्या क्षमता प्राप्त कराव्यात हे अध्ययन–अध्यापन करताना स्पष्ट व्हावे, त्यासाठी या पाठ्यपुस्तकात भाषाविषयक अध्ययन निष्पत्तींचा समावेश करण्यात आला आहे.

या वयोगटातील विद्यार्थ्यांच्या भावविश्वातील पाठ व कवितांचा समावेश पाठ्यपुस्तकात केलेला आहे. भाषिक कौशल्यांच्या विकासासाठी नावीन्यपूर्ण स्वाध्याय, उपक्रम व प्रकल्प दिलेले आहेत. 'शोध घेऊया, हे करून पाहा, खेळूया शब्दांशी, सारे हसूया, वाचा, ओळखा पाहू, विचार करून सांगूया, भाषेची गंमत पाहूया' या शीर्षकांखाली दिलेल्या मजकुरांतून विद्यार्थ्यांची निरीक्षणक्षमता, विचारक्षमता व कृतिशीलता यांस वाव दिला आहे. 'आपण समजून घेऊया' या शीर्षकाखाली व्याकरण घटकांची सोप्या पद्धतीने मांडणी केली आहे. विद्यार्थ्यांनी नवीन शब्द, वाक्प्रचार व म्हणी यांचा वापर सहजतेने करावा, तसेच त्यांच्यामध्ये व्याकरणविषयक जाण निर्माण व्हावी, म्हणून हे सर्व मनोरंजक व सोप्या पद्धतीने दिले आहे. 'कविता करूया' या शीर्षकाखाली प्रथमच शालेय विद्यार्थ्यांच्या कवितांना स्थान दिले आहे. महाराष्ट्रातील विविध बोलींचा परिचय व्हावा या दृष्टिकोनातून बोलीभाषेतील उताऱ्यांचा समावेश केला आहे. स्वच्छता, आपत्ती व्यवस्थापन यांसारख्या विषयांबाबत विचार करायला विद्यार्थी प्रवृत्त व्हावे, यासाठी पाठ्यपुस्तकात प्रसंगचित्रे दिली आहेत. चित्रांचे निरीक्षण, त्यांवर विचार, चर्चा व त्यासंबंधी स्वत:चे अनुभवकथन यांतून विद्यार्थ्यांमध्ये जाणीव–जागृती निर्माण होईल. विद्यार्थ्यांना स्वत:ची कल्पकता वापरून लेखन करता यावे, विचार व्यक्त करता यावे, यांसाठी वैविध्यपूर्ण प्रश्न व कृती पाठ्यपुस्तकात समाविष्ट केल्या आहेत. पाठ्यघटक कसे हाताळावे, याबाबत शिक्षकांना मार्गदर्शनपर सूचना अनेक ठिकाणी दिल्या आहेत.

मराठी भाषा तज्ज्ञ समिती, अभ्यासगट सदस्य आणि चित्रकार यांच्या आस्थापूर्वक परिश्रमांतून हे पुस्तक तयार झाले आहे. पाठ्यपुस्तक जास्तीत जास्त निर्दोष व दर्जेदार व्हावे, या दृष्टीने महाराष्ट्राच्या सर्व भागांतील निवडक शिक्षक, तसेच काही शिक्षणतज्ज्ञ व विषयतज्ज्ञ यांच्याकडून या पाठ्यपुस्तकाचे समीक्षण करण्यात आले. आलेल्या सूचना व अभिप्राय यांचा काळजीपूर्वक विचार करून या पुस्तकाला अंतिम स्वरूप देण्यात आले.

मराठी भाषा तज्ज्ञ समिती, अभ्यासगट सदस्य, निमंत्रित तज्ज्ञ, संबंधित समीक्षक व चित्रकार या सर्वांचे मंडळ मन:पूर्वक आभारी आहे. विद्यार्थी, शिक्षक व पालक या पुस्तकाचे स्वागत करतील, अशी आशा आहे.

(चं.रा.बोरकर)
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

पुणे
दिनांक : ८ एप्रिल, २०१६, गुढीपाडवा
भारतीय सौर : १९ चैत्र १९३८

# भाषाविषयक अध्ययन निष्पत्ती : प्रथम भाषा मराठी सहावी

| अध्ययन-अध्यापनाची प्रक्रिया | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|
| सर्व विद्यार्थ्यांना (वेगळ्या रूपात सक्षम मुलांसहित) व्यक्तिगत किंवा सामूहिक स्वरूपात प्रोत्साहन दिले जावे कारण त्यांना –<br>➢ आपल्या भाषेत बोलण्याची तसेच चर्चा करण्याची संधी दिली जावी.<br>➢ वापरल्या जाणाऱ्या भाषेच्या बारकाव्यांवर चर्चा करण्याची संधी दिली जावी.<br>➢ सक्रिय आणि जागरूक असण्यासाठी तयार केले जाणारे साहित्य (उदा., वर्तमानपत्र, पत्रिका, चित्रपट आणि दृकश्राव्य साहित्य इत्यादी.) पाहण्याची, ऐकण्याची, वाचण्याची, लिहिण्याची आणि चर्चा करण्याची संधी दिली जावी.<br>➢ गटात कार्य करताना आणि एकमेकांच्या कामांबाबत चर्चा करणे, मत देणे-घेणे, प्रश्न विचारण्याचे स्वातंत्र्य दिले जावे.<br>➢ मराठीबरोबरच आपल्या भाषेतील साहित्य वाचण्याची तसेच लिहिण्याची सुविधा आणि त्यावर चर्चा करण्याचे स्वातंत्र्य दिले जावे.<br>➢ आपल्या परिवाराशी आणि समाजाशी संबंधित विविध साहित्यांचे वाचन आणि त्यावर चर्चा करण्याची संधी दिली जावी.<br>➢ आपली भाषा वाचत असताना लिहिण्यासंदर्भात क्रियाही आयोजित कराव्यात. उदा., शब्दखेळ, शब्दकोडी.<br>➢ मराठी भाषेमधील संदर्भाला अनुसरून भाषेचे विश्लेषण (व्याकरण, वाक्यरचना, विरामचिन्हे इत्यादी.) करण्याची संधी दिली जावी.<br>➢ कल्पनाशक्ती आणि सृजनशीलतेचा विकास करण्याच्या क्रिया उदा., अभिनय, मूक अभिनय, कविता, पाठ, सृजनात्मक लेख, विविध स्थितींमधील संवाद इत्यादींचे आयोजन केले जावे आणि त्याच्या तयारीशी संबंधित लिखित साहित्य आणि अहवाल लेखनाची संधी दिली जावी.<br>➢ साहित्य आणि साहित्यिक तत्त्वांची समज वाढण्याची संधी दिली जावी.<br>➢ शब्दकोशाचा वापर करण्यासाठी प्रोत्साहन दिले जावे. | 06.01.01 विविध प्रकारचे आवाज (उदा., पाऊस, वारा, रेल्वे, बस, फेरीवाला इत्यादी.) ऐकण्याचा अनुभव, विविध पदार्थांच्या चवी इत्यादींबाबतचे अनुभव स्वत:च्या शब्दांत सांगतात.<br>06.01.02 पाहिलेल्या व ऐकलेल्या घटना (उदा., स्थानिक सामाजिक घटना, कार्यक्रम) यांविषयी न अडखळता बोलतात, प्रश्न विचारतात, मत मांडतात.<br>06.01.03 पाहिलेल्या, ऐकलेल्या गोष्टी/घटना/मुद्दे स्वत:च्या भाषेत कथन करतात, लिहितात. उदा., अपूर्ण गोष्ट पूर्ण करणे, प्रसंगाचे वर्णन करणे.<br>06.01.04 रेडिओ, दूरदर्शन, वर्तमानपत्रे, इंटरनेट यांद्वारे पाहिलेल्या, ऐकलेल्या घटना स्वत:च्या शब्दांत मांडतात.<br>06.01.05 भिन्न वेळी आणि भिन्न विषयासंबंधी इतरांनी सांगितलेल्या गोष्टी समजून घेतात, स्वत:च्या भाषेत सांगतात.<br>06.01.06 आपल्या परिसरातील विभिन्न लोककथा आणि लोकगीते, बोलीभाषा जाणून घेऊन त्यांबद्दल चर्चा करतात, माहिती मिळवतात, आस्वाद घेतात, संग्रह करतात.<br>06.01.07 स्वत:पेक्षा भिन्न असलेल्या भाषा, खाण्यापिण्याच्या सवयी, राहण्याच्या सवयी यांतील विविधतेविषयी चर्चा करतात.<br>06.01.08 पाठ्यघटकांचे सूक्ष्म वाचन करून त्यातील प्रमुख मुद्द्यांचा शोध घेतात, त्यातील वैशिष्ट्ये शोधतात, अनुमान व निष्कर्ष काढतात.<br>06.01.09 मराठी भाषेतील विविध साहित्यप्रकार, बातम्या, वृत्तपत्रे, मासिके, इंटरनेटवर प्रसिद्ध होणारे साहित्य इत्यादी समजपूर्वक वाचून स्वत:ची आवडनिवड सांगतात, मत देतात, सूचना करतात.<br>06.01.10 मराठी भाषेची वैशिष्ट्ये जाणून घेऊन त्याचा आनंद घेतात. उदा., कवितेची गेयता, कथेतील/निबंधातील वाक्प्रचार, म्हणी, सुविचार इत्यादी.<br>06.01.11 विभिन्न साहित्यप्रकारांत लिहिलेल्या लेखनसाहित्याचे आरोह-अवरोहासह व योग्य गतीने वाचन करतात.<br>06.01.12 नव्या शब्दांविषयी जिज्ञासा व्यक्त करतात. त्या शब्दांचे अर्थ जाणून घेण्यासाठी शब्दकोशाचा वापर करतात, स्वत:चा शब्दकोश तयार करण्याचा प्रयत्न करतात.<br>06.01.13 विविध कला (उदा., हस्तकला, वास्तुकला, कृषिकला, नृत्यकला, चित्रकला) यांसंबंधी जिज्ञासा व्यक्त करतात आणि त्याचा आनंद घेतात.<br>06.01.14 इतरांनी सांगितलेले व अनुभवलेले अनुभव आवश्यकतेनुसार लिहितात. उदा., चौक, बसस्थानक, रेल्वेस्थानक इत्यादी. सार्वजनिक ठिकाणांवरील अनुभव. |

- सांस्कृतिक कार्यक्रमांच्या निमित्ताने म्हटल्या जाणाऱ्या विविध लोकगीतांचा संग्रह करणे तसेच त्यांचे तालासुरात सादरीकरण करण्याची संधी उपलब्ध करून दिली जावी.
- भाषा समृद्धीसाठी बालसाहित्याबरोबरच इतर साहित्याचा संग्रह करणे व त्याचे सादरीकरण करण्याची संधी उपलब्ध करून दिली जावी.
- परिपाठ व इतर कार्यक्रमांतून सुविचार, कथा, विविध विषय मांडण्याची संधी उपलब्ध करून दिली जावी.
- परिसरातील बोलीभाषांची माहिती मिळवून त्यावर चर्चा करण्याची संधी दिली जावी.
- परिसरातील विविध ठिकाणे, भेटणाऱ्या विविध व्यक्ती यांबाबत आपले विचार मांडण्याची संधी दिली जावी.

06.01.15 सार्वजनिक ठिकाणच्या सूचना समजपूर्वक वाचतात.

06.01.16 विविध विषयांसाठी, विविध उद्देशांसाठी लेखन करताना विरामचिन्हांचा योग्य वापर करतात.

06.01.17 वेगवेगळ्या प्रसंगी, वेगवेगळ्या उद्देशांनुसार लिहिताना शब्द, शब्दसमूह, वाक्य, वाक्प्रचार, म्हणी यांचा योग्य वापर करतात.

06.01.18 पाठ्यविषय (पाठ, कविता, विनोद, गाणी इत्यादी.) लक्षपूर्वक ऐकून त्यांचा आनंद घेतात. त्यांच्या ध्वनिफिती समजपूर्वक ऐकतात.

06.01.19 कविता, गाणी अभिनयासह व योग्य आरोह-अवरोहासह आनंददायी पद्धतीने म्हणतात.

06.01.20 घर व परिसरातील मोठ्या माणसांच्या संवादात, चर्चेत सहभाग घेतात, स्वत:चे विचार स्पष्टपणे मांडतात.

06.01.21 शाळेतील विविध सहशालेय उपक्रमांत सहभागी होतात.

06.01.22 पाठ्यपुस्तक व पाठ्येतर साहित्याचे अर्थानुसार समजपूर्वक प्रकट वाचन करतात. दिलेल्या वेळेत योग्य गतीने समजपूर्वक मूकवाचन करतात.

06.01.23 वर्तमानपत्रे, मासिके व पुस्तके यांतील बालसाहित्याचे समजपूर्वक वाचन करून आस्वाद घेतात, संग्रह करतात.

06.01.24 परिच्छेदाचे अचूक अनुलेखन व श्रुतलेखन करतात.

06.01.25 आपल्या परिसरातील व्यक्तीचे शब्दचित्र रेखाटतात.

06.01.26 दिलेल्या उताऱ्याचे समजपूर्वक वाचन करून त्याचे परिच्छेद करतात, तसेच त्यास योग्य शीर्षक देतात.

06.01.27 संग्रहित साहित्यातील सुविचार, कथा, विविध विषय इत्यादी परिपाठात सादर करतात.

06.01.28 व्याकरण घटकांची माहिती घेतात व त्यांचा लेखनात योग्य वापर करतात. उदा., नामांचे प्रकार, सर्वनामांचे प्रकार, विशेषण व विशेष्य, विशेषणांचे प्रकार, क्रियापदांचे प्रकार, शुद्धलेखनाचे नियम इत्यादी.

## संकेतस्थळे

http://www.bookganga.com
http://www.marathimati.com
https://marathikavita.co.in
https://marathikavitaa.wordpress.com
http://www.warli.in
http://www.marathimati.com/maharashtra/travel/forts
https://www.maharashtratourism.gov.in/treasures/forts
http://www.ndmindia.nic.in
http://prabodhininashik.in/index.php/presentations/77-disaster-management
http://saneguruji.net

**चौकटीत दिलेल्या संकेतस्थळांचा व लिंक्सचा शिक्षकांनी अध्यापनात संदर्भ म्हणून वापर करावा.**

# अनुक्रमणिका


## भाग – १

| अ.क्र. | पाठ/कविता, लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|
| १. | बलसागर भारत होवो (गीत)<br>– साने गुरुजी | १ |
| २. | सायकल म्हणते, मी आहे ना! | २ |
| ३. | डॉ. कलाम यांचे बालपण<br>– डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम | ७ |
| ४. | गवतफुला रे! गवतफुला! (कविता)<br>– इंदिरा संत | १२ |
| ५. | बाकी वीस रुपयांचं काय?<br>– बाबाराव मुसळे | १५ |
| ६. | पण थोडा उशीर झाला...<br>– संदीप हरी नाझरे | २१ |
| ७. | आपले परमवीर | २४ |

## भाग – २

| अ.क्र. | पाठ/कविता, लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|
| ८. | माय (कविता)<br>– स.ग. पाचपोळ | २८ |
| ९. | वारली चित्रकला<br>– डॉ. गोविंद गारे | ३१ |
| १०. | सुगंधी सृष्टी<br>– ना.ग. गोरे | ३६ |
| ११. | माझ्या आज्यानं पंज्यानं (कविता)<br>– शंकर अभिमान कसबे | ४२ |
| १२. | मला मोठ्ठं व्हायचंय!<br>– प्रियंवदा करंडे | ४६ |
| १३. | आपली सुरक्षा, आपले उपाय! | ४९ |

## भाग – ३

| अ.क्र. | पाठ/कविता, लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|
| १४. | आतां उजाडेल! (कविता)<br>– मंगेश पाडगांवकर | ५३ |
| १५. | बालसभा | ५६ |
| १६. | सफर मेट्रोची<br>– क्रांती गोडबोले – पाटील | ६१ |
| १७. | दुखणं बोटभर<br>– डॉ. चित्रा सोहनी | ६५ |
| १८. | बहुमोल जीवन (कविता)<br>– रमण रणदिवे | ७० |
| १९. | मले बाजाराला जायाचं बाई!<br>– प्रभा र. बैकर | ७३ |

## भाग – ४

| अ.क्र. | पाठ/कविता, लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|
| २०. | ओळख थोरांची<br>भाग – १. – संजय दुधाणे<br>भाग – २. – – | ७९ |
| २१. | या काळाच्या भाळावरती (कविता)<br>– उत्तम कोळगावकर | ८१ |
| २२. | वडिलांस पत्र | ८५ |
| २३. | परिवर्तन विचारांचे | ९१ |
| २४. | रोजनिशी | ९४ |
| २५. | नवा पैलू<br>– प्रतिभा पानट | ९७ |
| २६. | संतवाणी<br>– संत बहिणाबाई<br>– संत निर्मळा<br>– फादर थॉमस स्टीफन्स | १०१ |

# १ बलसागर भारत होवो

भाग – १

● ऐका व म्हणा.

बलसागर भारत होवो विश्वात शोभुनी राहो ।।धृ।।

हे कंकण करि बांधियले,
जनसेवे जीवन दिधले,
राष्ट्रार्थ प्राण हे उरले,
मी सिद्ध मरायाला हो । बलसागर.... ।।१।।


वैभवी देश चढवीन,
सर्वस्व त्यास अर्पीन,
हा तिमिर घोर संहारिन,
या बंधु सहाय्याला हो । बलसागर .... ।।२।।

हातात हात घेऊन,
हृदयास हृदय जोडून,
ऐक्याचा मंत्र जपून,
या कार्य करायाला हो । बलसागर .... ।।३।।

करि दिव्य पताका घेऊ,
प्रिय भारत गीते गाऊ,
विश्वात पराक्रम दावू,
ही माय निजपदा लाहो । बलसागर .... ।।४।।

या उठा करू हो शर्थ,
संपादु दिव्य पुरुषार्थ,
हे जीवन ना तरि व्यर्थ,
भाग्यसूर्य तळपत राहो । बलसागर .... ।।५।।

ही माय थोर होईल,
वैभवे दिव्य शोभेल,
जगतास शांति देईल,
तो सोन्याचा दिन येवो । बलसागर .... ।।६।।



**साने गुरुजी**–(१८९९–१९५०) साने गुरुजींनी कथा, कविता, कादंबऱ्या असे विपुल ललित लेखन, तसेच वैचारिक लेखन केलेले आहे. 'श्यामची आई', 'धडपडणारी मुले', 'भारतीय संस्कृती', 'गोड गोष्टी', 'सुंदर पत्रे' इत्यादी त्यांची पुस्तके प्रसिद्ध आहेत. हे गीत 'स्फूर्तिगीते' या पुस्तकातून घेतले आहे.

पराक्रम, ऐक्य, सेवा, त्याग आणि देशभक्ती यांच्यामधून आपला भारत देश अधिक शक्तिशाली व्हावा अशी अपेक्षा साने गुरुजींनी या समूहगीतात व्यक्त केली आहे.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून समूहगीत तालासुरात म्हणून घ्यावे. समूहगीतांच्या ध्वनिफिती ऐकवाव्या.

# २ सायकल म्हणते, मी आहे ना!

लहानांपासून मोठ्यांपर्यंत सहज वापरता येणारे वाहन म्हणजे सायकल. पर्यावरण व आरोग्याच्या दृष्टीने हितकारक, कमी खर्चिक, वापरण्यात सहजता असलेली सायकल स्वतः आपली माहिती या पाठातून सांगत आहे. हा एक आत्मकथनात्मक पाठ आहे.

- खालील चित्रे पाहा. ज्या वाहनांनी तुम्ही प्रवास केला आहे, त्यापुढे दिलेल्या चौकटीत ✓ अशी खूण करा.

 ☐  ☐

 ☐  ☐

 ☐  ☐

 ☐  ☐  ☐

मी आहे सायकल! काही लोक मला दुचाकीही म्हणतात.




तसं म्हटलं तर माझा जन्म १६९० चा. फ्रान्स देशातील एम्. डी. सिव्हर्क हे माझे जन्मदाते. १८७६ साली एच्. जे. लॉसन यांनी मला गती यावी, म्हणून पेडलला साखळीची दंतबकडी बसवली; पण मला खरा वेग आला तो रबरी टायरमुळे. १८८७ साली जॉन बॉइड डनलॉप यांनी ते शोधून काढले होते. पहिली दोनशे वर्षे मी रखडत चालले; पण पुढची शंभर-दीडशे वर्षे मी कधी थांबले नाही.

माझा प्रचार-प्रसार आणि वापर खूप मोठ्या प्रमाणात झाला. जगातील असा एकही देश नाही, की जेथे माझा वापर होत नाही. लहान मुलांचे पहिले वाहन खेळण्यातला लाकडी घोडा असेल; पण दुसरे वाहन मीच आहे. आई-वडील आपल्या मुलांना सायकल हमखास आणून देतात. का माहीत आहे? एक तर किंमत माफक आणि अपघाताची शक्यता एकदम कमी! तुम्ही त्यावरून पडलात तरी खरचटेल, थोडीशी दुखापत होईल, अन् ती लगेच बरी होईल, मात्र तुम्ही त्यातून धडा शिकाल. एकदा का तुम्हांला आत्मविश्वास आला, की मग तुमची माझी संगत कायमची जुळते.

आई तुम्हांला म्हणते, 'जा दुकानातून साबण घेऊन ये.' तुम्ही कंटाळा करत नाही. मला बाहेर काढता अन् ट्रिंग ट्रिंग करत माझ्यावर स्वार होऊन दुकानात जाता. साबण आणता, कधी भाजीपाला, कधी आजोबांच्या औषधांच्या गोळ्या तर कधी दूध आणता. घरात मी असले, की अशी छोटी-मोठी कामे कशी पटापट होतात, नाही का?

कार-बाइक चालवायची असेल, तर त्यासाठी खास चालक परवाना काढावा लागतो. माझ्यासाठी त्याची मुळीच गरज नाही. लहान मुला-मुलींपासून आजी-आजोबांपर्यंत कोणीही मला चालवू शकतं अन् कधी आडरस्त्याला पंक्चर झालेच, तर मला हातांत धरून आणायला काही अवघड नाही, कारण मी आहे सडपातळ आणि हलकीफुलकी. कार आणि बाइकचा वेग माझ्यापेक्षा जास्त आहे हे मान्य. खूप लांब जायचं असेल किंवा काही तातडीचे काम असेल, तर त्यांचा वापर जरूर करावा; पण शाळेला, बाजाराला, ऑफिसला जायचं असेल तर एवढ्या वेगाची काय गरज? सरळ माझ्यावर स्वार व्हा आणि कमी अंतरावरचा प्रवास सुखद करा.



मी तुमच्यासाठी दोन दृष्टींनी लाभदायक आहे, वैयक्तिक आणि सामाजिक! कसे ते सांगते. हे पाहा, तुम्ही रोज मला नियमितपणे चालवलं तर तुम्हांला वेगळा व्यायाम करण्याची गरज पडणार नाही. घाम येईपर्यंत मला चालवल्यानं तुमची फुप्फुसे अधिक कार्यक्षम होतात, मांसपेशी तंदुरुस्त राहतात. घाम निघाल्याने जादा मेद जळून जातो व प्रतिकारशक्ती वाढते आणि तुमच्या पायांचे स्नायू बळकट होतात. हा झाला आरोग्याचा फायदा. माझी किंमत तशी माफकच, त्यामुळे तुमचे पैसे वाचतात. माझ्या दुरुस्तीचा खर्चही फार होत नाही. मला पेट्रोल, डिझेल लागत नाही. त्यातूनही पैसे वाचतात. शिवाय इंधन बचतही होते. माझ्यासाठी पार्किंगला फारशी अडचण येत नाही. या वैयक्तिक लाभांबरोबर मी सामाजिक व राष्ट्रीय लाभांनाही हातभार लावते. तो कसा हे ऐकायचंय? आपल्या देशाला पेट्रोल, डिझेल, रॉकेल परदेशातून विकत घ्यावे लागते, त्यामुळे आपले चलन परदेशात जाते. ते वाचवायला हवे.

वाहनांची संख्या वाढली, की वायू प्रदूषण वाढते. वाहतूक कोंडी होते. मोठ्या शहरात ह्या समस्या आता जीवघेण्या ठरत आहेत. तुम्ही सगळ्यांनी सावध व्हायला पाहिजे. पर्याय नसता तर गोष्ट वेगळी; पण मी आहे ना त्याला पर्याय! प्रदूषण टाळण्यासाठी वाहतूक क्षेत्रात माझा वापर जगभर होत आहे. पॅरिससारख्या अनेक शहरांत आज हजारो लोक आनंदाने माझा वापर करतात.

अरे हो, मी आता बरीच आधुनिक झालेय बरं. वेगवेगळ्या रूपांत मी तुम्हांला भेटू शकते. मुळातली मी बिनगिअरची. आता मला गिअरपण लागले. शर्यतीसाठी माझी बांधणी वेगळी असते अन् पर्यटनासाठी वेगळी. तुमची जशी आवड तशी करा माझी निवड! चला तर मग धूम ठोकूया!

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांच्या अनुभवविश्वातील वस्तूंवर आत्मकथनात्मक लेखन करण्यास विद्यार्थ्यांना प्रेरित करावे.

## स्वाध्याय



**प्र. १. चार–पाच वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) मुले सायकलचा वापर कशाकशासाठी करतात?

(आ) सायकल चालवणाऱ्याला वेगळा व्यायाम करण्याची गरज पडणार नाही असे का म्हटले आहे?

(इ) सायकलच्या रूपात कसा कसा बदल होत गेला?

**प्र. २. तुमच्या शब्दांत उत्तरे लिहा.**

(अ) आठवड्यातून एक दिवस स्वतःचे वाहन न वापरता, सार्वजनिक वाहनानेच प्रवास करायचा असे सर्वांनी ठरवले, तर कोणकोणते फायदे होतील?

(आ) तुमच्या कुटुंबातील, परिसरातील व्यक्तींनी सायकलचा वापर करावा यासाठी तुम्ही कोणकोणते प्रयत्न कराल ?

**प्र. ३. खालील आकृतीत दिलेल्या मुद्द्यांप्रमाणे सायकल चालवण्याचे फायदे लिहा.**




**प्र. ४. सायकलचे निरीक्षण करा व तिच्या भागांची नावे लिहा.**

**प्र. ५. सायकल शिकताना तुम्हांला आलेले अनुभव आठ ते दहा वाक्यांत लिहा.**

**प्र. ६. संगणक तुमच्याशी बोलू लागला तर.... कल्पना करा व लिहा.**

**प्र. ७. सायकल व मोटारसायकल यांचा संवाद आठ ते दहा ओळींत लिहा.**

### खेळूया शब्दांशी.

**(अ) खालील शब्दांचे अर्थ समजून घ्या.**

(अ) प्रचार व प्रसार (आ) विश्वास व आत्मविश्वास

**(आ) खालील वाक्प्रचारांचा वाक्यांत उपयोग करा.**

(अ) रखडत चालणे (आ) धडा शिकणे (इ) हातभार लावणे

**(इ) हलकीफुलकी म्हणजे खूप हलकी, तसे खालील शब्दांचे अर्थ लिहा.**

(अ) कधीमधी (इ) धामधूम (उ) साधेसुधे

(आ) अवतीभवती (ई) फेरफटका

**(ई) 'आडरस्ता' यासारखे आणखी शब्द लिहा.**

**उपक्रम :** तुमच्या गावातील सायकल दुरुस्ती करणाऱ्या व्यक्तीची भेट घ्या. सायकल दुरुस्तीच्या विविध कामांबाबत त्या व्यक्तीकडून माहिती मिळवा.

## आपण समजून घेऊया.

वाक्य हे शब्दांचे बनलेले असते. शब्दांची कार्ये विविध असतात. त्यांच्या विविध कार्यांवरून त्यांना वेगवेगळी नावे देण्यात आली आहेत. त्यांना शब्दांच्या जाती म्हणतात. वाक्य होण्यासाठी शब्दांच्या रूपात आपण कधी कधी बदल करतो. काही शब्दांच्या रूपात बदल होतो, तर काही शब्द मुळीच बदलत नाहीत. ज्या शब्दांमध्ये बदल होतो ते 'विकारी किंवा सव्यय शब्द', तर ज्या शब्दांमध्ये बदल होत नाही ते 'अविकारी किंवा अव्यय शब्द' होत. खालील तक्त्याचे निरीक्षण करा.

**शब्दांच्या जाती**

- **विकारी शब्द (सव्यय)**
  - नाम
  - सर्वनाम
  - विशेषण
  - क्रियापद
- **अविकारी शब्द (अव्यय)**
  - क्रियाविशेषण अव्यय
  - शब्दयोगी अव्यय
  - उभयान्वयी अव्यय
  - केवलप्रयोगी अव्यय

मागील इयत्तेत आपण नाम, सर्वनाम, विशेषण व क्रियापद या विकारी शब्दांची माहिती घेतली आहे. आता आपण त्यांचे प्रकार पाहणार आहोत.

- **खालील वाक्य वाचा.**

माधव आणि सरिता रस्त्याने खोडकरपणा न करता शाळेतून घरी परतले.

वरील वाक्यांत सहा नामे आली आहेत. ती नामे लिहा.

तुम्ही वर लिहिलेली नामे एकाच प्रकारची नाहीत. त्यांमध्ये व्यक्तींची नावे, वस्तूंची नावे व मनातील भाव दर्शवणारे शब्द आलेले आहेत. अशा विविध प्रकारच्या नामांवरून नामांचे तीन प्रकार पडतात.

**नामांचे प्रकार**

- सामान्यनाम
- विशेषनाम
- भाववाचकनाम

- **खालील यादी पूर्ण करा.**

१. व्यक्तींची नावे : ........................ ३. नद्यांची नावे : ........................

२. गावांची नावे : ........................ ४. पर्वतांची नावे : ........................

तुम्ही वर लिहिलेली सर्व नावे विशेषनामे आहेत, कारण ही नावे आपण ठरावीक वस्तू किंवा व्यक्तींना दिलेली नावे आहेत. त्यामुळे विशेषनामातून विशिष्ट वस्तू किंवा व्यक्तीचाच आपल्याला बोध होतो. व्यक्ती, गाव, नदी, पर्वत हे सर्व शब्द सामान्यनामे आहेत. कारण या शब्दांवरून ठरावीक वस्तू किंवा व्यक्तीचा बोध होत नाही, तर त्या प्रकारातील किंवा जातीतील सर्व वस्तूंचा, व्यक्तींचा बोध होतो. त्यांच्यात समान गुणधर्म, सारखेपणा जाणवतो.

- **खालील नामांचे दिलेल्या सारणीमध्ये योग्य वर्गीकरण करा.**

सतलज, बाग, कविता, लाडू, आंबेगाव, शाळा, कीटक, झेंडा, लाकूड, प्राजक्ता, मराठी, आई, कापड, बंडू, सह्याद्री.

| | |
|---|---|
| **सामान्यनाम** | |
| **विशेषनाम** | |

- **खालील वाक्यांतील अधोरेखित शब्द पाहा.**

१. मला सशाची चपळाई आवडली.

२. त्याची आई माझ्याशी आपुलकीने बोलली.

३. नीताच्या आवाजात गोडवा आहे.

४. कोणालाच गुलामगिरीत राहणे पसंत नसते.

वरील अधोरेखित शब्द भाववाचकनामे आहेत. हे शब्द वस्तू किंवा प्राण्यांची नावे नाहीत. भाववाचक नामांतून आपल्याला व्यक्ती, वस्तू, पदार्थ यांच्यातील भाव, गुणधर्म व स्वभाववैशिष्ट्ये यांचा बोध होतो. त्या शब्दांतील भाव समजून घ्यावा लागतो. तो दृश्य स्वरूपात नसतो.

- **खालील उतारा वाचा. त्यातील घटना क्रमाने सांगा.**

मे महिन्याचा तिसरा आठवडा असावा. घरात बसवत नव्हते. प्रचंड उकाडा होता. शरीराची लाही लाही होत होती. सारखे पाणी प्यावेसे वाटत होते. उन्हाच्या तीव्रतेमुळे आकाशात पक्षीही फिरकेनासे झाले होते. सर्वत्र शुकशुकाट होता. सूर्य पश्चिमेकडे हळूहळू कलू लागला. उन्हाच्या झळा कमी होऊ लागल्या. अचानक ढगांनी आकाशात गर्दी केली. जोराचे वारे वाहू लागले. झाडांची गळलेली पाने, कचरा, माती उडू लागली. गोलगोल फिरू लागली. वाऱ्याचे भोवरे तयार झाले. मी हे सगळे खिडकीतून पाहत होतो. सगळीकडे इतका धुराळा उडत होता, की बाहेरचे काही दिसत नव्हते.

अचानक विजा चमकू लागल्या. ढग एकमेकांवर आपटू लागले. विजांचा थयथयाट, ढगांचा गडगडाट अन् घोंगावणारा भयंकर वारा, वातावरण भयावह झाले. त्यात पावसाचे टपोरे थेंब घरांच्या कौलांवर, पत्र्यांवर आपटू लागले. निसर्गाचे हे रौद्र रूप पाहून मी हबकून गेलो. अचानक माझे लक्ष आकाशाकडे गेले. कोणाच्यातरी घराचे पत्रे चटईसारखे उडत आमच्या घराच्या दिशेने येत होते. मी खूप घाबरलो. तेवढ्यात ते उडत आलेले पत्रे आमच्या घराच्या मागच्या बाजूला कोसळले. घरातील माणसे जोरात ओरडली. लहान मुले घाबरून रडू लागली. सगळे घाबरेघुबरे होऊन एका जागेवर खिळल्यासारखी बसून राहिली. हळूहळू वाऱ्याचा वेग मंदावला. पाऊस थांबला. आकाशही निरभ्र होऊ लागले. सगळे घराबाहेर पडू लागले. दीड-दोन तास निसर्गाच्या चाललेल्या या भयंकर खेळाविषयी जो तो आपल्या भावना व्यक्त करू लागला.

**शिक्षकांसाठी :** नामांच्या विविध प्रकारांची उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांकडून उपयोजनात्मक सराव करून घ्यावा. वरील उताऱ्याचे स्वत: किंवा विद्यार्थ्यांकडून प्रकट वाचन करून घ्यावे. उताऱ्यातील घटना क्रमाने सांगण्याची सूचना द्यावी. घटनाक्रम सांगताना योग्य ते मार्गदर्शन करावे.

# ३ डॉ. कलाम यांचे बालपण

**डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम** –(१९३१–२०१५) विख्यात अणुशास्त्रज्ञ, भारताचे माजी राष्ट्रपती, मनस्वी वृक्षप्रेमी, हाडाचे शिक्षक आणि बालकप्रेमी. 'विंग्ज ऑफ फायर', 'इंडिया २०२० ए व्हिजन फॉर द न्यू मिलेनियम' आणि 'इग्नायटेड माइंड्स' इत्यादी पुस्तके प्रसिद्ध. 'पद्मभूषण', 'पद्मविभूषण' आणि 'भारतरत्न' पुरस्कारांनी सन्मानित. डॉ. कलाम यांच्या 'विंग्ज ऑफ फायर' या आत्मचरित्राचा माधुरी शानभाग यांनी 'अग्निपंख' या नावाने अनुवादित केलेल्या पुस्तकातून खालील प्रसंग घेतले आहेत.

प्रतिकूल परिस्थितीवर मात करत शिकण्याची जिद्द, त्यांच्या जीवनावर आई-वडिलांचा पडलेला प्रभाव आणि बहीण-भाऊ यांचा सहवास यांतून डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या बालपणीच्या जडणघडणीचे चित्रण या पाठातून केलेले आहे.



- तुम्हांला वाचन करायला आवडते का?
- तुम्ही कोणकोणती पुस्तके वाचली आहेत?
- त्यांतील कोणते पुस्तक तुम्हांला सर्वांत जास्त आवडले? का?
- तुम्हांला आवडलेल्या पुस्तकातील चार वाक्ये लिहा.



माझ्या बालपणीच्या जगात पुस्तकं म्हणजे माझ्यासाठी एक दुर्मीळ वस्तू होती. आमच्या गावात एस.टी.आर. माणिकम नावाचे एक क्रांतिकारक राष्ट्रभक्त राहत होते. त्यांच्याकडे पुस्तकांचा बऱ्यापैकी संग्रह होता. त्यांनी मला पुस्तके वाचण्यासाठी सदैव उत्तेजन दिले. मीही मिळेल ते वाचत गेलो. पुस्तके मागण्यासाठी मी त्यांच्या घरी धाव घेत असे.

माझ्या लहानपणी शमसुद्दीन नावाच्या माझ्या एका दूरच्या भावाचा माझ्यावर बराच प्रभाव होता. रामेश्वरममध्ये येणाऱ्या वर्तमानपत्रांचा तो एकुलता एक वितरक होता. रोज सकाळच्या रेल्वेगाडीने 'पंबन' गावाहून वृत्तपत्रांचे गठ्ठे येत. गावातल्या हजारभर सुशिक्षितांच्या वाचनाची गरज भागवणाऱ्या शमसुद्दीनचा व्यवसाय म्हणजे एकखांबी तंबू होता. स्वातंत्र्याच्या चळवळीची वाटचाल ग्रामस्थांना समजणे हे महत्त्वाचे कार्य त्यातून साधत असे. कुणाला भविष्य जाणून घेण्यात रस असे, तर कुणी चेन्नईच्या (मद्रास) बाजारपेठेतले सोन्याचांदीचे भाव समजण्यासाठी उत्सुक असत. थोडेजण जिज्ञासूवृत्तीने हिटलर, महात्मा गांधी आणि बॅरिस्टर जीनांबद्दल गांभीर्याने चर्चा करत; पण झाडून सर्वजणांना पेरियार ई. व्ही. रामस्वामी यांच्या चळवळीबद्दल जाणून घेण्यात रस होता. 'दिनमणी' हे त्या वेळचे सर्वांत लोकप्रिय 'तमिळ' वर्तमानपत्र होते. छापलेले शब्द त्यावेळी मला वाचायला येत नसत. त्यातील चित्रांकडे बघून मी समाधान मानत असे. शमसुद्दीन आपल्या गिऱ्हाइकांना पेपरचा अंक वाटण्यापूर्वी मी त्यातील चित्रे बघून घेत असे.

मी आठ वर्षांचा असताना सन १९३९ मध्ये दुसरे महायुद्ध पेटले. काय कारण असेल ठाऊक नाही; पण त्या सुमारास बाजारात चिंचोक्यांना अचानक भरपूर मागणी आली. मी चिंचोके गोळा करून मशिदीजवळच्या एका दुकानात देत असे आणि अख्खा

एक आणा कमावत असे. माझ्या वडिलांनी लाकडी नौका बांधायचा व्यवसाय करायचे ठरवले. अहंमद जलालुद्दीन नावाच्या एका आमच्याच गावातल्या कंत्राटदाराबरोबर समुद्रकिनारी ते रोज काम करू लागले. पुढे जलालुद्दीन यांनी माझ्या बहिणीशी–जोहराशी विवाह केला आणि आमच्याशी नाते जोडले. जलालुद्दीन मला युद्धाच्या कथा सांगत असे आणि मग दिनमणीच्या शीर्षकातून मी त्या शोधत राही. आमच्या छोट्या दूरस्थ गावात युद्धाचे दृश्य परिणाम जाणवणे जवळजवळ अशक्य होते; पण हळूहळू भारताला सक्तीने युद्धात सामील व्हावे लागले आणि देशात आणीबाणी पुकारली गेली.

रोज सकाळी पंबनहून येणारी रेल्वेगाडी रामेश्वरमला थांबेनाशी झाली. हा युद्धाचा आमच्या गावावर पहिला ठळक परिणाम झाला होता. मग चालत्या रेल्वेगाडीतून वर्तमानपत्रांचे गठ्ठे रामेश्वरम ते धनुष्कोडीदरम्यान खाली फेकले जात. ते गठ्ठे गोळा करण्यासाठी शमसुद्दीनला कुणीतरी मदतनीस हवा होता. माझ्यापेक्षा दुसरा योग्य उमेदवार त्याला कुठून मिळणार? माझ्या आयुष्यातील पहिली कष्टाची कमाई करायला शमसुद्दीनचा असा हातभार लागला. आज अर्धशतकानंतर मी वळून त्या क्षणांकडे पाहतो आणि त्यावेळी स्वतःच्या कष्टाने मिळवलेल्या पहिल्या कमाईचा अभिमान आजही माझ्या मनातून ओसंडून वाहू लागतो.

माझ्या वडिलांकडून मी प्रामाणिकपणा आणि स्वयंशिस्त शिकलो, तर आईने मला चांगल्यावर विश्वास ठेवायची आंतरिक शक्ती दिली, दयाळू वृत्ती दिली. अर्थात माझ्या तिन्ही भावांनी आणि एका बहिणीनेदेखील हा ठेवा त्यांच्याकडून उचलला; पण मला जो जलालुद्दीन आणि शमसुद्दीन यांचा निकट सहवास घडला, त्याने मी स्वतंत्र, वेगळा असा बनत गेलो. शाळेत शिकायला न मिळालेले शहाणपण मी जलालुद्दीनकडून शिकलो, तर शमसुद्दीनकडून मी चेहऱ्यावरून दुसऱ्याच्या मनातले, शरीराची व डोळ्यांची भाषा ओळखायला शिकलो. माझ्यामध्ये जो सर्जनशीलतेचा स्रोत उगम पावत, फुलत, खळाळत गेला, त्याचे श्रेय मी नि:संशय त्या दोघांच्या सहवासात माझ्यावर पडलेल्या प्रभावाला देतो.

रामेश्वरम सोडून जिल्ह्याच्या ठिकाणी रामनाथपुरमला शिक्षण घेण्यासाठी मी माझ्या वडिलांकडे परवानगी विचारली. विचारात पडल्यासारखे ते क्षणभर गप्प झाले. विचार करता करता त्यांना शब्द लाभावेत आणि ते ओठातून बाहेर पडावेत तसे वडील बोलू लागले. ते मला म्हणाले, 'अबुल, तुला मोठे व्हायचे असेल, तर गाव सोडून शिक्षणासाठी बाहेर जायलाच हवे. सीगल पक्षी घरटे सोडून, एकटे दूरवर उडत जातात आणि नवे प्रदेश शोधतात. तसे या मातीचा आणि इथल्या स्मृतींचा मोह सोडून तुझ्या इच्छा–आकांक्षा जिथे पूर्ण होतील, तिथे तुला जायला हवे. आम्ही आमच्या प्रेमाने तुला बांधून ठेवणार नाही, आमच्या गरजा तुझा रस्ता अडवणार नाहीत.' माझी आई मला दूर पाठवायला काळजीने आढेवेढे घेत होती.

शमसुद्दीन आणि जलालुद्दीन माझ्यासोबत रामनाथपुरमला आले. त्यांनी माझे नाव शाळेत घातले, माझी राहण्याची नीट व्यवस्था केली; पण श्वार्झ हायस्कूल अन् या नव्या वातावरणात माझा जीव रमेना. पन्नास हजारांवर वस्ती असलेल्या या शहरात सदैव गजबज असायची; पण रामेश्वरमला जसा एकजिनसीपणा होता तसा इथे माझ्या अनुभवाला आला नाही. मला घराची ओढ अस्वस्थ करायची आणि म्हणून रामेश्वरमला जायची प्रत्येक संधी मी उडी मारून साधायचो. इथे असलेल्या शिक्षणाच्या उदंड संधींपेक्षा आईच्या हाताच्या गोड पोळ्यांची ओढ मला मोलाची वाटत असे. हळूहळू माझे घरापासून दूर जाणे मी स्वीकारत गेलो. नव्या वातावरणाशी जुळवून घ्यायचे मी मनाशी ठरवले. कारण माझ्या वडिलांच्या माझ्याकडून विशेष अपेक्षा आहेत हे मला ठाऊक होते. मी कलेक्टर व्हावे अशी त्यांची इच्छा होती. त्यांचे स्वप्न पुरे करणे माझे कर्तव्य होते. त्यासाठी रामेश्वरममध्ये वाटणारी सुरक्षितता, तिथले प्रेमळ वातावरण यांचा त्याग करणे मला भाग होते.

## स्वाध्याय



**प्र. १. चार-पाच वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) लेखकाच्या लहानपणी लोक वर्तमानपत्र कशासाठी वाचत असत?

(आ) लेखकाला आयुष्यातील पहिल्या कमाईची संधी कशी मिळाली?

(इ) डॉ. अब्दुल कलाम शिक्षणासाठी बाहेरगावी जाताना वडील त्यांना काय म्हणाले?

(ई) रामनाथपुरमला लेखकाचा जीव का रमत नव्हता ?

**प्र. २. तुमच्या शब्दांत उत्तरे लिहा.**

(अ) तुम्हांला आई, वडील, बहीण, भाऊ, शेजारी, शिक्षक यांच्या सहवासामुळे काय काय शिकायला मिळते?

(आ) तुम्ही कोणकोणती वर्तमानपत्रे वाचता? वर्तमानपत्रांतील कोणता भाग तुम्हांला वाचायला अधिक आवडतो? तो भाग का आवडतो?

(इ) आई परगावी गेल्यावर कोणकोणत्या प्रसंगी तुम्हांला तिची आठवण येते ?

(ई) तुमच्या आई-वडिलांना तुम्ही मोठेपणी कोण व्हावे असे वाटते ? ते होण्यासाठी तुम्ही कोणकोणते प्रयत्न कराल?

## खेळूया शब्दांशी.

**(अ) खालील शब्दांत लपलेले शब्द शोधा.**

(अ) परवानगी  (इ) एकजिनसीपणा

(आ) हजारभर  (ई) जडणघडण

**(आ) खालील शब्द वापरून तुमच्या मनाने वाक्ये तयार करा.**

(अ) वितरक  (इ) वर्तमानपत्र

(आ) गिऱ्हाईक  (ई) एकखांबी तंबू

**(इ) 'एकखांबी तंबू' म्हणजे सर्व जबाबदारी एकाच व्यक्तीवर असणे. तसे खालील शब्दांचे अर्थ घरातील मोठ्या व्यक्तींकडून माहीत करून घ्या. त्यांचा वाक्यांत उपयोग करा.**

(अ) कर्ताधर्ता  (इ) लिंबूटिंबू

(आ) खुशालचेंडू  (ई) व्यवस्थापक

**(ई) खालील शब्द असेच लिहा.**

दुर्मीळ, क्रांतिकारक, राष्ट्रभक्त, वृत्तपत्रे, ग्रामसभा, महत्त्व, भविष्य, उत्सुक, जिज्ञासू, वृत्ती, बॅरिस्टर, गिऱ्हाईक, दूरस्थ, दृश्य, युद्‌ध, कष्ट, स्वयंशिस्त, सर्जनशीलता, स्रोत, इच्छा, कर्तव्य, नि:संशय.

**शोध घेऊया.**

**(अ) आंतरजालाच्या साहाय्याने डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्याबद्दल खालील मुद्द्यांच्या आधारे माहिती मिळवून लिहा.**

(अ) पूर्ण नाव (आ) आई-वडिलांचे नाव (इ) जन्मतारीख (ई) जन्मगाव (उ) शिक्षण (ऊ) भूषवलेली पदे (ए) लिहिलेली पुस्तके.

**(आ) तुम्हांला माहीत असणाऱ्या वेगवेगळ्या भाषांतील वर्तमानपत्रांच्या नावांची यादी करा.**

**उपक्रम :** (१) सीगल पक्षी नवे प्रदेश शोधतात व तेथे काही काळ वास्तव्य करतात. हे सीगल पक्ष्यांचे वैशिष्ट्य आहे. तशी खालील पक्ष्यांची वैशिष्ट्ये शिक्षकांच्या मदतीने माहीत करून घ्या व लिहा.

(अ) फिनिक्स (आ) हंस (इ) बगळा (ई) गरुड

(२) भारतीय शास्त्रज्ञांची माहिती मिळवा. त्यांची चित्रे व माहिती यांचे तक्ते तयार करून वर्गात लावा.

- **खाली काही सामान्यनामे, विशेषनामे व भाववाचकनामे दिली आहेत. खालील तक्त्यात त्यांचे वर्गीकरण करा.**

नामे - देशमुख, चांगुलपणा, कडधान्य, कळसूबाई, पर्वत, वात्सल्य, शिखर, फूल, नवलाई, आडनाव, माणुसकी, हिमालय, मुलगी, नम्रता, जास्वंद, मटकी, सविता.

| | |
|---|---|
| **सामान्यनाम** | मुलगी, ............... |
| **विशेषनाम** | सविता, ............... |
| **भाववाचकनाम** | माणुसकी, ............... |

- **खालील चित्रांच्या समोर सामान्यनाम, विशेषनाम, भाववाचकनाम लिहा.**

उदा.,



सामान्यनाम - फूल
विशेषनाम - गुलाब
भाववाचकनाम - सौंदर्य



सामान्यनाम -
विशेषनाम -
भाववाचकनाम -



सामान्यनाम -
विशेषनाम -
भाववाचकनाम -

- **खाली दिलेल्या वाक्यांतील अधोरेखित नामांचे प्रकार ओळखा.**

१. मनाली मुंबईहून तिच्या गावी गेली.
२. मुलांच्या हलगर्जीपणामुळे इस्त्रीची वायर जळाली.
३. सुधीरला पुरणपोळी आवडते.
४. ताजमहालचे सौंदर्य काही निराळेच आहे.

## सारे हसूया.



मुलगा – बाबा, बाबा टेलिफोनच्या तारा एवढ्या उंच का असतात?

बाबा – त्यावर कोणी कपडे वाळत घालू नये म्हणून.



## वाचा.

आमच्या आळीत कोणाच्याही घरी काही कार्यक्रम असो, की कोणी आजारी असो पारूमावशी तिथं हजर असणारच! उंच सडसडीत शरीरयष्टी, तरतरीत नाक, रंगाने काळीसावळी, सतत हसरा चेहरा, कपाळाला रुपयाएवढं कुंकू, नऊवारी साडी. डोक्यावरचा पदर सावरत ती कोणत्या न् कोणत्या कामात मग्न. रस्त्याने जाता-येता ती कोणाशी बोलली नाही, असं कधी घडत नाही. अख्ख्या आळीत तिच्यासाठी सगळ्यांचे दरवाजे कायम खुले असतात. तिच्या आवाजानं सगळं घर भरल्यासारखं होतं. घरातील एखादी व्यक्ती रुसलेली असली अन् पारूमावशीच्या लक्षात आलं, की तिचा रुसवा घालवून हसतंबोलतं केल्याशिवाय तिला चैन पडायचे नाही. गल्लीतल्या पोरांचा खेळताना पाय मुरगळला, कोणी धडपडलं, कोणाला खरचटलं तर आम्ही पोरं घरी न येता आधी तिच्याकडे जातो, मग घरी.

माझ्या आईचं अन् तिचं जरा जास्तच सख्य आहे. अडल्यानडल्याला ती आईजवळ येते. तिची सुख-दु:खं आईजवळ बोलते. पारूमावशीच्या घरची परिस्थिती बेताचीच. घरी खाणारी तोंडं बरीच; पण कोणापुढं हात पसरणं पारूमावशीच्या स्वभावात बसत नाही. ज्याच्या घरी जाईल, त्या घरची होऊन जाणं, पडेल ते काम करणं एवढंच तिला माहीत. प्रत्येकाच्या सुख-दु:खात अगदी मनापासून सामील होणारी पारूमावशी सगळ्या आळीची 'मावशी' आहे आणि म्हणूनच सगळ्यांच्या मनात 'घर' करून आहे.

## सुविचार.

(१) सेवेचा एक हात प्रार्थनेसाठी जोडलेल्या दोन हातांपेक्षा अधिक उपयुक्त असतो.

(२) मनुष्याच्या मनाची ओढ व तळमळ निम्मे काम करते, उरलेले निम्मे काम अभ्यासाने होते.

(३) विजयी तोच होतो, जो विजयी होण्यासाठी साहस करतो.

(४) मनुष्याची सर्वांत मोठी संपत्ती म्हणजे त्याचे उत्तम चारित्र्य.

(५) ग्रंथ हे खरे पथदर्शक.

**शिक्षकांसाठी :** वरील उताऱ्यात पारूमावशीचे शब्दचित्र रेखाटले आहे. विद्यार्थ्यांना ते समजावून सांगावे. त्यांच्या ओळखीपैकी एका व्यक्तीचे शब्दचित्र रेखाटण्यासाठी मार्गदर्शन करावे.

# ४ गवतफुला रे! गवतफुला!

• ऐका. म्हणा. वाचा.



रंगरंगुल्या, सानसानुल्या, गवतफुला रे गवतफुला!
असा कसा रे मला लागला, सांग तुझा रे तुझा लळा!

मित्रासंगे माळावरती, पतंग उडवित फिरताना
तुला पाहिले गवतावरती, झुलता झुलता हसताना,
विसरून गेलो पतंग नभिचा, विसरून गेलो मित्राला
पाहुन तुजला हरखून गेलो, अशा तुझ्या रे रंगकळा!

हिरवी नाजुक रेशिम-पाती, दोन बाजूंला सळसळती
नीळनिळूली एक पाकळी, पराग पिवळे झगमगती,
तळी पुन्हा अन् गोजिरवाणी, लाल पाकळी खुलली रे
उन्हामधे हे रंग पाहता, भान हरपुनी गेले रे!

वारा घेउन रूप सानुले, खेळ खेळतो झोपाळा
रात्रहि इवली होउन म्हणते, अंगाईचे गीत तुला,
मलाहि वाटे लहान होऊन, तुझ्याहूनही लहान रे
तुझ्यासंगती सदा रहावे, विसरूनि शाळा, घर सारे!

तुझी गोजिरी शिकून भाषा, गोष्टी तुजला सांगाव्या
तुझे शिकावे खेळ आणखी, जादू तुजला शिकवाव्या,
आभाळाशी हट्ट करावा, खाऊ खावा तुझ्यासवे
तुझे घालुनी रंगित कपडे, फूलपाखरां फसवावे!

**इंदिरा संत**-(१९१४-२०००) स्त्रीमनाचा हळुवारपणा व्यक्त करणाऱ्या कवयित्री. 'शेला', 'मेंदी', 'मृगजळ', 'रंगबावरी', 'बाहुल्या', 'गर्भरेशीम' इत्यादी कवितासंग्रह तसेच 'अंगतपंगत', 'गवतफुला', 'मामाचा वाडा' हे बालकवितासंग्रह प्रसिद्ध. 'श्यामली', 'कदली' आणि 'चैतू' हे कथासंग्रह प्रसिद्ध.

या कवितेत कवयित्रीने माळावर फुललेल्या गवतफुलाचे वर्णन केले आहे.

**शिक्षकांसाठी :** पाठ्यपुस्तकातील सर्व कविता तालासुरांत व साभिनय म्हणून दाखवाव्या. कवितांना योग्य चाली लावाव्या. विद्यार्थ्यांकडून कविता तालासुरात म्हणून घ्याव्या.



## स्वाध्याय

**प्र. १. दोन–तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) कवितेतील मुलाची गवतफुलाशी कुठे व कशी भेट झाली ?

(आ) गवतफुलाला पाहून मुलगा कोणकोणत्या गोष्टी विसरला ?

(इ) कवयित्रीने गवतफुलाच्या पानांचे व पाकळ्यांचे वर्णन कसे केले आहे ?

(ई) गवतफुलाला लहान होऊन कोण कोण भेटायला आले आहे ?

(उ) गवतफुलासोबत राहून मुलाला कोणकोणत्या गोष्टी करायच्या आहेत ?

**प्र. २. तुम्हांला फुलपाखरू भेटले, तर तुम्ही त्याच्याशी काय संवाद साधाल ? तुमच्या शब्दांत लिहा.**

**प्र. ३. खाली दिलेल्या अर्थाच्या कवितेतील ओळी शोधा.**

(अ) तुझे रंग पाहून मी स्वतःला विसरून गेलो.

(आ) मला तुझ्यापेक्षाही लहान व्हावेसे वाटते.

(इ) तुझी गोजिरी भाषा शिकून तुला गोष्टी सांगाव्या.

(ई) तुझ्यासारखे रंगरूप घेऊन फुलपाखरांना फसवावे.

**प्र. ४. या कवितेत गवतफुलाचे वर्णन करताना कोणाला, कोणते रंग वापरले आहेत ते लिहा.**


उदा., रेशिम–पाती – हिरवी (१) पाकळी – (२) पराग – (३) तळीची पाकळी –

**प्र. ५. गवतफुले व इतर फुले यांचे निरीक्षण करा. त्यांमधील साम्य व भेद लिहा.**

**प्र. ६. ‘सळसळ’ यासारखे आणखी शब्द लिहा.**


### खेळूया शब्दांशी.

**(अ) समान अर्थाचे शब्द लिहा.**




**(आ) रंगरंगुल्या, सानसानुल्या, नीळनिळूली यांसारखे शब्द शोधा व लिहा.**

**(इ) गवतफुलाचे वर्णन करणारे शब्द शोधून आकृतीत लिहा.**



**उपक्रम :** (१) एखाद्या माळरानावर फिरताना तुम्ही गवतफुले पाहिली आहेत का? ती कोणकोणत्या रंगांची असतात? तुम्ही पाहिलेल्या गवतफुलाचे चित्र काढा व रंगवा.

(२) मंगेश पाडगांवकर यांची 'मी फूल तृणातिल इवले' ही कविता मिळवा व लिहा. कवितेला चाल लावून वर्गात सादर करा.

**प्रकल्प :** वृत्तपत्रांमधून विविध फुलांविषयी येणाऱ्या माहितीची कात्रणे मिळवा. या कात्रणांपासून चिकटवही बनवा.

## कविता करूया.

- **केंद्रीय उच्च प्राथमिक मराठी शाळा कापरा (मे.), ता. जि. यवतमाळ या शाळेतील सोनाली श्रावण फुपरे, हिने इयत्ता सहावीत असताना 'झाड' या विषयावर तयार केलेली कविता वाचूया.**

### झाड

झाड आहे हिरवेगार,
वारा देते थंडगार.

झाडाच्या सावलीत मी बसते,
झाड खुदकन गालात हसते.

झाड देते माया,
झाड देते छाया.

झाडावर भरते पक्ष्यांची शाळा,
झाडाखाली सर्व प्राणी होतात गोळा.

झाडाला लागतात सुंदर फुले,
फुले तोडायला येतात मुले.

झाड आहे माझा मित्र,
माझ्या मनात राहते नेहमी झाडाचे चित्र.



- **सोनालीप्रमाणे आपणही खाली दिलेल्या कवितेच्या ओळी पूर्ण करूया.**

१. माझी शाळा म्हणते खेळ खेळा
वेळ, काळ तुम्ही नियमित पाळा,
................................
................................

२. जाऊ जंगल सफरीला
पाहू आनंदे निसर्गाला,
................................
................................

# ५ बाकी वीस रुपयांचं काय?

**बाबाराव मुसळे** (जन्म-१९४९) प्रसिद्ध लेखक व कवी. 'मोहरलेला चंद्र', 'झिंगू लुखू लुखू', 'नगरभोजन' हे कथासंग्रह प्रसिद्ध. 'वारूळ', 'पाटिलकी', 'दंश', 'पखाल', 'आर्त' या कादंबऱ्या तसेच 'इथे पेटली माणूसगात्रे' हा कवितासंग्रह प्रसिद्ध.

दुसऱ्यांना मदत करण्यास नेहमी तयार असलेल्या, निःस्वार्थी वृत्तीच्या एका निरागस मुलाचे वर्णन लेखकाने केले आहे. या मुलाबाबत विकासच्या साहेबांचा गैरसमज होतो. त्यांचा हा गैरसमज कसा दूर होतो हे या पाठातून लेखकाने संवेदनशीलतेने स्पष्ट केले आहे.

- तुम्हांला दुसऱ्यांना मदत करणे आवडते का?
- तुम्ही कोणाकोणाला मदत करता? कोणकोणत्या स्वरूपात मदत करता?
- तुमच्या कुटुंबातील एखादी व्यक्ती आजारी पडल्यास तुम्ही तिची काळजी कशी घेता?


'मी आत येऊ शकतो का सर?' हातातल्या फाइली सावरत विकासने विचारले. साहेब कुठलीतरी फाइल पाहत होते. त्यांनी मानेनेच हो म्हटले.



आवाजावरून त्यांनी विकास आत आल्याचे वर न पाहताच ओळखले अन् तक्रारीच्या सुरात बोलले, 'विकाससर, कालच्या त्या मुलानं मला ऐंशी रुपयांना फसवलं. तुमच्यामुळं हे सारं घडलं. ही मुलं महाबिलंदर असतात. तुम्हांला त्याचा कसा पुळका आला तेच मला कळत नाही. शंभराची नोट घेऊन गेला. एकदा गेला तो गेलाच! बघा, त्याची पाण्याची बाटली मला शंभर रुपयांत पडली.' एका दमात साहेबांनी मनातली नाराजी व्यक्त केली. क्षणभर विकासला वाटले, आपण आपल्या खिशातून साहेबांना ऐंशी रुपये काढून द्यावे; पण त्याने तसे केले नाही. तो साहेबांच्या समाधानासाठी म्हणाला, 'तसं नसेल सर, काही अडचण आली असेल त्याला म्हणून...' 'काही सांगू नका, यानंतर असली मुलं कार्यालयात आलेली मला चालणार नाहीत. समजले?' साहेब म्हणाले. नाइलाजाने विकासने 'हो' म्हटले. साहेब म्हणतात ते सत्य होते, तरी ते संपूर्ण सत्य नसावे, असे विकासचे मन त्याला सारखे सांगत होते. राजू हा मुलगा फसवाफसवी करणारा वाटत नव्हता. मागच्या महिन्यापासून विकास त्याला ओळखत होता. विकासची मेहुणी टाटा कॅन्सर सेंटरच्या 'बी' विंगमध्ये दाखल झाली होती. विकास सकाळ-संध्याकाळ त्यांना भेटायला आणि डबा पोहोचवायला जात असे. टाटा कॅन्सर सेंटरच्या शेजारीच त्याचे कार्यालय होते. तिथला त्याचा वावर नित्याचा झाला होता.

एक दिवस एका मुलाने त्याचे लक्ष वेधून घेतले. फार तर दहा-अकरा वर्षांचा मुलगा असावा. त्याच्या गळ्यात एक पाटी अडकवलेली होती. त्यावर त्याने 'उरलेले अन्न' देण्याचे आवाहन केले होते. त्याच्या हातात एक पिशवी होती. ती पाहून त्यात काही अन्न

असावे असे वाटत होते. त्याला पाहून विकासची उत्सुकता फारच वाढली. त्याने एक दिवस त्याला बाजूला घेतले अन् बरेच काही विचारले, 'तुझं नाव काय? तू कुठला? येथे का आलास? कोणत्या इयत्तेत शिकतोस? वगैरे. साहेब ज्या मुलाविषयी बोलले होते तोच हा राजू. तो वाशिम जिल्ह्यातल्या एका खेडेगावचा. पाचवी इयत्तेत शिकणारा. त्याची आई पोटाच्या कर्करोगाने आजारी असल्याने एक महिन्यापासून टाटा कॅन्सर सेंटरच्या 'बी' विंगमध्ये भरती झालेली होती.



तो आणि त्याची आई याशिवाय घरी तिसरे कोणी नव्हते. एका झोपडीवजा घराशिवाय त्यांच्याकडे काही



नव्हते. दवाखान्यात आईजवळ सतत बसून राहण्याचा त्याला कंटाळा येई. आईला विचारून तो इकडेतिकडे फिरे. आईने त्याला सांगितले होते, 'जास्त लांब जाऊ नको. कोणाच्या वस्तूला हात लावू नको.' तो तिथंच बाहेर फिरायचा, तेव्हा त्याच्या लक्षात आले, की पेशंटसोबत आलेले अनेक गोरगरीब भुकेने व्याकूळ होऊन इथे पैशांसाठी, अन्नासाठी दुसऱ्यांसमोर हात पसरतात. दुसरीकडे बरेच लोक जेवून शिल्लक राहिलेले अन्न कचराकुंडीत फेकून देतात. ते अन्न जर या गरजूंना मिळाले तर....? त्याने एक पुठ्ठा घेतला. त्यावर लिहिले – 'उरलेलं अन्न फेकू नका, मले द्या. मी ते उपाशी लोकायले देतो.' राजूने पुठ्ठ्याला दोरी बांधून ती गळ्यात अडकवली. राजूच्या गळ्यातली पाटी वाचून लोक राहिलेले अन्न त्याला देऊ लागले. बरेच अन्न जमा होऊ लागले. ते जमा झालेले अन्न तो गरजूंना द्यायचा. त्यांच्या डोळ्यांतले समाधान पाहून त्याला हायसे वाटायचे. दवाखान्यातील पेशंटच्या नातेवाइकांना बाहेरून काही आणून द्यायचे असेल, तर राजू पळत जाऊन आणून द्यायचा. एखाद्या पेशंटचा जवळचा नातेवाईक कुठे बाहेर जाणार असला, तर तो 'राजू ध्यान दे माझ्या पेशंटकडे, मी जरा जाऊन येतो.' म्हणून बिनधास्त निघून जायचा. 'बी' विंगमधल्या सर्वांना त्याचे भारी कौतुक होते.

कार्यालयाच्या बाहेर असलेल्या हॉटेलमधून विकास रोज पाण्याची बाटली घेत असे; पण एक दिवस त्याला कार्यालयामध्ये पोहोचायला उशीर झाला, म्हणून त्याने राजूला पाण्याची बाटली कार्यालयामध्ये पोहोचवायला सांगितले. पाण्याच्या बाटलीचे पैसेही त्याच्याजवळ दिले. राजू अधूनमधून विकासला पाण्याची बाटली पोहोचवू लागला. हे काम राजू आनंदाने करी. विकासच्या साहेबांनी राजूला बऱ्याच वेळा विकाससाठी पाण्याची बाटली कार्यालयामध्ये आणून देताना पाहिले होते.

असाच काल सकाळी तो कार्यालयामध्ये विकाससाठी पाण्याची बाटली घेऊन आला होता. त्याने एक पाण्याची बाटली विकासच्या साहेबांनाही दिली. त्या वेळी साहेब म्हणाले, ‘वीस रुपये सुट्टे नाहीत. शंभराची नोट आहे.’ त्यावर राजू म्हणाला, ‘सर, द्या ती नोट. मी ऐंशी रुपये आपल्याले आणून देतो.’ साहेबांची शंभर रुपयांची नोट घेऊन राजू गेला तो अद्याप आलाच नाही. राजूने साहेबांना खरंच फसवले असेल का? काय झाले असेल नक्की? विकास विचारात गढला. तेवढ्यात ‘सर, आत येऊ का?’ राजूच्याच वयाचा एक मुलगा दारात उभा राहून विचारत होता. साहेब आणि विकासने आधी त्या मुलाकडे अन् मग एकमेकांकडे पाहिले. मग साहेब म्हणाले, ‘ये, बोल. काय काम आहे?’

‘सर, मी इरफान. राजूचा मित्र.’ बोलता बोलता त्याने खिशातून शंभराची नोट काढली. ती नोट साहेबांसमोर धरत इरफान म्हणाला, ‘सर, ही नोट राजूने तुम्हांला द्यायला सांगितली आहे.’

विकास आणि साहेब दोघेही चकित झाले. ‘राजू कुठंय?’ विकासने विचारले, ‘सर, तो कालच गावाला गेला.’ साहेब म्हणाले, ‘का?’ ‘त्याच्या आईची दवाखान्यातून सुट्टी झाली. गावी जाण्याआधी त्याने ही नोट मला तुम्हांला द्यायला सांगितली होती.’ असे म्हणत इरफान आला तसा बाहेर पडला.

विकास आणि साहेब दोघेही थोडावेळ स्तब्ध झाले. मग साहेब म्हणाले, ‘विकास, मला माफ करा. माणसं ओळखण्यातला तुमचा अधिकार मोठा आहे. त्यामानाने मी फार अनुभवशून्य आहे. या नोटेतले ऐंशी रुपयेच माझे आहेत; पण बाकी वीस रुपयांचं काय?’ यावर विकासही निरुत्तर झाला.

## स्वाध्याय



**प्र. १. तीन–चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) साहेबांनी विकासकडे राजूबाबत कोणती तक्रार केली?

(आ) दवाखान्यात राजूला पाहून विकासची उत्सुकता का वाढली?

(इ) दवाखान्यामध्ये फिरताना राजूच्या काय लक्षात आले?

(ई) भुकेलेल्यांसाठी राजूने कोणता उपक्रम सुरू केला?

(उ) साहेबांचा राजूबद्दलचा गैरसमज कसा दूर झाला?

**प्र. २. तुमच्या मनाने उत्तरे लिहा.**

(अ) ‘कोणाच्या वस्तूला हात लावू नको’, असे आईने राजूला का सांगितले असेल?

(आ) ‘माणसं ओळखण्यातला तुमचा अधिकार मोठा आहे’, असे साहेब विकासला का म्हणाले असतील?

(इ) भुकेलेल्या लोकांना अन्न मिळावे, म्हणून आणखी काय काय करता येईल?

(ई) तुम्हांला राजूशी मैत्री करायला आवडेल का? का ते सांगा.


(उ) राहिलेल्या वीस रुपयांचे विकासच्या साहेबांनी काय करावे असे तुम्हांला वाटते?

(ऊ) राजूचा प्रामाणिकपणा पाठातील कोणकोणत्या प्रसंगांतून दिसून येतो?

प्र. ३. तुम्हांला राजूची आई भेटल्यास तुम्ही राजूबद्दल तिच्याजवळ काय बोलाल ते लिहा.

प्र. ४. एखाद्या गरजू विद्यार्थ्याला तुम्ही कशाप्रकारे मदत कराल?

प्र. ५. पाठात तुम्हांला राजूचे कोणते गुण दिसले ते खालील चौकटींत लिहा. त्या शब्दांचा वापर करून राजूविषयी आठ-दहा ओळींत माहिती लिहा.




**खेळूया शब्दांशी.**

(अ) फसवाफसवी, कचराकुंडी, गोरगरीब यांसारखे तुम्हांला माहीत असलेले जोडशब्द लिहा.

(आ) खालील शब्दांसाठी मराठी शब्द लिहा.

(अ) फाइल (इ) पेशंट (उ) हॉटेल

(आ) सेंटर (ई) विंग (ऊ) कॅन्सर

(इ) पाठात आलेल्या पुढील शब्दांचा वाक्यांत उपयोग करा.

(अ) महाबिलंदर (इ) अनुभवशून्य

(आ) आवाहन (ई) निरुत्तर

(ई) 'भारी कौतुक' म्हणजे 'खूप कौतुक.' 'भारी' हा शब्द तुम्ही केव्हा केव्हा वापरता? हा शब्द वापरून तीन-चार वाक्ये लिहा.

- 'पैसा' या शब्दाचे सामान्यरूप समजून घ्या. उदा. पैसा-पैशाला, पैशाने, पैशांसाठी, पैशांचा, पैशांहून, पैशातला. याप्रमाणे खालील शब्दांची सामान्यरूपे लिहा.

(अ) मासा - (आ) ससा - (इ) ठसा -

- खालील शब्दांना की, ई, ता, वा, पणा, आई हे प्रत्यय लावून भाववाचक नामे तयार करा.

(अ) सुंदर (इ) नवल (उ) दांडगा (ए) पाटील

(आ) प्रामाणिक (ई) गोड (ऊ) शांत (ऐ) चपळ

- खालील भाववाचक नामांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.

(अ) मित्रत्व x (आ) गरिबी x (इ) खरेपणा x (ई) महागाई x

- खाली दिलेल्या शब्दांसारखे अन्य शब्द लिहा.

(अ) मनुष्यत्व - (ई) नवलाई -

(आ) आपुलकी - (उ) बालपण -

(इ) नम्रता - (ऊ) माधुर्य -

## आपण समजून घेऊया.

खाली दिलेल्या वाक्यांत अधोरेखित नामांच्या जागेवर योग्य सर्वनामे लिहा व वाचा.

समीरा गुणी मुलगी आहे. समीरा नेहमी हसतमुख असते. समीराला गोष्टी सांगायला आवडतात. समीराच्या गोष्टी सगळे मन लावून ऐकतात. समीराने खो-खो खेळात बक्षीस मिळवले आहे.

- **सर्वनामाचे मुख्य चार प्रकार आहेत.**

१. पुरुषवाचक सर्वनाम
२. संबंधी सर्वनाम
३. प्रश्नार्थक सर्वनाम
४. दर्शक सर्वनाम

- **खालील संवाद वाचा. अधोरेखित केलेली सर्वनामे पाहा.**

**रसिका :** दादा, तू मला बाजारात नेशील का ?
**दादा :** तुला बाजारात कशाला जायचे आहे ?
**रसिका :** मला रंगपेटी आणायची आहे.
**दादा :** आई आणि आत्याबरोबर जा.
**रसिका :** त्या लग्नाला जाणार आहेत.
**दादा :** मग ताईला घेऊन जा.
**रसिका :** ती मैत्रिणीकडे गेली आहे.
**दादा :** अगं, मी नाही येऊ शकत. आता माझे मित्र येतील. आम्हांला प्रकल्प करायचा आहे. ते येणार आहेत म्हटल्यावर त्यांना सोडून कसा येऊ ?
**रसिका :** ठीक आहे. बाबा म्हणाले आहेत, दादाला विचार. तो नाही आला, तर आपण जाऊ.

वरील संवादात **तू, मला, तुला, त्या, ती, मी, माझे, आम्हांला, ते, त्यांना, तो, आपण** ही सर्वनामे आली आहेत. ही सर्व पुरुषवाचक सर्वनामे आहेत.

- **खालील आकृतीचे निरीक्षण करा.**

**प्रथम पुरुषवाचक सर्वनामे**
(स्वतःविषयी बोलताना)
मी | आम्ही | स्वतः

**द्वितीय पुरुषवाचक सर्वनामे**
(ज्याच्याशी बोलतो)
तू | तुम्ही | आपण

**तृतीय पुरुषवाचक सर्वनामे**
(ज्याच्याविषयी बोलतो)
तो | ती | ते | त्या

मराठी भाषेत वयाने आणि अधिकाराने मोठ्या असलेल्या व्यक्तीशी बोलताना 'तू' ऐवजी 'तुम्ही' किंवा 'आपण' संबोधतात. त्या वेळेस एकच व्यक्ती असूनही बोलताना अनेकवचनी उल्लेख होतो, त्याला आदरार्थी अनेकवचन म्हणतात. मी, तू किंवा तुम्ही यांचा एकत्र उल्लेख करताना 'आपण' या सर्वनामाचा वापर करतात, तर बोलताना दोन किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तींचा स्वतःसहित एकत्र उल्लेख करायचा असेल, तर 'आम्ही' हे सर्वनाम वापरतात.

- **खालील उतारा काळजीपूर्वक वाचून आशयानुसार दोन परिच्छेद करा. उताऱ्याला योग्य शीर्षक द्या.**

समजा दमयंती जेवत असेल अन् तिला कोणीतरी म्हणाले, 'खेळायला येतेस का ?' तर दमयंती जेवण अर्धवट सोडून खेळायला पळेल. एवढा खेळ तिला जीव की प्राण. मग तो कोणताही खेळ असो, मैदानी असो वा बैठा खेळ असो. दमयंती त्यात तल्लीन होऊन जाते. असा एकही खेळ नाही जो तिला आवडत नाही. बैठ्या खेळात ती जेवढी तरबेज तेवढीच मैदानी खेळातही. सागरगोटे, चल्लसआठ, काचापाणी, पत्त्यातील सावकार-भिकार अशा खेळांत जिंकणे म्हणजे तिच्या डाव्या हातचा मळ. मैदानी खेळ खेळताना कधी कधी ती एवढी हमरीतुमरीवर येते, की जणू आता तिचे पुढच्या खेळाडूबरोबर कडाक्याचे भांडण होईल; पण एकदा का खेळ संपला, की प्रतिस्पर्ध्याच्या हातात हात घालून चाललेली दिसणार हे नक्की. दमयंती म्हणते, ''खेळामुळे शरीराचा व्यायाम होतो. मन ताजेतवाने होते. हाता-पायांचे स्नायू बळकट होतात. हृदय व फुफ्फुसांची कार्यक्षमता वाढते. आपल्याला दिवसभराच्या कामाने आलेला थकवा, मरगळ जाऊन आपल्यात नवा जोश, उत्साह निर्माण होतो. कबड्डी, खो-खो, लंगडी, डॉजबॉल यांसारख्या मैदानी खेळांमुळे स्वतःवर येणाऱ्या संकटांशी सामना करण्याची ताकद आपल्यांत निर्माण होते.'' प्रत्येकाने रोज थोडे का होईना पण खेळलेच पाहिजे. तुम्हांला निरोगी राहायचे असेल, तर योग्य आहाराबरोबर योग्य व्यायाम असायला हवा अन् खेळांतून शरीर व मनाला मिळणारा व्यायाम सर्वांगसुंदर व्यायाम असतो, नाही का ?

**ओळखा पाहू!**

मागे आणि पुढे दोन तोंडे असतात मला,
जमीन भुसभुशीत करण्याची माझी कला,
शेतकऱ्याचा मित्र म्हणून ओळखतात मला.
**ओळखा कोण?**

पहाट होताच तुम्हांला दिसतो,
तेव्हाच दिवस सुरू होतो,
लवकर उठून पाहायचा,
तुम्ही निश्चय करा,
आहे सर्वांत मी, तेजस्वी तारा.
**ओळखा कोण?**

**शिक्षकांसाठी :** सर्वनामांच्या विविध प्रकारांची उदाहरणे देऊन उपयोजनात्मक सराव करून घ्यावा. दिलेल्या उताऱ्याचे प्रकट वाचन व मूकवाचन विद्यार्थ्यांकडून करून घ्यावे.

# ६ पण थोडा उशीर झाला...

**संदीप हरी नाझरे**–(जन्म–१९८४) चारोळी, कविता, कथा, अनुभवकथन, लेख, ललित लेख इत्यादींचे लेखन. 'वज्रमूठ' कवितासंग्रह प्रसिद्ध. विविध नियतकालिकांमधून साहित्य प्रसिद्ध.

कारगीलसारख्या धगधगत्या तणावपूर्ण सीमेवर सैनिक म्हणून काम करणारा तरुण आपल्या आजारी आईला भेटण्याच्या ओढीने घरी पोहोचतो; पण त्याआधीच त्याची आई हे जग सोडून गेलेली असते. सैनिकांच्या मनातील देशप्रेम व आईबद्दलची ओढ असा भावविभोर करणारा प्रसंग या पाठात लेखकाने चित्रित केला आहे.

कारगील, काश्मीर सरहद्दीवरील हिमालयातील अतिशय खडतर हवामानाच्या दुर्गम प्रदेशातील ठिकाण. या ठिकाणी सेवा बजावणे हे कोणत्याही सैनिकाच्या आयुष्यातील प्रचंड अवघड काम. अतिशय थंड हवामान आणि सतत धगधगणारी तणावपूर्ण सीमा; पण अशा प्रतिकूल परिस्थितीलाही पुरून उरणार नाही तो जवान कसला? इथला पावसाळा आणि हिवाळा जेवढा जीवघेणा, तेवढाच उन्हाळा सुखावह आणि आल्हाददायी. उन्हाळ्यात पहाडावरील बर्फ वितळून पर्वतरांगा हिरव्याकंच रंगाने नटून जातात. जमीन अशी दिसतच नाही; जणू वसुधेने हिरवागार शालू परिधान केला आहे. असा रमणीय निसर्ग आमचे मन उल्हसित करायचा.



मार्च महिन्याचे दिवस होते. बटालियनमध्ये आठ–पंधरा दिवसांतून एकदा पोस्टमन येत असे. पोस्टमन आला, की अक्षरशः इथं झुंबड उडे. सगळी बटालियन त्याच्यावर तुटून पडे. आपल्याला आलेलं पत्र वाचताना पोलादी छातीच्या सैनिकाचं मन चंद्रमण्यासारखं पाझरून कधी वाहू लागायचं ते समजायचं नाही. एकमेकांच्या पाठीवर आधाराची थाप पडायची आणि गावाकडच्या आठवणींना उजाळा देत पुन्हा नव्या जोशात आम्ही कामावर खडे व्हायचो.

बायकोनं पाठवलेलं अंतर्देशीय पत्र घेऊन मी बंकरकडे वळलो. पत्रावर तिच्या आसवांच्या सुकलेल्या डागांशिवाय काहीच लिहिलेलं नव्हतं. पत्रात काही लिहिलं नसलं तरी ते बोलकं पत्र बराच वेळ मी वाचत बसलो होतो. इथून गावाकडे जाण्यातच सुट्टीतले आठ–दहा दिवस जायचे. गावाकडं गेल्यावर पाव्हण्यारावळ्यांकडे जाणं–येणं आलंच. त्यातच बहिणींचे रक्षाबंधन, भाऊबीज त्यांच्या गावी जाऊन साजरी करणं, हे सगळं करता करता परतीचा दिवस कधी उगवायचा हेच उमगायचं नाही. तसं कारगीलसारख्या दुर्गम ठिकाणी कुटुंब आणणं कोणत्याही सैनिकाला शक्य नव्हतं. पत्नीची कधीच तक्रार नसायची. मी बजावत असलेल्या देशसेवेची तिला जाणीव होती.

माझ्या बाबांनाही माझा खूप अभिमान वाटायचा. मी सुट्टीत आलो, की ते कडकडून मिठीत घ्यायचे. मी येताना आणलेली मिठाई साऱ्या गावात वाटायचे. माझी आई खूप हळवी. माझ्या पाठीवरचा बंदुकीच्या गोळीचा व्रण बघून, तिनं जे अंथरूण धरलं, ते सोडलंच नाही. मी सगळ्यांत धाकटा, म्हणून सगळ्यांचा जीव माझ्यासाठी तीळ तीळ तुटत असे. या हळव्या माउलीच्या व प्रेमळ बांधवांच्या आठवणी फेर धरायच्या; पण भारतमातेच्या संरक्षणाची जबाबदारीही मला तितकीच महत्त्वाची वाटायची. मला वाटायचं, 'भारतमातेसाठी लढताना बलिदान द्यावं लागलं, तर माझ्या अंगावर तिरंगा मानाने ठेवला जाईल. ते पाहताना माझ्या घरच्यांचा ऊर अभिमानाने फुलून येईल.' काल सकाळीच गावाकडून आलेल्या सुखदेवने गावाकडचा सांगावा सांगितला. माझ्या आईचं दुखणं वाढलं होतं. आईने त्याच्यासोबत निरोप पाठवला होता. तिचा प्रत्येक शब्द माझ्या अंतरंगाचा ठाव घेत होता. 'मी आजारी आहे; पण तू माझी काळजी करू नको. घरातले सगळे माझी नीट काळजी घेतात, मला जपतात. तू आपल्या भारतमातेला जप, तिचं रक्षण कर, तिची काळजी घे.' माझं मन ढसढसा रडत होतं. डोळ्यांतलं पाणी हटेना. जीव घाबराघुबरा होऊ लागला. मन सैरभैर झालं. तसा मी उठलो, थेट मेजरसाहेबांच्या पुढ्यात जाऊन उभा राहिलो. माझी अवस्था पाहून त्यांचंही मन हेलावलं. त्यांनी माझी रजा तात्काळ मंजूर केली.

कसाबसा सामानाचा पसारा आवरून गावच्या वाटेला लागलो. आठ-दहा दिवसांचा प्रवास, वेळ सरता सरत नव्हता, रस्ता कटता कटत नव्हता. कधी एकदाचा आईला पाहीन असं झालं होतं. आईचे ते खडबडीत हात आपल्या गालांवरून फिरावेत, 'आलं माझं लेकरू,' असं म्हणत आईनं कुशीत घ्यावं अन् मीही आसुसल्या मनाने तिच्याकडून लाड करून घ्यावेत असं विचारांचं काहूर डोक्यांत माजलं होतं.

गावाच्या वेशीवर आलो, तसं जो तो हातातलं काम सोडून कावराबावरा होऊन माझ्याकडं पाहू लागला. गावातल्या पाराजवळ पोहोचलो, तसं काहीतरी विपरीत घडलंय हे मी ताडलं. हातातल्या जाडजूड ट्रंका तिथंच टाकून घराच्या दिशेनं धावत सुटलो. गावच्या वेशीपासून माझ्यामागून येणारे गावकरीही धावू लागले. मी वाड्याच्या दरवाजातून आत पाऊल टाकताच बहिणी माझ्या गळ्यात पडून रडू लागल्या.



भाऊबंद पडवीत ठिक्याच्या तळवटावर खाली माना घालून बसले होते. माझी नजर मात्र घरभर फिरत होती. माझी आई कुठे दिसते का? माझी आई कुठून येते का? 'माझं लेकरू आलं', या तिच्या आवाजातल्या शब्दांचा कानोसा मी घेत होतो. तिच्या त्या थरथरत्या स्पर्शाला माझं मन आतुरलं होतं; पण यापुढं माझी आई मला कधीच दिसणार नव्हती. मी तिला भेटायला आलो होतो; पण थोडा उशीर झाला...

## स्वाध्याय



**प्र. १. दोन–तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) लेखकाला सैनिकाच्या आयुष्यातील प्रचंड अवघड काम कोणते व का वाटते?

(आ) पोस्टमन आल्यावर बटालियनमध्ये झुंबड का उडत असे?

(इ) गावाकडचा सांगावा ऐकून लेखकाची अवस्था कशी झाली?

**प्र. २. का ते लिहा.**

(अ) कारगीलमधील उन्हाळा लेखकाला सुखावह आणि आल्हाददायी वाटतो.

(आ) लेखकाने आपल्या पत्नीच्या पत्राला बोलके पत्र म्हटले आहे.

(इ) गावाकडे जाताना रस्ता कटता कटत नव्हता असे लेखकाला वाटते.

(ई) पण थोडा उशीर झाला... असे लेखकाने म्हटले आहे.


**प्र. ३. पोस्टातील पत्राचा प्रवास कसा होतो ते माहीत करून घ्या.**

**प्र. ४. वसुंधरेचे व सैनिकाच्या मनाचे वर्णन करणारी तुम्हांला आवडलेली वाक्ये पाठातून शोधून लिहा.**

**प्र. ५. तुम्हांला एका सैनिकाची मुलाखत घ्यायची आहे, त्यासाठी प्रश्न तयार करा.**

**प्र. ६. सैनिक जसे देशाचे रक्षण करतात, तसे तुम्हांला आपल्या देशासाठी काय करावेसे वाटते?**

**प्र. ७. कारगील या ठिकाणचे विशेष वर्णन करणारे पाठात आलेले शब्द आकृतीत लिहा.**




### खेळूया शब्दांशी.

**(अ) 'मन' शब्द असलेले पाठातील वाक्प्रचार लिहा.**

**(आ) 'पाव्हणेरावळे' यासारखे तुम्हांला माहीत असलेले जोडशब्द लिहा. त्या जोडशब्दांचा वाक्यांत उपयोग करा.**

### ओळखा पाहू!

(१) हात आहेत; पण हालवत नाही.

(२) पाय आहेत; पण चालत नाही.

(३) दात आहेत; पण चावत नाही.

(४) नाक आहे; पण श्वास घेत नाही.

(५) केस आहेत; पण कधी विंचरत नाही.

# ७ ★★★★★ आपले परमवीर ★★★★★

पुरातन काळातील वीर पुरुषांच्या असामान्य पराक्रमांच्या कथा तुम्ही ऐकल्या असतील; पण आपल्या सर्वांच्या सुरक्षिततेसाठी स्वतःच्या प्राणांची आहुती देणारे शूर सैनिक आजही आपल्या देशात आहेत. त्यांच्या अतुलनीय शौर्याला वंदन करण्यासाठी त्यांना सन्मानपदके देऊन गौरवले जाते.

'परमवीर चक्र' हा भारताचा सर्वोच्च लष्करी सन्मान आहे. जमिनीवर, समुद्रात किंवा आकाशात शत्रू समोर उभा ठाकलेला असताना केवळ अजोड असे धाडस, शौर्य दाखवणाऱ्या, आत्मसमर्पण करणाऱ्या वीरांना तो प्रदान केला जातो. 'परमवीर चक्र' हा फार दुर्लभ सन्मान आहे. आतापर्यंत फक्त एकवीस वेळाच हा सन्मान प्रदान करण्यात आला आहे. त्यातील चौदा वीरांना तर तो मरणोत्तर देण्यात आला आहे.



'परमवीर चक्र' पदक दिसायला अगदी साधे आहे. कांस्य धातूपासून बनवलेले, छोट्या आडव्या दांडीवर सहज फिरेल असे. गडद जांभळी कापडी पट्टी हे त्याचे वैशिष्ट्य. पदकाच्या दर्शनी बाजूला मधोमध भारताचे राष्ट्रीय बोधचिन्ह आहे. पदकाच्या मागच्या बाजूला परमवीर चक्र हे शब्द इंग्रजी आणि हिंदीत गोलाकार कोरलेले आहेत. त्यांच्या मधे दोन कमलपुष्पे आहेत.

---

'परमवीर चक्र' पदकाचे डिझाइन सावित्रीबाई खानोलकर यांनी तयार केले. त्या मूळच्या युरोपियन; परंतु भारतीय सेनेतील एक अधिकारी विक्रम खानोलकर यांच्याशी विवाह करून त्या भारतात आल्या. या देशावर त्यांचे प्रचंड प्रेम. त्यांनी भारतीय नागरिकत्व तर घेतलेच, शिवाय भारतातील कला, परंपरांचाही खूप अभ्यास केला. मराठी, संस्कृत, हिंदी या भाषा त्या अस्खलितपणे बोलत असत.

इंद्रवज्र म्हणजे विजेचा कडाडणारा प्रहार. हे एक अजोड, अजिंक्य असे शस्त्र समजले जाते. दधीची ऋषींच्या परमोच्च त्यागामुळे हे शस्त्र अमोघ झाले आहे.

इंद्रवज्र कसे तयार झाले त्याविषयीची एक दंतकथा अशी : हजारो वर्षांपूर्वी एका राक्षसाने जगातले सगळे पाणी पळवून नेले. निष्पाप माणसे पाण्यावाचून तडफडू आणि मरू लागली. या राक्षसावर कोणत्याच साध्यासुध्या शस्त्राचा परिणाम होईना- मग ते लाकडाचे असो, नाहीतर धातूचे. त्याला हरवेल असे अमोघ शस्त्र बनवण्यासाठी काहीतरी दिव्य पदार्थ हवा होता. तो कुठे मिळणार ? दधीची ऋषींच्या हाडांमध्ये असे दिव्य सामर्थ्य होते आणि दधीची ऋषींचे मानसिक सामर्थ्यही तेवढेच मोठे होते. लोकांच्या कल्याणासाठी त्यांनी स्वतःच आपल्या प्राणांची आहुती दिली आणि आपल्या अस्थींचे दान केले. या अस्थींतूनच तळपणारे इंद्रवज्र तयार झाले. राक्षसाचे निर्दालन झाले.

दधीची ऋषींच्या अस्थींमुळे इंद्रवज्राला सामर्थ्य मिळाले. तसेच अमोघ सामर्थ्य भारतीय सेनेला मिळते, ते या परमवीरांकडून, त्यांच्या शौर्यातून, त्यांच्या अत्युच्च अशा बलिदानातून !

## २१ महान परमवीर

★ मेजर सोमनाथ शर्मा
★ लान्सनाईक करम सिंग
★ सेकंड लेफ्टनंट राम राघोबा राणे
★ नाईक जदुनाथ सिंग
★ कंपनी हवालदार मेजर पीरू
★ कॅप्टन गुरूबचन सिंग सलारिया
★ मेजर धन सिंग थापा
★ सुभेदार जोगिंदर सिंग
★ मेजर शैतान सिंग
★ कंपनी क्वॉर्टर मास्टर हवालदार अब्दुल हमीद
★ लेफ्टनंट कर्नल अर्देशीर बुरसोरजी तारापोर
★ लान्स नाईक अल्बर्ट एक्का
★ सेकंड लेफ्टनंट अरूण क्षेत्रपाल
★ मेजर होशियार सिंग
★ नायब सुभेदार बाना सिंग
★ मेजर रामस्वामी परमेश्वरन्
★ लेफ्टनंट मनोज कुमार पांडे
★ ग्रेनेडियर योगेन्द्र सिंग यादव
★ रायफल मॅन संजय कुमार
★ कॅप्टन विक्रम बत्रा
★ फ्लाईंग ऑफिसर निर्मलजीत सेखाँ

## फ्लाईंग ऑफिसर निर्मलजीत सिंग सेखाँ
## १०८७७ एफ (पी), पीवीसी.
### स्कॉड्रन नं. १८ : दी फ्लाईंग बुलेट्स



१४ डिसेंबर १९७१ रोजी शत्रूची सहा सेबर जेट विमाने श्रीनगर हवाईक्षेत्राकडे हल्ला करण्यासाठी झेपावली. तेथे नियुक्तीवर असणारे फ्लाईंग ऑफिसर निर्मलजीत सेखाँ सावध होतेच; पण धावपट्टीवर अचानक उडलेल्या धुराळ्यामुळे त्यांना उड्डाण करता येईना. धावपट्टी थोडी दिसू लागेपर्यंत शत्रूची विमाने माथ्यावर, अगदी खालून घोंगावू लागली होती, गोळ्यांच्या फैरी झाडत होती. तरीही प्राणाची पर्वा न करता फ्लाईंग ऑफिसर सेखाँचे नॅट विमान क्षणार्धात वर झेपावले. त्यांनी हल्लेखोर सेबर जेट विमानांचा प्रतिकार जोमाने सुरू केला. पाहता पाहता दोन विमानांचा त्यांनी अचूक वेध घेतला. जमिनीपासून फार थोड्या उंचीवर शत्रूच्या अधिक शक्तिशाली विमानांनी वेढले असताना निकराची लढाई त्यांनी चालूच ठेवली. शत्रू संख्येने जास्त होते; पण त्यांच्या या धाडसी हल्ल्याला पाठ दाखवून पळून गेले. श्रीनगर शहर आणि हवाईक्षेत्र बचावले.

परंतु हाय ! या भीषण युद्धात फ्लाईंग ऑफिसर सेखाँचे विमानही कोसळले आणि त्यांनी आपले प्राण गमावले.

फ्लाईंग ऑफिसर सेखाँना मृत्यू प्रत्यक्ष समोर दिसत होता, मात्र त्याही परिस्थितीत कमालीचे उड्डाण कौशल्य वापरून प्रचंड निर्धाराने ते शत्रूला सामोरे गेले. कर्तव्य म्हणून नव्हे तर असामान्य धैर्याने ते लढले. परमवीर फ्लाईंग ऑफिसर सेखाँ यांना सलाम !

---

देशसेवेसाठी प्राणांचे मोल देणाऱ्या या परमवीरचक्रधारकांची माहिती www.paramvirchakra.com. या इंटरनेटवरील संकेतस्थळावर जरूर वाचा. हे परमवीर विविध जातीधर्मांचे आहेत असे तुम्हांला दिसेल.

आपल्या जखमा आणि प्राणांतिक वेदनांची पर्वा न बाळगता परमवीरांनी शत्रूशी दोन हात कसे केले, त्यांच्या प्रेरक, स्फूर्तिदायक हकिकती जरूर मिळवा आणि वाचा.

## स्वाध्याय



**प्र. १. दोन-तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) फ्लाईंग ऑफिसर निर्मलजीत सेखाँ सावध का होते?

(आ) फ्लाईंग ऑफिसर निर्मलजीत सेखाँना उड्डाण करण्यात कोणती अडचण होती?

(इ) निर्मलजीत सेखाँनी निकराची लढाई चालू का ठेवली?

(ई) निर्मलजीत सेखाँनी श्रीनगर शहर आणि हवाईक्षेत्राचा बचाव कसा केला?

(उ) दधीची ऋषींनी लोककल्याणासाठी कोणता त्याग केला?

**प्र. २. फ्लाईंग ऑफिसर निर्मलजीत सेखाँ हे शत्रूशी धैर्याने लढले. त्याचे पाच-सहा वाक्यांत वर्णन करा.**

**प्र. ३. परमवीरचक्रधारकांची माहिती वाचून आपल्याला कोणती प्रेरणा व स्फूर्ती मिळते?**

**प्र. ४. आपले परमवीर व दधीची ऋषी यांच्यात तुम्हांला कोणते साम्य आढळते?**

**प्र. ५. परमवीर चक्राची माहिती खालील मुद्द्यांनुसार लिहा.**

परमवीर चक्र

- धातू
- कापडी पट्टीचा रंग
- पदकाची दर्शनी बाजू
- पदकाची मागची बाजू
- पदकावरील कोरलेले शब्द
- भाषा
- पुष्प

**प्र. ६. परमवीर चक्र पदकाचे डिझाइन तयार करणाऱ्या सावित्रीबाई खानोलकर यांची सहा-सात वाक्यांत माहिती लिहा.**

### खेळूया शब्दांशी.

**(अ) खालील शब्दसमूह व वाक्प्रचार यांचा वाक्यांत उपयोग करा.**

(अ) घोंगावणे.

(आ) झेपावणे.

(इ) वेध घेणे.

(ई) वेढणे.

(उ) बचावणे.

(ऊ) सामोरे जाणे.

**(आ) समानार्थी शब्द लिहा.**

(अ) सावध

(आ) लढाई

(इ) प्रत्यक्ष

(ई) शत्रू

AUVB2E

**उपक्रम :** (१) परमवीर चक्र मिळालेल्या २१ महान परमवीरांच्या नावांचा तक्ता करा. वर्गात लावा.

(२) परमवीर चक्राचे चित्र काढा, रंगवा.

**प्रकल्प :** आंतरजालावरून आपल्या परमवीरांची चित्रे मिळवा. चित्र, नाव व पाच-सहा वाक्यांत त्यांची माहिती या पद्धतीने चिकटवही बनवा.

## आपण समजून घेऊया.

- **खालील वाक्ये वाचा.**

१. **जो** लवकर उठतो **तो** निरोगी राहतो.

२. **जिला** तालबद्ध उड्या मारता येतात, **तिला** लेझीम संघात सहभाग घेता येईल.

वरील वाक्यांतील जो-तो, जिला-तिला ही संबंधी सर्वनामे आहेत.

- **खालील वाक्यांतील संबंधी सर्वनामे अधोरेखित करा.**

१. ज्यांनी बचत केली, त्यांनी आपले भविष्य सुरक्षित केले.

२. ज्याला खुंटावरचा खो खो खेळता येतो, त्याला गोल खो खो खेळता येतोच.

३. जे दुसऱ्याला मदत करतात, ते लोकप्रिय होतात.

- **खालील वाक्ये वाचा. अधोरेखित केलेली सर्वनामे पाहा.**

१. हा मुलांचा संघ कोणाचा ?

२. ही फुलांची माळ सुहासने बनवली.

३. हे क्रिकेटचे मैदान खूप मोठे आहे.

४. तो यशवंतरावांचा मुलगा आहे.

५. ती माझी मैत्रीण आहे.

६. ते सर्व खेळाडू आहेत.

७. तिला कोणी मदत केली ?

८. तुला खायला काय बनवू ?

९. हा रुमाल कोणाचा आहे ?

**हा, ही, हे, तो, ती, ते** ही दर्शक सर्वनामे आहेत. **हा, ही, हे** या शब्दांनी जवळची, तर **तो, ती, ते** या शब्दांनी दूरची वस्तू, पदार्थ किंवा प्राणी दाखवला जातो.

**कोणी, काय, कोणाला** ही प्रश्नार्थक सर्वनामे आहेत. या प्रश्नांच्या उत्तरातून नामे मिळतात. ही नामांबद्दल आलेली सर्वनामे आहेत. त्यांच्या आधारे प्रश्न विचारता येतो.



## वाचा.

अनेक खेडी, गावे आणि शहरे या सर्वांचा मिळून देश बनतो. देशाला निश्चित सीमारेषा असते. या सीमारेषेच्या आत राहणारे लोक त्या देशाचे रहिवासी असतात. भारताच्या सीमारेषेत राहणारे आपण सर्व भारतीय म्हणून ओळखले जातो.

राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत व राजमुद्रा ही आपली राष्ट्रीय प्रतीके आहेत. आपल्या राष्ट्रध्वजात तीन रंग आहेत. ते तीनही रंग आपल्याला एक निश्चित संदेश देतात. 'जनगणमन' हे आपले राष्ट्रगीत आहे. त्यात भारतातील विविध प्रदेश, नद्या व पर्वत यांचे वर्णन केले आहे. राष्ट्रगीताचा आदर करणे हे आपले कर्तव्य आहे. सारनाथ येथील अशोक स्तंभाच्या आधारे भारताची राजमुद्रा तयार करण्यात आली आहे. राजमुद्रेतील सिंहाच्या चित्राखाली 'सत्यमेव जयते' हे वचन आहे. सर्व नाणी, नोटा, शासकीय पत्रे यांवर ही राजमुद्रा असते. राष्ट्राबद्दलचे प्रेम प्रतीकांमधून व्यक्त होते. राष्ट्रीय प्रतीकांमुळे एकात्मतेची भावना दृढ होते. भारतीयांमधील ऐक्यभावना देशाच्या प्रगतीला हातभार लावते.

# ८ माय

भाग – २

- **ऐका. म्हणा. वाचा.**

हंबरून वासराले चाटते जव्हा गाय
तिच्यामंदी दिसते मले तव्हा माही माय ॥धृ॥



फनकाट्या येचायले माय जाये रानी
पायात नसे वहान साधी हिंडे अनवानी
इचू काट्यालेबी तिचा मोजत नव्हता पाय ॥१॥

सुट्टीमंदी जव्हा मी येत होतो घरी
उसनं पासनं आणून खाऊ घाले नानापरी
करू नको घाई म्हणे पोटभर खाय ॥२॥



बाप माहा रोज लावे मायच्या मागं टुमनं
बस झालं शिक्शन याचं घेऊ दे हाती रूमनं
शिकूनशानी कुठं मोठा सायेब होनार हाय ॥३॥

माय म्हने तुम्हाले माया गयाची हाये आन
भलतं सलतं सांगून त्याचे भरू नका कान
भरून येत डोयात तिच्या तापी-पूर्नामाय ॥४॥

बोलता बोलता एकदा तिच्या डोयात आलं पानी
म्हने कव्हा दिसन सांग मले राजा तुही रानी
या डोयानं पाहीन रे मी दुधावरची साय ॥५॥



म्हणून वाटते मले तुही भरावं सुखानं ओटी
पुन्हा एकदा जन्म घ्यावा माय तुझ्या पोटी
अन् ठेवावे माय घट्ट धरून तुहे पाय ॥६॥

**स.ग.पाचपोळ**–(१९५०-२००५) काव्यरसिकांच्या मनाला भुरळ घालणारे प्रसिद्ध कवी. एस.ई.एस. कनिष्ठ महाविद्यालय, साखरखेर्डा येथे मराठी व समाजशास्त्र विषयाचे प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. 'स.ग. पाचपोळांची कविता' हा त्यांचा कवितासंग्रह प्रसिद्ध आहे.

एका अशिक्षित आईची मुलाच्या शिक्षणासाठी रात्रंदिवस कष्ट करण्याची तयारी आणि आईविषयी मुलाला वाटणारी कृतज्ञतेची भावना याचे चित्रण कवीने समर्पक शब्दांत या कवितेतून व्यक्त केले आहे.

AV5742



## स्वाध्याय

**प्र. १. चार-पाच वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) कवितेतील कष्टकरी आईची अवस्था कशी आहे ?

(आ) कवी सुट्टीत घरी आल्यावर आई त्याच्यासाठी काय करत असे ?

(इ) कवीच्या आईचे डोळे का भरून येतात ?

(ई) आईच्या पोटी पुन्हा जन्म घ्यावा, असे कवीला का वाटते ?

(उ) आईसाठी कवीला काय करावेसे वाटते ?

**प्र. २. कोण, कोणास व का म्हणाले ?**

(अ) करू नको घाई म्हणे पोटभर खाय.

(आ) बस झालं शिक्शन याचं घेऊ दे हाती रूमनं.

(इ) या डोयानं पाहीन रे मी दुधावरची साय.

(ई) अन् ठेवावे माय घट्ट धरून तुहे पाय.

**प्र. ३. कविता वाचताना तुम्हांला कोणकोणते प्रसंग अस्वस्थ करतात ते लिहा.**

**प्र. ४. या कवितेचे स्वत:च्या शब्दांत रूपांतर करून कथा लिहा. तुमच्या कथेला योग्य शीर्षक द्या.**

**प्र. ५. 'माझी आई' या विषयावर दहा ते पंधरा ओळी लिहा.**


**प्र. ६. खालील शब्द पाहा.**

**वहाण-चपला, वाहन-प्रवासाचे साधन.**


**उच्चारात बरेच साम्य असलेले; पण अर्थ भिन्न असलेले असे शब्द माहीत करून घ्या. लिहा. त्यांचे अर्थ समजून घ्या.**

### खेळूया शब्दांशी.

**(अ) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.**




**(आ) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.**




**(इ) गळ्याची आण घालणे, कान भरणे हे वाक्प्रचार या कवितेत आलेले आहेत. गळा व कान या अवयवांवरील वाक्प्रचार माहीत करून घ्या व त्यांची यादी तयार करा.**

**उपक्रम :** (१) साने गुरुजींचे 'श्यामची आई' हे पुस्तक वाचा.

(२) 'आई' या विषयावरील कवितांचा संग्रह करा.

- **खालील वाक्यांतील सर्वनामांना अधोरेखित करा.**

१. राधा म्हणाली, 'प्रशांत, तू किती छान गाणे गातोस.'

२. ती माझी बहीण आहे.

३. कोणी कोणाशी भांडू नये.

४. ज्याला बाहेर फिरायला जायचे आहे, त्याला मी घेऊन जाईन.

५. मला कोणी काही विचारू नये.

६. सदा माधवच्या बाबांना म्हणाला, 'हा मला त्रास देतो, त्याला मी समजावून सांगितले; पण तो त्याचेच म्हणणे खरे करतो.'

- **गाळलेल्या जागी कंसातील योग्य सर्वनाम लिहा.**

१. ········· वह्या मुलांना द्या. (हा, ही, ह्या)

२. त्याला ········· आवडते? (काय, कोणते, कोणी)

३. ········· आकाशकंदील बनवले.(तू, आम्ही, कोणी)

४. मी ········· स्वयंपाकघर स्वच्छ केले. (आपण, स्वत:, त्याने)

५. त्याने ········· काही सांगितले नाही. (कोणाला, कोणी, काय)

- **खालील चित्र पाहून रिकाम्या जागी योग्य पुरुषवाचक सर्वनाम लिहा.**



१. ········· आज पतंग उडवणार आहे.

२. ········· पतंग छान उडवते.

३. मैदानावर ········· पतंग घेऊन गेलो.

४. ········· पतंग उडवूया.

५. पतंग उडवण्यात ········· तरबेज आहेत.

- **खाली दिलेल्या सर्वनामांचा उपयोग करून वाक्ये लिहा.**

१. कोण – ·································

२. हे – ·································

३. ती – ·································

४. काय – ·································

५. कोणाचा – ·································

६. ही – ·································

# ९ वारली चित्रकला

**डॉ. गोविंद गारे**–(१९३९–२००६) व्यासंगी लेखक, संशोधक, विचारवंत आणि साहित्यिक. आदिवासी हा त्यांच्या चिंतनाचा विषय. महाराष्ट्र राज्याच्या पुणे येथील आदिवासी सांस्कृतिक संग्रहालयाचे जनक म्हणून यांना ओळखले जाते. 'आदर्श आश्रमशाळा', 'आदिवासींचा प्रश्न', 'भारतीय आदिवासी–साहित्य आणि संस्कृती' इत्यादी लेखन प्रसिद्ध.

भारतीय संस्कृती विविध कलांनी समृद्ध झालेली आहे. या सर्व कलांमध्ये त्या संस्कृतीचे प्रतिबिंब पडलेले दिसते. निसर्गाशी नाते जोडणाऱ्या व जगण्याकडे सकारात्मकतेने पाहणाऱ्या वारली चित्रकलेविषयीची माहिती या पाठात आलेली आहे. महाराष्ट्रातील आदिवासी कला असलेली ही वारली चित्रकला मानवी जीवन समृद्ध करते.

- गायनकला, नृत्यकला व चित्रकला यांसारख्या कलांतून आपल्याला आनंद मिळतो. यासारखी कोणती कला जोपासावी असे तुम्हांला वाटते? का ते लिहा.

भारतीय सांस्कृतिक जीवनाच्या समृद्धीमागे आदिवासी कलेचा मोठा आधार आहे. नागरी संस्कृतीच्या प्रभावापासून मुक्त, परंपरागत चालत आलेले निसर्गप्रेम, सहज उपलब्ध साहित्यातून झालेला उत्स्फूर्त आविष्कार म्हणजे आदिवासी कला असे या कलेचे सोपे समीकरण मांडता येईल.



महाराष्ट्राला आदिवासी कलांचा समृद्ध वारसा लाभलेला आहे. त्यांत वारली चित्रे, लाकडी कोरीव काम, मुखवटे, मृण्मूर्ती, धातुकाम, पाषाणमूर्ती, वाद्य, शिकारीची साधने व इतर कलात्मक वस्तू यांचा समावेश होतो. आदिवासी कलांचा हा वारसा निश्चितच वरच्या दर्जाचा आहे.

आदिम कलेची मूळ बीजे वारली चित्रकलेत विकसित झालेली दिसतात. वारली प्रदेशांत छोट्या–छोट्या पाड्यांतील घराच्या कुडांवर व भिंतींवर चौकोन–त्रिकोणाकृतींची अनेक चित्रे काढलेली असतात. वारली चित्रकलेचा परिपोष संस्कृती, परंपरा व परिसरातील निसर्गसंपत्तीचा आधार घेऊन झालेला आहे. त्यामुळेच वारली चित्रकलेत धार्मिक विधी, लग्नविधी, दैनंदिन जीवन व लोकजीवन चितारलेले दिसते. त्यात आजूबाजूचा परिसर, परिसरातील पशुपक्षी, वृक्षवेली, नदीनाले, डोंगर, पहाड, वने, जंगले, नृत्ये, घरदार, शेतीचे हंगाम, शिवार, जत्रा इत्यादी विषयांना धरून भित्तिचित्रे रेखाटलेली दिसतात.

वारली चित्रकला समजून घ्यायची झाल्यास वारली लोकांच्या छोट्या छोट्या वस्त्यांवर फिरून लोकांना बोलते करावे लागते आणि त्यांच्यातील कला आविष्काराचा शोध घ्यावा लागतो. तांदळाच्या पिठात पाणी ओतून त्या द्रवाने बांबूच्या काड्यांनी रंगवलेली पांढरीशुभ्र वारली चित्रे लहान मुलांनी काढलेल्या चित्रांसारखी वाटतात; परंतु चित्रांचे आकार मात्र, निसर्गातून प्रेरणा घेऊन तयार झालेले असतात.

वारली चित्रांतील आकार व रेषा प्रमाणबद्ध नसल्या तरी वारली चित्रकारांच्या निरीक्षणाची व कल्पनाशक्तीची दाद द्यावी लागते. कलेचे कोणतेही शास्त्रशुद्ध शिक्षण या लोकांनी घेतलेले नसताना इतकी

अप्रतिम चित्रे त्यांना सुचतात कशी? असाही प्रश्न पाहाणाऱ्याच्या मनात निर्माण होतो. रंगाचा अतिशय कमी वापर. उदा., तांदळाचे पीठ, गेरू, काजळी,



हळद, कुंकू, रंगीत फुले व झाडांचा चीक यांचा उपयोग ते चित्र रंगवण्यासाठी करतात. चित्र काढण्यासाठी साधे 'रफ स्केच' देखील तयार करत नाहीत. सुचतील तसे आकार ते गुंफत जातात.

रोजच्या जीवनातील त्यांच्या चित्रांत त्रिकोण, चौकोन, वर्तुळ हे मूलभूत आकारच असतात. चित्रांत जी उभी रेषा रंगवलेली असते ते आपले शरीर. त्यांच्या चित्रांतील झाडे पाहा. वारली चित्रकार ही झाडे रंगवताना नेहमीच मुळाकडून वर शेंड्यापर्यंत रंगवतो. अगदी सहजपणे त्यातून झाड वर उगवण्याची भावना प्रकट होते. अन्य चित्रकार झाड काढताना त्याच्या नेमके उलट म्हणजे वरून खाली रेषा काढतात. वारली लोकांच्या मते खाली भूमीकडे जाणारे म्हणजे मृत्यूकडे नेणारे नकारार्थी जीवन असते, तर भूमीतून वर उगवणारे म्हणजे जीवनाचा विकास करणारे उदयोन्मुख जीवन असते.

लग्नप्रसंगी झोपड्या रंगवताना आधी चौक काढला जातो. धार्मिकदृष्ट्या या चित्राला खूप मान दिला जातो. सात-आठ स्त्रिया मिळून हे चित्रण पूर्ण करतात. लग्नाच्या आदल्या दिवशी मांडव असतो. त्या दिवशी ही भित्तिचित्रे चितारण्याचे काम केले जाते. 'धवलेरी' ही आदिवासींची पुरोहित समजली जाते. 'धवलेरी' स्त्रिया लग्न लावण्याचा विधी पारंपरिक पद्धतीने पार पाडतात.

वारली संस्कृतीत भित्तिचित्रांतील रेषाकृतींना आगळेवेगळे महत्त्व असते. वारली चित्रकार भौमितिक आकाराची चित्रे काढत असतात. चंद्राच्या गरगरीत वाटोळ्या आकारातून त्याने गोल घेतला. पानाच्या आकारातून त्याने त्रिकोण, अंडाकृती आकार घेतले. पाकळ्या आणि फांद्यांच्या आकारातून बाक आणि वळणे घेतली. चंद्रकला व इंद्रधनुष्य यांतून त्याने कमान व अर्धवर्तुळ पाहिले आणि पक्ष्यांच्या भराऱ्या व माशांच्या पोहण्याच्या निरीक्षणाने समांतर व उभे-आडवे रेषांचे आकार तो शिकला. जवळ जवळ असलेले पाच तारे पाहताना, ते एखाद्या रेषेने जोडले गेल्याचा आभास निर्माण होऊन त्याला पंचकोन मिळाला. अनेक आश्चर्यकारक आकार व रचनांची प्रेरणा अशीच त्याला साध्या साध्या रेषा आणि वळणे यांच्या अवलोकनातून मिळाली. निसर्ग आणि सृष्टीला समजून घेण्याची व ती चित्राकृतीतून प्रगट करण्याची त्यांची ही कला विचार करण्यासारखी आहे.







वारली चित्रकला आता वारली समाजाच्या बाहेर पडली असून तिचा वापर सर्वत्र होताना दिसतो. आजकाल टी-शर्ट्स, साडी, कुर्ता, बेडशीट्स, पिशव्या, पर्स, भेटवस्तू, भेटकार्ड यांवर वारली चित्रकला रेखाटलेली दिसते. घराच्या भिंती, घराची अंतर्गत सजावट यांसाठी देखील वारली चित्रकलेचा मोठ्या प्रमाणावर वापर होताना दिसतो. वारली चित्रकलेमुळे महाराष्ट्राची मोहोर देशभरातच नव्हे, तर परदेशांतही उमटली आहे.

## स्वाध्याय



**प्र. १. दोन–तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) महाराष्ट्रातील आदिवासी कलांचा समृद्‌ध वारसा कशाकशातून दिसून येतो?

(आ) आदिवासी लोक चित्रे काढताना कोणकोणत्या साहित्याचा वापर करतात?

(इ) वारली चित्रकार झाडे कशी रंगवतात?

(ई) वारली चित्रकाराने पाकळ्या व फांद्यांच्या आकारांतून काय घेतले?

(उ) वारली चित्रकला समजून घेण्यासाठी काय करावे लागते?

**प्र. २. थोडक्यात उत्तरे लिहा.**

(अ) वारली चित्रकलेत कोणकोणत्या विषयाला धरून भित्तिचित्रे रेखाटलेली आहेत?

(आ) वारली चित्रकार त्यांच्या चित्रकलेतून जीवनाबद्‌दलचा सकारात्मक दृष्टिकोन कसा मांडतात?

**प्र. ३. शाळेच्या किंवा वर्गाच्या भिंतींवर चित्रे काढायची आहेत. त्यासाठी तुम्ही कोणकोणते विषय सुचवाल?**

**प्र. ४. वारली कला आता वारली समाजाच्या बाहेर पडली आहे असे का म्हटले असेल?**

### खेळूया शब्दांशी.

**(अ) हे शब्द असेच लिहा.**

पशुपक्षी, पाषाणमूर्ती, प्रमाणबद्‌ध, शास्त्रशुद्‌ध, उदयोन्मुख, संस्कृती, इंद्रधनुष्य, सृष्टीला, चित्राकृती, भित्तिचित्रे, अर्धवर्तुळ, भौमितिक.

**(आ) 'घरदार' या शब्दासारखे पाठातील जोडशब्द शोधून लिहा.**

**(इ) खालील शब्दांची फोड करा.**

उदा., धातुमूर्ती → धातूची, मूर्ती

मृण्मूर्ती → ____ , ____

पाषाणमूर्ती → ____ , ____

सुवर्णमूर्ती → ____ , ____

### शोध घेऊया.

(अ) महाराष्ट्रातील कोणत्याही एका आदिवासी लोकजीवनाविषयी माहिती मिळवा व वर्गात सांगा.

(आ) आंतरजालाच्या साहाय्याने महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांत असणाऱ्या आदिवासी जमातींची माहिती पुढील मुद्द्यांच्या आधारे घ्या. उदा., आदिवासी जमातींची नावे, पोशाख, सण, लोकगीते, लोककला, नृत्य, घरे इत्यादी.

**प्रकल्प :** (१) वारली प्रसंगचित्रे काढा. रंगवा व वर्गात प्रदर्शन भरवा.

(२) वारली चित्रांच्या कात्रणांपासून भेटकार्डे बनवा व विशेष प्रसंगी भेट द्या.

(३) वारली चित्रांमध्ये काढावयाचे काही आकार खाली दिलेले आहेत. त्यांचे निरीक्षण करा. त्याप्रमाणे पुढील चौकोनात चित्रे काढा. चित्रात रंग भरा. ही चित्रे रेखाटतांना तुम्हांला आलेले अनुभव लिहा. ही चित्रे काढताना तुम्ही कोणकोणते आकार रेखाटले ?



**आपण समजून घेऊया.**

- **खालील शब्दसमूहातील नाम व विशेषण यांचे सारणीनुसार वर्गीकरण करा.**

पिवळसर गुलाब, मोठा चेंडू, मसालेदार भाजी, लालचुटूक कळी, स्वच्छ रुमाल, टवटवीत चेहरा, निळेशार पाणी, रागीट घोडा.

उदा.,

| नाम | विशेषण |
|---|---|
| गुलाब | पिवळसर |

नामाविषयी अधिक माहिती सांगणारे **'विशेषण'** असते. ते नाम त्या विशेषणाचे **'विशेष्य'** असते. उदा., लालभडक जास्वंद. या उदाहरणात लालभडक हे विशेषण व जास्वंद हे विशेष्य होय. वरील शब्दसमूहातील गुलाब, चेंडू, भाजी, कळी, रुमाल, चेहरा, पाणी, घोडा ही नामे आहेत. म्हणजे वरील विशेषणांचे ते विशेष्य आहेत.

**विशेषणांचे प्रकार**

- गुणवाचक विशेषण
- संख्यावाचक विशेषण
- सार्वनामिक विशेषण

- **खालील शब्दसमूह वाचा.**

हुशार कावळा, आंबट बोरे, कच्चा आंबा, उंच इमारत, काळा खडक, हिरवागार पोपट

आपण वरील अधोरेखित नामांना जी विशेषणे लावली आहेत, ती गुणवाचक विशेषणे होय. ही गुणवाचक विशेषणे नामांचे रंग, रूप, आकार, चव सांगणारी विशेषणे असतात.

- **खालील वाक्यांत मोकळ्या जागी कंसात दिलेल्या गुणवाचक विशेषणांपैकी योग्य विशेषण लिहा.**

(पांढरे, प्रचंड, भव्य, जाडेभरडे, आंबट)

१. समुद्रात ········· लाटा उसळतात.


२. तिच्या अंगावर ········· कपडे होते.

३. मला ········· फूल आवडते.

४. मी खाल्लेली संत्री ········· होती.

५. आबासाहेबांनी ········· वाडा बांधला.

- **पुढील चित्राचे निरीक्षण करा आणि विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**



१. चित्रात एकूण किती मुले आहेत?

२. चित्रात किती मांजरे आहेत?

३. मांजराच्या कितीपट मुले आहेत?

४. घरावर किती कौले आहेत?

उत्तरांमध्ये लिहिलेल्या शब्दांना **संख्यावाचक विशेषण** म्हणतात. प्रश्न चारच्या उत्तरातील खूप, असंख्य, अनेक, अधिक हे शब्ददेखील संख्यावाचक विशेषणे आहेत.

- **खाली दिलेल्या वाक्यांत योग्य विरामचिन्हे घाला.**

(अ) अहमद कुठे गेला आहे

(आ) ढग खूप गर्जत होते पण पाऊस पडला नाही

(इ) शर्वरी आंबा खाते

(ई) बापरे केवढी मोठी ही गुहा

(उ) प्रामाणिक हुशार मेहनती मुले सर्वांना आवडतात

**शिक्षकांसाठी :** विशेषणाच्या विविध प्रकारांची उदाहरणे देऊन उपयोजनात्मक सराव करून घ्यावा.

# १० सुगंधी सृष्टी

**ना. ग. गोरे –** (१९०७-१९९३) भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्वातंत्र्य सैनिक. उत्तम वक्ते. सृष्टिसौंदर्याकडे संवेदनशील वृत्तीने बघणारे कवी. चिंतनशीलता व अभिजात रसिकता ही त्यांची लेखन वैशिष्ट्ये. 'सीतेचे पोहे', 'डाली', 'गुलबशी', 'शंख आणि शिंपले' हे ललित लेख संग्रह प्रसिद्ध. 'काही पाने काही फुले', 'चिनारच्या छायेत' या ललित स्वरूपाच्या लेखनातून सृष्टिसौंदर्याकडे संवेदनशील वृत्तीने पाहणारे लेखक.

ज्यांच्या सुगंधाने आपण मोहित होतो; त्या सुगंधी फुलांची झाडे कशी लावतात, त्यांना जागा किती लागते, कोणत्या फुलझाडावर किती मेहनत घ्यावी लागते, याचे सूक्ष्म वर्णन या पाठात आले आहे. फुले आपला रंग, गंध, डौल दुसऱ्यांवर उधळतात, हे जणू फुलांचे दानच होय. या सुगंधी सृष्टीचे जनमाणसाला देण्याच्या प्रवृत्तीचे दर्शन या पाठातून लेखकाने घडवले आहे.




- गुलाबाला 'फुलांचा राजा' का म्हणत असावे, असे तुम्हांला वाटते?
- कोणकोणत्या रंगांची गुलाबाची फुले तुम्ही पाहिली आहेत?
- कोणत्या रंगाचे गुलाबाचे फूल तुम्हांला सर्वांत जास्त आवडते?

मी लहान होतो तेव्हा आमचे बिऱ्हाड पुण्यास शनिवार पेठेत असे. तेथे घराच्या पत्र्यावर रॉकेलच्या तोंड कापलेल्या डब्यात मी एक मोगऱ्याचे कलम कोठूनतरी मिळवून लावले होते. हातभर उंचीच्या त्या रोपट्यावर पहिली कळी मोहरली, तेव्हापासून ती फुलेपर्यंत मी रोज दहादा त्या कुंडीपाशी जाऊन येई. मुगाच्या दाण्याएवढी आणि पोपटी रंगाची ती कळी वाढता वाढता टपोर वाटोळी झाली, तकतकीत पांढरी दिसू लागली; उत्कट आतुर भासू लागली. आई म्हणाली, 'आज ती फुलणार हो बहुतकरून.' संध्याकाळी सहाच्या सुमाराला कळीच्या कुंडीतली एक पाकळी जरा बाजूला झाली. अंमळशाने दुसरी पाकळी, मग तिसरी. सुगंधी पेटीचा एक एक खणच जणू उघडत चालला होता.



मी कुंडीशेजारी बसून राहिलो. निरुपाय म्हणून जेवायला खाली जाऊन वर परत येतो, तेवढ्यात तो चमत्कार पूर्ण झाला होता. कळीची सारी दले साफ उघडली होती. मोगरा फुलला होता! रात्रीच्या अंधारात पांढरेशुभ्र आणि घसघशीत दिसणारे ते फूल पाहिल्यावर आणि त्याचा मनाला वेडावून टाकणारा वास घेतल्यावर, मला जे काही वाटले त्याचे वर्णन मी कसे करू? मी लावलेल्या झाडाचे ते फूल म्हणून माझ्या आनंदात अभिमानाची साखर पडली होती ती वेगळीच.



मोगऱ्याप्रमाणेच निशिगंधाचेही झाड लावायला सोपे. शिवाय ते दिसायलासुद्धा सुंदर. रोप पूर्ण वाढून त्याच्या दांड्यावर एकापाठोपाठ फुले फुलू लागली, की रोज रात्री नवा आनंद घ्यावा आणि निशिगंधाचे फूल असते तरी किती डौलदार! हिरव्यागार छडीवर हारीने टोकापर्यंत लागत गेलेली त्याची फुले पाहिली म्हणजे निशिगंधाला गुलछडी असे दुसरे नाव का पडले आहे, ते सहज लक्षात येते.

पण मोगरा काय किंवा निशिगंध काय, स्वभावाने लाजाळू नाहीत. आपला रंग, आपला गंध, आपला डौल ते लपवत नाहीत. निशिगंध तर आपले सारे वैभव चवड्यावर उभा राहून जगाला दाखवत असतो.

मोगरा, निशिगंध ही जशी सुगंधी फुले तसाच गुलाब; पण ह्या स्वारीचा रुबाब काही औरच असतो. गुलाबासारखे सोपस्कार करून घेणारे झाड मी तर पाहिलेच नाही. गुलाबाला वाटेल ती जागा चालणार नाही, पाणी कमी झाले तरी त्याला सोसणार नाही नि अधिक झाले तरीही सोसणार नाही. त्याला खत वेळच्या वेळी मिळाले पाहिजे, मुळे मोकळी झाली पाहिजेत, हंगाम साधून छाटणी केली पाहिजे, कीड टिपून मारली पाहिजे, एवढे सगळे करावे तेव्हा हे राजेश्री फुलणार. एकदा गुलाब प्रसन्नपणाने फुलू लागला, की केलेले सगळे श्रम मनुष्य विसरून जातो. नव्हे, त्याचे सारे श्रम भरून येतात. गुलाबाच्या फुलाची ऐट काय वर्णावी? किती त्याचे आकार, किती रंग, किती गंध! त्यांना सीमा नाही. त्यावेळी मी आयुष्यात प्रथमच काळा गुलाब पाहिला! काळसर मखमलीसारख्या पाकळ्यांचे ते फूल म्हणजे एक अजब चीज होती.



सायलीची वेल एकदा आळे करून लावली, की मग तिच्याकडे फारसे लक्ष नाही दिले तरी चालते. बाराही महिने ती फुललेली राहते.

पारिजातक तर कमालीचा निरिच्छ. तो कोठेही लावा. त्याला पाणी द्या नाहीतर देऊ नका. पावसाळी ढग आभाळात भरून आले आणि त्यातून अमृताचा शिडकाव सुरू झाला की ह्या रांगड्या झाडाला कसला आनंद होतो कोणास कळे. त्याच्या पांढुरक्या गांठाळ अंगोपांगांतून हिरवे रोमांच फुटतात. अगदी बुंध्यापासून शेंड्यापर्यंत आणि मग त्याला सुगंधाची झुंबरे लटकतात. सकाळी पारिजातकाखालून जाणे म्हणजे पुण्यपावन भूमीवरून जाण्यासारखेच निदान मला तरी वाटते.



पाऊल टेकावे तरी कोठे? साऱ्या भूमीवर त्या वृक्षराजाची उदारता अंथरलेली असते ना? कसे ठेवायचे पाऊल? आपले अच्युतराव पटवर्धन बोलण्यात किती मार्मिक आहेत. ते एकदा म्हणाले, 'द्यावे तर पारिजातकासारखे द्यावे. तो मूठ पुरेपूर उघडून देतो. काही म्हटल्या काही मागे ठेवीत नाही. वा! ह्याला म्हणावे दान!'

## स्वाध्याय



**प्र. १. तीन-चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) सुगंधी पेटीचा एक एक खणच जणू उघडत चालला होता, असे लेखकाने कशाला म्हटले आहे?

(आ) निशिगंध आपले सारे वैभव चवड्यावर उभा राहून जगाला दाखवत असतो असे लेखकाला का वाटते?

(इ) लेखकाने गुलाबाचे वर्णन कोणत्या शब्दांत केले आहे?

(ई) लेखकाला सकाळी पारिजातकाखालून जाताना पुण्यपावन भूमीवरून जाण्यासारखे का वाटते?

**प्र. २. तुमच्या शब्दांत उत्तरे लिहा.**

(अ) तुम्हांला कोणकोणती फुले जास्त आवडतात? ती का आवडतात?

(आ) तुमच्या मते फुलांनी माणसाला कोणता अनमोल संदेश दिला आहे?

(इ) या पाठात गुलाबाला राजेश्री तर निशिगंधाला गुलछडी म्हटले आहे, का ते सांगा.

**प्र. ३. पारिजातकाचे फूल तुमच्याशी बोलते आहे अशी कल्पना करून आठ ते दहा वाक्ये लिहा.**

### खेळूया शब्दांशी.

**(अ) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.**

(अ) बिऱ्हाड -    (इ) सुवास -
(आ) मोठी -    (ई) कष्ट -

**(आ) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.**

(अ) निरुपाय x    (इ) प्रसन्न x
(आ) पांढराशुभ्र x    (ई) उदार x

**(इ) खालील शब्दाला 'दा' प्रत्यय लागून तयार होणारे नवीन शब्द लिहा.**

उदा., दहा - दहादा, पाच - पाचदा

(अ) एक -    (आ) शंभर -    (इ) हजार -

**(ई) डौल-डौलदार यांसारखे 'दार' प्रत्यय लागलेले आणखी शब्द लिहा.**

**(उ) खालील शब्दांचा वाक्यांत उपयोग करा.**

(अ) घसघशीत    (इ) उदारता
(आ) रांगडा    (ई) टिपून मारणे

**(ऊ) या पाठात रंगांच्या अनेक छटा आल्या आहेत. उदा., पांढरा, तकतकीत पांढरा, पांढरेशुभ्र, पांढुरका. याप्रमाणे तुम्हांला माहीत असलेल्या रंगांच्या विविध छटा लिहा.**

(अ) हिरवा    (इ) काळा
(आ) लाल    (ई) पिवळा

**(ए) खालील शब्द पाहा.**

वास-वास्तव्य, वास-गंध.

उच्चार एकच असलेले, पण अर्थ भिन्न असलेले असे शब्द माहीत करून घ्या. लिहा. त्यांचे अर्थ समजून घ्या.

## हे करून पाहूया.

**(अ) काही फुले रात्री फुलतात तर काही दिवसा फुलतात. काही फुलांची झाडे बियांपासून, तर काही खोडापासून/फांदीपासून तयार होतात. अशा फुलझाडांचे निरीक्षण करा व पुढील तक्त्यात नोंद करा.**

| | |
|---|---|
| रात्री फुलणारी फुले | |
| दिवसा फुलणारी फुले | |
| बियांपासून तयार होणारी फुलझाडे | |
| फांदी/खोडापासून तयार होणारी फुलझाडे | |

**(आ) लेखकाने पत्र्याचा डबा कापून कुंडी बनवली, त्याप्रमाणे तुम्हीही टाकाऊ वस्तूंपासून कुंड्या बनवा व निसर्ग फुलवा.**

**(इ) तुम्हांला आवडणाऱ्या कोणत्याही तीन फुलांची चित्रे काढा.**

**(ई) खालील शब्द वापरून अर्थपूर्ण परिच्छेद तयार करा.**

झाड, फुले, नदी, वाट, पाऊस, डोंगर, धरण, पक्षी, प्राणी

**(उ) खालील कृती करा.**

पिंपळाचे पान घ्या. एका भांड्यात पाणी घेऊन त्यात ते पान भिजत ठेवा. काही दिवस पान पाण्यातच ठेवा. नंतर त्या ओल्या पानाला पाण्यातून बाहेर काढा, पुसा व वहीत व्यवस्थित झाकून ठेवा. असे झाका की जेणेकरून ते सरळ स्थितीतच राहील. काही दिवसांनी हळुवार हाताने झाकून ठेवलेले पान काढा. मऊ कापडाने पुसा. जाळीदार पान तयार होईल. पाण्याचे रंग (वॉटर कलर) घ्या. तुमच्या आवडत्या रंगाने सुंदर फुले, पाने काढा. लक्षात ठेवा की रंगात पाणी मिसळायचे नाही. घट्ट रंगाने रंगवा. एक छानसे, सुंदर चित्र तयार होईल.



- पिंपळाच्या पानावरील चित्र तयार करताना तुम्ही कोणकोणत्या कृती केल्या ते क्रमवार लिहा.
- कागदावर काढलेले चित्र व पिंपळाच्या पानावरील चित्र रंगवताना तुम्हांला कोणता फरक जाणवला ? तुमचा अनुभव लिहा.

**उपक्रम :** तुम्हांला आवडणारी फुलझाडे घराच्या किंवा शाळेच्या परिसरात लावा व त्यांची काळजी घ्या.

**प्रकल्प :** काही फुलांचा उपयोग करून वस्तू, पदार्थ बनवले जातात. उदा., गुलाबापासून गुलकंद. याप्रमाणे तुम्हांला माहीत असलेल्या इतर काही फुलांपासून तयार होणाऱ्या वस्तू, पदार्थ यांची माहिती घ्या व त्यांची यादी तयार करा.

## माहिती मिळवूया.

**फुलांना रंग कशामुळे प्राप्त होतो?**

फुलांमध्ये दोन प्रकारची रंगद्रव्ये असतात. हरितद्रव्ये, कॅरोटीन यांमुळे नारिंगी, पिवळा, हिरवा हे रंग फुलांच्या पाकळ्यांना मिळतात, तर लाल, गुलाबी, निळा वगैरे रंग फुलांमधील अँथोसायनीन या रंगद्रव्यांमुळे मिळतात. ही रंगद्रव्ये पाण्यात विरघळू शकतात. ज्या वेळी फुलांना जीवनरसाचा पुरवठा होतो, त्या वेळी त्यात ही रंगद्रव्ये विरघळतात.

कोणत्या फुलांत कोणती रंगद्रव्ये असावीत हे त्यांतील गुणसूत्रे ठरवतात आणि गुणसूत्रे आनुवंशिक असल्यामुळे त्या त्या फुलांचा रंग ठरावीकच असतो, रंग बदलत नाही.

## आपण समजून घेऊया.

- **खालील परिच्छेदातील संख्याविशेषणे अधोरेखित करा.**

अल्लाउद्दीन व फरिदा दोघे शाळेत निघाले. वाटेत एक भेळेचे दुकान होते. दुकानात अनेक प्रकारची चिक्की व फुटाणे मिळत असत. फरिदाकडे पाच रुपयांचे नाणे होते. तिने अडीच रुपयांत शेंगदाण्याच्या चिक्कीचे पाकीट घेतले, तर अल्लाउद्दीनने उरलेल्या अर्ध्या पैशांत फुटाणे घेतले. सगळे पैसे संपले. भरपूर फुटाणे आले. पसाभर फुटाणे त्याने फरिदाला दिले, तर तिने थोडीशी चिक्की अल्लाउद्दीनला दिली.

- **खालील वाक्यांतील मोकळ्या जागी कंसात दिलेल्या संख्यावाचक विशेषणांपैकी योग्य विशेषण लिहा.**

(एकेक, सहस्र, द्विगुणित, दुप्पट, पाच)

१. अविनाशला ........... भाषा येतात.

२. सूर्याच्या ........... किरणांनी जमिनीला स्पर्श केला.

३. ........... बेडूक उड्या मारत पसार झाले.

४. आईला पाहताच तिचा आनंद ........... झाला.

५. भुकेच्या तडाख्यात मीनाने ........... चपात्या खाल्ल्या.

- **खालील शब्द वाचा.**

ही खारूताई, माझी वही, ज्याचे पत्र, त्याचा रुमाल, कोणता पेढा, आम्ही मैत्रिणी, त्याचा सदरा, तिच्या वेण्या. वरील शब्दांतील ही, माझी, ज्याचे, त्याचा, कोणता, आम्ही, त्याचा, तिच्या ही सर्वनामे आहेत; पण या सर्वनामांपुढे नामे आली आहेत. ही सर्वनामे त्यांच्यापुढे आलेल्या नामांबद्दल विशेष माहिती सांगतात. म्हणजे ती विशेषणाचे कार्य करतात, म्हणून ही सर्वनामे सार्वनामिक विशेषणे आहेत.

मी, तू, तो, हा, जो, कोण, काय ही सर्वनामे असली तरी सार्वनामिक विशेषणे म्हणून काम करताना नेहमीच त्यांच्या मूळ स्वरूपात न येता त्यांच्या स्वरूपात बदल होतो.

| सर्वनाम | सार्वनामिक विशेषण |
|---|---|
| मी<br>तू<br>तो<br>ती<br>आम्ही<br>तुम्ही | माझा, माझी<br>तुझा, तुझी<br>त्याचा<br>तिचा, तिची, तिचे<br>आमचा, आमची<br>तुमचा |
| हा<br>तो<br>जो<br>कोण<br>काय | असा, असला, इतका, अमका, एवढा<br>तसा, तसला, तितका, तेवढा, तमका<br>जसा, जसला, जितका, जेवढा<br>कोणता, केवढा<br>कसा, कसला |

- **खालील दिलेल्या विरामचिन्हांची चौकटींत नावे लिहा.**

| | | | |
|---|---|---|---|
| ? | | . | |
| , | | – | |
| “ ” | | ‘ ’ | |
| ; | | ! | |

- **खाली चार चित्रे दिलेली आहेत. त्यांचा सहसंबंध लावून तुमच्या शब्दांत कथा तयार करा व सांगा.**




## विचार करून सांगूया.



मनोहर आला की धमाल असते. तो खेळतो मस्त, बोलतो मस्त, उत्तरेही पटापट देतो. त्याला छान गाता येते; पण आज काही तो शाळेला आला नाही. मनोहर आज शाळेत का आला नसेल?

# ११ माझ्या आज्यानं पंज्यानं


- ऐका. म्हणा. वाचा.



माझ्या आज्यानं पंज्यानं
रोज इनल्या येसणी,
तुझ्या मातले गोरपे
तवा करीती पेरणी.



माझ्या आज्यानं पंज्यानं
किती इनल्या गोफणी,
तवा नेमानं चालते
तुझ्या रानाची राखणी.



माझ्या आज्यानं पंज्यानं
रोज वळली चऱ्हाटं,
पाट भरून वाह्याची
तुझ्या रानातली मोटं.



माझ्या आज्यानं पंज्यानं
रोज इनल्या रं बाजा,
येतो दमून रेघाळ्या
पाठ टेकवितो राज्या.

माझ्या आज्यानं पंज्यानं
रोज वळल्यात काण्या,
तुझ्या दुभत्या म्हशीला
रोज बांधया दावण्या.



माझ्या आज्यानं पंज्यानं
पोरं घातली साळंला,
कष्टकऱ्याच्या जिण्याला
दिस सोनियाचा आला.

**शंकर अभिमान कसबे**–(जन्म–१९८२) नवोदित कवी. नियतकालिकांतून लेखन, विविध कविसंमेलनांत सहभाग. 'करपी' हा कवितासंग्रह प्रसिद्ध. 'करपी' या कवितासंग्रहातून ही कविता घेतली आहे.

आपल्या पूर्वजांनी शिक्षणाचे महत्त्व जाणून नव्या पिढीला शिकवले. त्यांच्याविषयी कृतज्ञतेची भावना या कवितेतून कवीने व्यक्त केली आहे.

## स्वाध्याय



**प्र. १. तीन–चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) कवीच्या आजोबा–पणजोबांनी गोफणी व चऱ्हाटं वळल्यामुळे कोणती कामे करता आली?

(आ) कवीच्या आजोबा–पणजोबांनी विणलेल्या बाजेचा उपयोग केव्हा व कशासाठी केला?

**प्र. २. शेतीकामासाठी वापरली जाणारी साधने व त्यांचा उपयोग लिहा.**

(अ) येसणी –
(आ) गोफणी –
(इ) चऱ्हाट –
(ई) बाजा –
(उ) काण्या –
(ऊ) दावणी –

### खेळूया शब्दांशी.

**(अ) शेवटचे अक्षर सारखे येणाऱ्या पाच शब्दांच्या जोड्या कवितेतून शोधून लिहा.**

**(आ) आकृतीत दिलेले ग्रामीण भाषेतील शब्द प्रमाणभाषेत लिहा.**

| | | |
|---|---|---|
| (अ) | इनल्या | विणल्या |
| (आ) | तवा | |
| (इ) | वाह्याची | |
| (ई) | साळंला | |

### शोध घेऊया.

**(अ) तुमच्या आईबाबांना विचारून तुमच्या घरातील आजोबा–पणजोबांनी घेऊन ठेवलेल्या किंवा स्वत: तयार केलेल्या वस्तूंची यादी करा.**

**(आ) आंतरजालाच्या साहाय्याने शेतीसाठी वापरण्यात येणाऱ्या आधुनिक साधनांची माहिती घ्या.**

**उपक्रम :** कौटुंबिक नातेसंबंधावर आधारित कविता मिळवा, त्याचा संग्रह करा.
उदा., आई, आजी, मावशी, ताई, वडील, आजोबा.

### भाषेची गंमत पाहूया.

- **मराठी विलोमपद म्हणजे असे वाक्य जे उलटे वाचले तरी अगदी तसेच असते.**

उदा., (१) चिमा काय कामाची
(२) भाऊ तळ्यात ऊभा
(३) काका, वाचवा, काका
(४) तो कवी डालडा विकतो
(५) हाच तो चहा
(६) तो कवी ठमाला माठ विकतो

तुम्हीही अशा प्रकारची वाक्ये तयार करून लिहा. पहा कशी गंमत येते.

# भाषेचे नमुने

**पुरुषोत्तम बोरकर**–(जन्म–१९५५) कादंबरीकार, लघुकथाकार, नाट्यलेखक, पटकथालेखक, दूरदर्शनमालिका लेखक, माजी संपादक व स्तंभलेखक. 'मेड इन इंडिया' या कादंबरीतून हा उतारा घेतलेला आहे.

महाराष्ट्रात विविध बोली बोलल्या जातात. अशा बोलींची आपण ओळख करून घेत आहोत. वऱ्हाडी व मराठवाडी या दोन बोलींचे उतारे दिलेले आहेत.

## १. वऱ्हाडी बोली

''आईमाय च्या काहाले करा लागत होता वं?''आई म्हन्ते, ''म्या च्यालेस्तं बलावू धाळलं गळ्याकून तुमाले? सकाऊन तुमी न्हानोऱ्यात गुतून पळल्या होत्या, नाहीतं सकाऊनच बलावलं असतं. मंग सैपाकपानी झाल्यावर म्या गळ्याले म्हटलं, नथ्थू, लगनघरी जाय अन् त्या येवद्याच्या पाव्हनीनले च्यापान्याले घेऊन ये. घ्या, थंडा हुईन...'' ''तुमी घ्याना. घेना घेना तुमी घेना. तुमी मोठ्या आहा ना बाई... चूप पोट्ट्या. आगावर च्या सांडतं काय आता? चूप बस व तुही कुस्मे. काय झालं तुमा दोघाइलेही?'' ''त्याह्यले देऊ का च्या?'' ''नाही नाही त्याईले काहाले पाह्यजे च्या? दुसरा नोका देऊ, याच्यातलाच देतो मी. हैठ. आयकतही नाही तुमी. हे त सती पळतात चहाचा सिंगल दिसला की....''

यावर आई म्हन्ते, "म्या आगुदरच ठेवला होता ज्यास्तीचा. वक्तावर कोनी आलं तं मंग पंच्याईत होते. घ्या पान घ्या." यावर पाव्हनीन म्हन्ते, "आमीही साकरीचाच चाहा घेतो. गुयाचा चाहा त मले घेतल्यासारखा वाटतच नाही. अळकित्ता कुठी आहे? तू बसला का पोट्ट्या अळकित्त्यावर? उठ उभा राह्य. हे पोट्टे मिनिटभर कोनाशी बोलू देतीन त शप्पत आहे." "आता त्याले रुपया काहाले द्या लागते बयना !"

दरम्यान आई मावदातून कुकाचं डाबलं आनते अन् पाव्हनीनच्या कपाई कुकू लावते. पाव्हनीन आइच्या लावते. आई म्हन्ते, "येजा गावाले जाच्या आगुदर आखीन येकडाव." पाव्हनीन म्हन्ते, "हो ईन ना. ईन ईन. तथी लगनघरी त माय उभं राहाले जागा नाही. निरा कलकल कलकल चालू असते उठल्यापासून त झोपेलोग. अन् नासाचा धूस त इतला माय की आपल्याच्यानं तं पाहोल्या जात नाही. असलं त काय अति करा अम नसलं त काय माती करा? माह्य त डोक्सचं भिन झालं बयना म्हन्सीन त त्या कलकलाटानं. पन ईन मी. मले त आखीन साताठ जागी बलावू आहे. तोंड गोळ असलं ना मान्साचं त त्याले काहाची निपूर नाही पळत बयना. नाहीतरी वर जाताखेपी संग काय न्या लागते दुसरं?''

- **मनाने उत्तरे लिहा.**

(अ) 'असलं त काय अति करा अम नसलं त काय माती करा?' या म्हणीचा अर्थ काय असेल याचा विचार करा व लिहा.

(आ) कुकाचं डाबलं, अळकित्ता ही वऱ्हाडी बोलीतील वस्तूंची नावे आहेत. तुमच्या परिसरात या वस्तूंना कोणती नावे आहेत ते लिहा.

**बालाजी मदन इंगळे-**(जन्म-१९७५) समोर येणाऱ्या प्रत्येक संकटाकडे संधी म्हणून पाहावयाची दृष्टी असलेले सकारात्मक विचारांचे लेखक. 'मातरं', 'स्पंदन', 'मेलं नाही अजून आभाळ....' हे कवितासंग्रह आणि 'झिम पोरी झिम' कादंबरी प्रसिद्ध.

ही मराठवाडी बोली कर्नाटक सरहद्दीवरील उस्मानाबाद जिल्ह्यातील उमरगा या भागात बोलली जाते. 'झिम पोरी झिम' या कादंबरीतून हा उतारा घेतलेला आहे.

## २. मराठवाडी बोली

एके दिवशी मी दुपारी अभ्यास करत बसलते. शंकर झोपलता. अर्धा घंटा झालासंल तर शंकर एकाकीच उठला अन् रडलाला. मी गप्पमन् शंकरला पाळण्यातून खाली घेटले. तरीबी रडायचं थांबना गेलं. मग वाटीत दूध घिवून पाजिवलाले, तर रोज गप्प दूध पेणारा शंकर आज रडतच दूध पिऊलाला. दूध प्याचं झालं, तरीबी शंकर रडायचं थांबना. मग मी मांडीवर घिवून हलवीत थोडं थापटले. तरीबी गप्प बसंना. मग पाळण्यात झोपवले तरीबी गप्प बसंना. मग पाळण्यातून काढून काखंत घेतले. खांद्यावर घिवून थापटले. तरी रडायचं थांबना. का बरं गप्प बसना की ! मी घाबरून गेले. का झालासंल माय ? रडायचं थांबना का बरं ? का काय चावलंय म्हणावं ? मी लगेच शंकरच्या आंगातली आंगी काढून बघितले. हाता-पायाला पुढं पोटावर मागं पाठीवर सगळीकडं बघितले. पर कुठंच काय दिसलंनी. मग का बरं रडतासंल माय... ह्या विचारात आता मला काय करावं कळंना.

तेवढ्यात दारात कोणतर आल्यावनी वाटलं. बघितले तर रामतात्याची सून निलव्वा होती. आता तिला थोडं मराठी बोलाया यिवलालतं. शंकर रडलाल्याला बघूनच आलती. आल्या आल्या म्हणली, "अई का झालं ओ ?" मी म्हणले, "काय झालंय की बघा. एकाकीच रडूलालय. आता दूध पाजिवलेव तरीबी गप्प बसंना." "अई यव्वो का झालं म्हणावं ?" आसं म्हणत शंकरला घेतली. जरा त्येला बोलली, खेळवली तरीबी शंकर गप्प बसंना. मग त्येला खेळवीत बाहीर घिवून गेली. आपल्या घरात घेऊन गेली. मी लई घाबरले. आता अई का म्हणत्यात की वाटलालं. शंकरला काय तर झाल्यावर कसं वाटलालं. निलव्वा शंकरला मग तिच्या घरातल्या बैलाच्या घागरमाळा वाजवून दाखवली. मग शंकर त्या आवाजाकडं बघितला. अन् जरा रडायचं गप्प झाला, तरी अधून-मधून जरा रडूचलाला. मग निलव्वानं जरा घिवून इकडं-तिकडं फिरली. तिच्याच खांद्यावर मग शंकर थोड्या वेळानं झोपला. मग तिनंच घरी आणून पाळण्यात झोपवली. मला बरं वाटलं. जीवात जीव आला.

- **मनाने उत्तर लिहा.**

  तुमच्यावर तुमच्या लहान भावंडांना किंवा एखाद्या छोट्या बाळाला सांभाळण्याची वेळ आली आहे का ? तुमचा अनुभव लिहा.

**शिक्षकांसाठी :** बोलीभाषेतील दोन्ही उतारे विद्यार्थ्यांना योग्य उच्चार करून लिहिलेल्या शब्दांप्रमाणे वाचून दाखवावे. त्या उताऱ्यांतील शब्दांचे अर्थ व भाषेचे वेगळेपण विद्यार्थ्यांना समजून सांगावे.

# १२ मला मोठ्ठं व्हायचंय!

**प्रियंवदा करंडे**–(जन्म–१९४६) बाल, किशोर व कुमारवयीन मुलांसाठी लेखन करणाऱ्या कवयित्री व कथा लेखिका. ‘स्वामी विवेकानंद’ (चरित्र), ‘ज्ञानेश्वरांच्या गोष्टी’, ‘मी नाही जा आणि इतर गोष्टी’ (बालकथा संग्रह)’ आणि ‘हिरोंच्या शोधात’, ‘बाई आणि टेलिफोन’, ‘कविता जन्माला येतेय’ (एकांकिका), ‘जरा ऐकताय ना...’ (नाट्यछटा) इत्यादी साहित्य प्रकाशित.

मुलाला शास्त्रज्ञ व्हायचंय, शोध लावायचे आहेत, त्यासाठी तो तयारी करत आहे; परंतु घरातील सगळेजण त्याच्या कामात व्यत्यय आणतात. त्या मुलाच्या मनातील विचार या नाट्यछटेतून सांगितले आहे.

- शास्त्रज्ञ व त्यांनी लावलेले शोध यांच्या योग्य जोड्या लावा.

| | ‘अ’ गट | ‘ब’ गट |
|---|---|---|
| (अ) | गॅलिलिओ | १. विमान |
| (आ) | जेम्स वॅट | २. दुर्बिण |
| (इ) | राईट बंधू | ३. वाफेचे इंजिन |

माणसानं ध्येय धरावं ते आकाशाला गवसणी घालण्याचं! खडकातून पाणी काढण्याचं! काय म्हणतेस



आई? नळाचं पाणी जाईल? अंघोळ करून घेऊ? अगं पण... काय? खडकातून पाणी नंतर काढू? बरं बाई! म्हणतात ना, थोर पुरुषांच्या कार्यात अनंत अडचणी उभ्या असतात. मला शास्त्रज्ञ व्हायचंय. संशोधन करायचंय. शोध लावायचेत; पण आईला मला अंघोळीला पाठवायची घाई लागलीय! आता सांगा, न्यूटनला जर अशी घाई कुणी केली असती, तर गुरुत्वाकर्षणाचा शोध लावू शकला असता का तो? सफरचंद खाली पडताना त्यानं पाहिलं, तेव्हा त्याच्या मनात आलं, की हे सफरचंद खालीच का पडलं? वर का गेलं नाही? काय म्हणतेय ताई? मला वर फेकलं तर मीदेखील खालीच पडेन धाडकन? बरं बरं! तर काय सांगत होतो, न्यूटन झाडाखाली बसून शांतपणे विचार करत असताना असा त्याच्या ताईनं, आईनं, आजीनं त्रास दिला असता, तर त्याला शोध लावता आला असता का? नाही ना! आता मीदेखील वैज्ञानिक शोध लावण्यासाठी घरात माझी लॅब बनवली आहे. मायक्रोस्कोप, टेस्टट्यूब्ज, काचेची पात्रं. सगळं सगळं आणून ठेवलंय! पुस्तकांचा तर डोंगरच रचलाय! आता पुस्तकं उघडून वाचायचं तेवढं काम आहे. टिपणं काढण्यासाठी कागदांचे ताव आणलेत. शाईच्या बाटल्याही तयार ठेवल्यात. काय म्हणतेस आई? आत्ताच्या आता अंघोळीला उठू, नाहीतर पाणी जाईल आणि मला त्या बाटल्यांतल्या शाईनं अंघोळ करावी लागेल? उद्या मी मोठ्ठा शास्त्रज्ञ

झालो की हीच ताई, हीच आई मिरवणार माझ्या बक्षीस-समारंभात! काय ग ताई? चिडतेस कशाला? शास्त्रज्ञ होणं म्हणजे इतकं सोपं नाही काय? असू दे! माझा निश्चय दांडगा आहे. मी शास्त्रज्ञ होणारच; पण आता कुठला शोध लावू बरं? या आधीच्या शास्त्रज्ञांनी तर सगळेच शोध लावलेत, माझ्यासाठी काही काम शिल्लक ठेवलंय असं वाटत नाही. लसीकरण, अणू, परमाणू, विद्युतशक्ती... आता मी कसला बरं शोध लावू? काय म्हणतेस आई? माझी निळी पँट शोधू? कपड्यांच्या बोळ्यांतसुद्धा तू शोधलीस? काय? निळी पँट शोधली, तर हाच मोठा शोध लावला मी! असं म्हणतेस? आईवर खूप उपकार होतील! आता कळतं, की शास्त्रज्ञांना त्यांचे शोध लावताना किती त्रास, मनस्ताप सहन करावा लागला ते !

## स्वाध्याय



**प्र. १. दोन-तीन वाक्यांत प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(अ) मुलाला अंघोळीला न जाता काय करायचे आहे?

(आ) वैज्ञानिक शोध लावण्यासाठी मुलाने कोणती तयारी केली ?

(इ) शास्त्रज्ञ झाल्यावर ताई व आई काय करतील असे मुलाला वाटते?

(ई) आई मुलाला कोणता शोध लावायला सांगते?

**प्र. २. मनाने उत्तरे लिहा.**

(अ) कोणत्या गोष्टींसाठी आई तुमच्या सारखी मागे लागते?

(आ) तुम्हांला अंतराळात सोडले तर तुम्ही काय काय पाहाल ते लिहा.

(इ) तुम्हांला कोणते शोध लावावे असे वाटते ?

**प्र. ३. (अ) वाक्प्रचारांचे अर्थ सांगून वाक्यांत उपयोग करा.**

(अ) आकाशाला गवसणी घालणे. (इ) खडकातून पाणी काढणे.

(आ) निश्चय दांडगा असणे. (ई) मनस्ताप सहन करणे.

**(आ) पाठात आलेले शब्द खाली दिलेले आहेत. त्यांची माहिती मिळवा व लिहा.**

(अ) गुरुत्वाकर्षण (इ) लॅब (उ) अणू

(आ) टेस्टट्यूब्ज (ई) विद्युतशक्ती (ऊ) परमाणू

**(इ) प्रयोग करण्यासाठी प्रयोगशाळेमध्ये विविध साहित्य असते, त्याची यादी करा.**

**(ई) तुम्ही आतापर्यंत पाठांचे विविध नमुने अभ्यासले आहेत, त्यांपैकी खाली काही नमुने दिले आहेत त्यांमध्ये जास्तीत जास्त व कमीत कमी किती पात्रे बोलत असतात ते खालील तक्त्यात लिहा.**

| नाट्यछटा | संवाद | नाट्यप्रवेश | आत्मवृत्त | कथा |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**शिक्षकांसाठी :** या नाट्यछटेतील घटना, वाक्ये व आवाजातील योग्य चढउतार लक्षात घेऊन विद्यार्थ्यांकडून वाचन करून घ्यावे. विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करावे.

(उ) या नाट्यछटेत किती पात्रांचा उल्लेख आहे? ती पात्रे काय बोलली आहेत ते लिहा.

**उपक्रम :** (१) 'मला मोठ्ठं व्हायचंय' ही नाट्यछटा स्नेहसंमेलनाच्या वेळी वर्गात सादर करा.

(२) 'दिवाकरांच्या नाट्यछटा' हे पुस्तक मिळवून वाचा.

## आपण समजून घेऊया.

- **खालील शब्द वाचा.**

मी, ही, जी, पी, बी, ती, तू, धू, जू, ऊ, पू हे एकाक्षरी शब्द आहेत.

**एकाक्षरी शब्दांतील इ-कार किंवा उ-कार दीर्घ उच्चारला जातो म्हणून तो 'दीर्घ' लिहितात.**

**'नि' हा एकच शब्द असा आहे की जो एकाक्षरी असूनही 'ऱ्हस्व' लिहितात.**

- **खालील वाक्ये वाचा. अधोरेखित शब्दांचे निरीक्षण करा.**

१. त्याची टोपी उडाली.
२. नूरजहाँ विटी-दांडू खेळू लागली.
३. आईने पिशवी ठेवली.
४. ताईला पेरू आवडतो.
५. संजू आनंदाने नाचू, बोलू आणि गाऊ लागला.

त्याची, टोपी, उडाली, विटी, दांडू, खेळू, लागली, पिशवी, ठेवली, पेरू, संजू, नाचू, बोलू, गाऊ या शब्दांतील 'इ-कार' व 'उ-कार' दीर्घ आहेत. मराठी भाषेत शब्दांच्या शेवटी येणारे 'इ-कार' व 'उ-कार' दीर्घ असतात. 'आणि' व 'परंतु' हे मराठीतील दोन शब्द असे आहेत की ज्यांचा 'इ-कार' व 'उ-कार' ऱ्हस्व लिहितात.

- **शब्दांच्या शेवटी 'इकार' किंवा 'उकार' येतील असे दहा शब्द लिहा.**
- **खालील वाक्यांतील मोकळ्या जागी कंसात दिलेल्या सार्वनामिक विशेषणांपैकी योग्य विशेषण घाला.**

(इतका, जेवढा, तुमचा, तिचा, जसा, तेवढे)

१. बाबांनी विचारले, "......... वेळ कुठे होतास?"
२. ......... चेहरा उन्हाने लालेलाल झाला.
३. मला वाटते, " ......... कचरा जास्त ......... प्रदूषण जास्त."
४. ......... मुलगा खूप हुशार आहे.
५. ......... अंगरखा तशीच टोपी घालून तो मंचावर आला.

- **खालील नामांना दोन-दोन विशेषणे लिहा.**

उदा., हिमालय-उंच, बर्फाच्छादित.

१. भाजी - ......... , .........
२. घर - ......... , .........
३. विद्यार्थी - ......... , .........
४. बाहुली - ......... , .........
५. लोक - ......... , .........

**शिक्षकांसाठी :** शुद्धलेखनाच्या नियमांची उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांकडून उपयोजनात्मक सराव करून घ्या.

# १३ आपली सुरक्षा, आपले उपाय!

**वाचा. समजून घ्या.**

दीपा घाबरीघुबरी होऊन धावतपळतच घरात शिरली. तिने आईला घट्ट मिठी मारली अन् म्हणाली, ‘‘आई शेजारच्या गल्लीतल्या एका काकूंच्या घरात गॅसच्या टाकीचा स्फोट झाला. सगळे लोक त्या घराच्या दिशेने धावत होते. घरात नुसता जाळ दिसत होता. लोक पाण्याच्या बादल्या, मातीची घमेली नेत होते. एका काकांनी गाडी काढली अन् काकूंना दवाखान्यात नेले. आई, त्या काकू बऱ्या होतील ना गं?’’ एका दमात दीपाने पाहिलेले दृश्य आईला सांगितले. हे सगळे पाहून ती खूप घाबरली होती.

आई तिला म्हणाली, ‘‘बाळ, त्या काकू नक्कीच बऱ्या होतील. त्यांना नेलंय ना दवाखान्यात. अगं, आता वैद्यकीय क्षेत्रात खूप प्रगती झाली आहे. नवनवीन औषधं, नवनव्या तंत्रज्ञानांचा वापर सुरू झाला आहे. तू घाबरून जाऊ नकोस.’’ तरीही दीपाच्या मनात अनेक प्रश्न होते.



**सांगा. चर्चा करा.**

१. दीपाने पाहिला तसा प्रसंग तुम्ही कधी पाहिला आहे का?
२. गॅसच्या टाकीचा स्फोट झाला म्हणजे नेमके काय झाले?
३. लोक पाण्याच्या बादल्या, मातीची घमेली का नेत होते?



**विचार करा. सांगा**

**खालील विद्युत उपकरणे वापरताना तुम्ही कोणती काळजी घ्याल?**

१. इस्त्री   २. गिझर   ३. मोबाईल

- **शिक्षक व पालक यांच्या मदतीने समजून घ्या.**

१. घरात आग कशाकशामुळे लागू शकते?
२. आपल्या हातावर वाफ आली किंवा हाताला चटका बसला तर आपण हात पाण्याखाली का धरावा?
३. रेल्वेस्थानक, एस.टी. स्थानक अशा गर्दीच्या ठिकाणी वाळूच्या बादल्या भरून ठेवलेल्या दिसतात. त्या कशासाठी असतात?
४. अग्निशमन यंत्र कुठे कुठे बसवलेले तुम्ही पाहिले आहे? त्या ठिकाणी ते का बसवलेले असते?
५. गावाहून आल्यावर अगोदर घराची दारे-खिडक्या उघडाव्यात व नंतर विद्युत दिवा लावावा, असे का?


- **चित्रांचे निरीक्षण करा. वाचा.**




अंघोळीला जाताना अगोदर गिझरचे बटण बंद करावे व नंतर गिझरचे गरम पाणी सोडावे. वीज प्रवाहित होताना काही अडथळा आला, तर वीजप्रवाह पाण्यात प्रवाहित होऊ शकतो व विजेचा झटका बसू शकतो.




लग्न, कौटुंबिक समारंभ वा इतर सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये विजेची अनावश्यक रोशणाई टाळावी. रोशणाईसाठी लावलेल्या दिव्यातून वीजप्रवाह प्रवाहित होताना जर काही अडथळा आला तर आग लागण्याची शक्यता असते.



सतरंजी, कारपेट, गालिचा यांखालून विजेची वायर जाऊ देऊ नये, कारण जर त्या आच्छादित वायरीच्या भागात वायर खराब झाली तर वीजप्रवाह प्रवाहित होताना अडथळा येऊन आग लागू शकते.



विजेच्या एकाच बोर्डवर विजेवर चालणारी अनेक साधने व त्यांचे प्लग लावू नयेत. वीज प्रवाहावर दाब येऊन आग लागू शकते.

- **लक्षात ठेवा.**

१. खिडक्यांच्या पडद्याजवळ पेटती मेणबत्ती, उदबत्ती वा इतर गोष्टी ठेवू नयेत.

२. आगीमुळे घरात खूप धूर झाला असेल तर घरातून रांगत रांगत बाहेर पडावे.

३. विद्युत उपकरणांचा वापर करून झाल्यावर विद्युत बटण त्वरित बंद करावे.





रात्री झोपताना वा घराबाहेर जाताना विजेचे दिवे वा इतर उपकरणे बंद ठेवावीत. त्यामुळे विजेची बचत होते.

घरातील लॅम्पशेडवर वा बल्बवर एखादा रुमाल वाळत घातला, बल्ब खूप गरम झाला, तर तो वाळत घातलेला रुमाल पेट घेऊ शकतो.





विद्युत मंडळाच्या डिपीतून अनेक घरांमध्ये वीज प्रवाह प्रवाहित केलेला असतो. त्या डिपीमध्ये वायरींचे जाळे दिसते. या डिपीपासून दूर राहावे. त्या वायरींना हात लावू नये.

स्वयंपाकाची शेगडी, स्टोव्हजवळ जळाऊ वस्तू ठेवू नये. उदा., कपडे, काचेच्या वस्तू, लाकडाच्या वस्तू, कागद.

- **दक्षता घेऊया.**
  १. मोबाईल चार्जिंगला लावलेला असताना फोन आला तर चार्जिंग बंद करून फोन घेणे.
  २. लायटर, काडेपेटी यांच्याशी न खेळणे.
  ३. विद्युत वायर किंवा विद्युत तारेवर वजन पडणार नाही हे पाहणे.
  ४. जुन्या, कुरतडलेल्या विजेच्या वायरी वेळीच बदलाव्यात.



**वाचा.**

## अग्निशमन सेवा




कोठेही आग लागली तर एक लाल रंगाची गाडी जोरजोरात घंटा वाजवत आगीच्या ठिकाणी येते. त्यातील कर्मचारी पाण्याच्या मोठमोठ्या नळकांड्या घेऊन आग आटोक्यात आणतात. आग विझवतात. या दलातील कर्मचाऱ्यांच्या हालचाली खूप वेगवान व शिस्तबद्ध असतात. आग विझवण्याचे हे प्रात्यक्षिक बघण्यासारखे असते.



आग लागणे, घर पडणे, झाड पडणे, मोठा अपघात होणे अशा आपत्कालीन परिस्थितीतून आपल्याला बाहेर काढण्याचे काम अग्निशमन दल करते. या दलास पाचारण करण्यासाठी १०१ या करमुक्त दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधतात व आपत्कालीन घटना घडलेल्या ठिकाणचा पत्ता व थोडक्यात तपशील देतात. अग्निशमन दल घटनास्थळी तात्काळ पोहोचते. आपल्याला मदत करण्यासाठी आलेल्या या दलास आपण सहकार्य केले पाहिजे. ते देत असलेल्या सूचनांनुसार वागले पाहिजे. त्यांच्या कामात व्यत्यय येणार नाही असे आवर्जून पाहिले पाहिजे; कारण अग्निशमन दल आपले मित्र आहे.

- **खालील उतारा वाचा. विरामचिन्हांचा योग्य वापर करून उतारा पुन्हा लिहा.**


शाळा सुरू होऊन चार दिवस लोटले अभ्यासक्रम शिकवायला सुरू करण्याअगोदर भगतसर वर्गातील मुलांना स्वच्छतेचे नियमित शाळेत येण्याचे अभ्यासाचे महत्त्व सांगत होते मागील बाकावर बसलेल्या मुलांची चुळबुळ सुरू झाली तेव्हा सरांनी विचारले शंकर काय चालले तुमचे मागे शंकर उठून उभा राहिला व म्हणाला सर बाहेरून कसलीतरी दुर्गंधी येतेय वर्गातील बोलका व अतिउत्साही विशाल लगेच खिडकीच्याबाहेर डोकावून पाहत म्हणाला काही नाही हो सर बाहेर नाला साफ करणारे आले आहेत त्याचा वास येतोय वर्गातील अनेकांनी नाकं दाबून धरली काहींच्या तोंडून शी असे शब्द बाहेर पडले भगतसर आताच स्वच्छतेचे महत्त्व सांगत होते व मुलांच्या अशा प्रतिक्रिया पाहून त्यांना वाईट वाटले सर म्हणाले मुलांनो आता पावसाळा सुरू होणार आहे तेव्हा पाण्याने नाल्या तुंबू नयेत म्हणून ते नाल्या साफ करायला आले आहेत आणि तुम्हांला नाक मुरडायला काय झाले

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना वीज व अग्नी यांपासून सुरक्षित राहण्यासाठी मार्गदर्शन करावे.

# १४ आतां उजाडेल!



● ऐका. म्हणा. वाचा.



आतां उजाडेल!
खिन्न आंधळा अंधार
आतां ओसरेल पार
लहरींत किरणांची कलाबूत मोहरेल
आतां उजाडेल!

शुभ्र आनंदाच्या लाटा
गात फुटतील आतां
मृदु गळ्यांत खगांच्या किलबिल पालवेल
आतां उजाडेल!

वारा हसेल पर्णांत
मुग्ध हिरवेपणांत
गहिंवरल्या प्रकाशीं दहिंवर मिसळेल
आतां उजाडेल!

आनंदांत पारिजात
उधळील बरसात
गोड कोंवळा गारवा सुगंधांत थरारेल
आतां उजाडेल!

फुलतील नकळत
कळ्यांतले देवदूत
निळा-सोनेरी गौरव दिशांतून उमलेल
आतां उजाडेल!

निळें आकाश भरून
दाही दिशा उजळून
प्रकाशाचें महादान कणाकणांत स्फुरेल
आतां उजाडेल!

आज सारें भय सरे
उरीं ज्योतिर्मय झरे
पहाटेचा आशीर्वाद प्राणांतून उगवेल
आतां उजाडेल!

**मंगेश पाडगांवकर**–(१९२९-२०१५) ‘धारानृत्य’, ‘जिप्सी’, ‘छोरी’, ‘मीरा’, ‘सलाम’ इत्यादी त्यांचे कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. ‘आतां उजाडेल!’ ही कविता त्यांच्या ‘जिप्सी’ या कवितासंग्रहातून घेतली आहे.

सूर्य उगवण्याच्या वेळी निसर्गात कोणकोणत्या आनंददायक गोष्टी घडतील, याचे मनोहर चित्र कवीने या कवितेत मांडले आहे.

## स्वाध्याय



**प्र. १. दोन–तीन ओळींत उत्तरे लिहा.**

(अ) किरणांची कलाबूत कधी मोहरेल असे कवीला वाटते ?

(आ) आनंदाने मृदू गळ्यात कोण गाणार आहेत ?

(इ) पानांवर दहिंवर केव्हा हसेल ?

(ई) गारवा कशामुळे थरारेल ?

(उ) प्रकाशाचे महादान कोणते ?

(ऊ) उजाडल्यामुळे कोणते भय संपणार आहे ?

**प्र. २. थोडक्यात उत्तरे लिहा.**

(अ) उजाडल्यामुळे निसर्गात कोणकोणत्या घटना घडतील असे कवीला वाटते ?

(आ) 'पहाटेचा आशीर्वाद प्राणांतून उगवेल' या ओळीचा अर्थ समजावून घेऊन कवी असे का म्हणतात ते सांगा.

**प्र. ३. खालील ओळी वाचा. त्याचा अर्थ तुमच्या शब्दांत लिहा.**

(अ) खिन्न आंधळा अंधार आता ओसरेल पार.

(आ) मृदु गळ्यात खगांच्या किलबिल पालवेल.

(इ) आनंदात पारिजात उधळील बरसात.

(ई) प्रकाशाचे महादान कणाकणांत स्फुरेल.

**प्र. ४. 'आतां उजाडेल !' या कवितेतील एक कडवे दिले आहे ते वाचा. 'आता पाऊस पडेल!' व त्यानंतर काय घडेल याची कल्पना करा. कवितेच्या चार ओळी लिहा.**

आतां उजाडेल!
खिन्न आंधळा अंधार
आतां ओसरेल पार
लहरींत किरणांची कलाबूत मोहरेल
आतां उजाडेल!

आता पाऊस पडेल!
..................................
..................................
..................................

**प्र. ५. या कवितेत शब्दांना लावलेली विशेषणे लिहा.**

(अ) .................. आनंदाच्या लाटा

(आ) .................. आकाश

(इ) .................. गळ्यांत

(ई) .................. गारवा

**प्र. ६. दान–महादान यासारखे तुम्हांला माहीत असलेले शब्द लिहा.**

### विचार करून सांगूया.



डेव्हिड संध्याकाळी अभ्यासाला बसला. अचानक वीज गेली. ओह ! आता कसला अभ्यास होतोय. समूहगीतही पाठ करायचे होते. किती अंधार पसरलाय सगळीकडे. सगळंच अडलंय; पण वीज गेली कशी ? सांगा बरे आता डेव्हिड अभ्यास कसा करणार ?

## माहिती मिळवूया.

**सूर्योदय आणि सूर्यास्तावेळी सूर्य लाल का दिसतो?**

पृथ्वीभोवती हवेचे आवरण आहे. त्यामध्ये मोठ्या प्रमाणात धूलीकण असतात. सूर्योदय आणि सूर्यास्तावेळीही एरवीप्रमाणे सूर्यकिरणे वातावरणांमधून पृथ्वीपर्यंत पोहोचतात. सूर्यकिरणांमधील सात रंगांपैकी लाल आणि नारिंगी रंग सोडून बाकीचे रंग विखुरले जातात; त्यामुळे लाल आणि नारिंगी रंग फक्त पृथ्वीपर्यंत पोहोचू शकतात आणि त्यामुळे सूर्य लाल दिसतो. (सूर्यकिरणांमध्ये ता, ना, पि, हि, नि, पां, जां असे सात रंग समाविष्ट असतात.)

- **खालील चौकटीत काही शब्दसमूह लपलेले आहेत ते शोधा व लिहा.**

  उदा., कान टवकारणे.

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पो | व | का | व | रा | बा | व | रा | हो | णे | सा |
| टा | र | का | न | गो | ष्टी | क | र | णे | आ | रा |
| त | म | क | वा | ट | ला | व | णे | पा | सु | ब |
| का | णे | ट | का | वा | व | ज | न | अ | स | णे |
| व | धु | म | प | ळ | णे | का | का | व | णे | म |
| ळे | ड | झ | रे | की | अ | स | र | हो | णे | र |
| ओ | का | डो | भ | क | व | र | दे | णे | क्ष | ग |
| र | वू | ळ्या | र | र | न | म | णे | म | आ | ळ |
| ड | न | त | णे | णे | वा | णे | का | न | क | ये |
| णे | ला | स | मा | न | सी | व | ळ | व | ळ | णे |
| स | व | ल | त | घे | हो | सं | ता | प | णे | मा |
| ध | णे | णे | क | र | णे | त | फु | ल | णे | ज |

## सुविचार.

(१) प्रगती हे जीवनाचे ध्येय असले तरी गती हा त्याचा आत्मा आहे.

(२) सत्य, सदाचार, अहिंसा, शांती, भूतदया ही जीवनाची मूल्ये आहेत.

(३) भविष्य पाहाणाऱ्यापेक्षा, जो भविष्य घडवतो त्याचं जीवन कृतार्थ होतं.

# १५ बालसभा

बालसभा या उपक्रमाचे नियोजन, कामाचे स्वरूप, कार्यक्रमात विविधता कशी आणता येईल, याबाबत विद्यार्थ्यांना कल्पना यावी, मार्गदर्शन मिळावे यासाठी या पाठाचे आयोजन आहे.

**तुम्हांला हे आठवते का?**

- इयत्ता पाचवीमध्ये असताना तुमच्या शाळेत कोणकोणत्या बालसभा झाल्या होत्या?
- त्या सभांसाठी वर्गातील कोणकोणत्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता?
- बालसभांमध्ये तुम्ही सहभाग घेतला होता का?
- बालसभांमध्ये तुम्ही सहभाग घेतला असेल, तर बालसभांची तयारी तुम्ही कशी केली होती?




**पाळंदूर शाळेतील इयत्ता सहावीच्या वर्गाची बालसभा संपन्न झाली. वर्गशिक्षिकेने मुलांना कामे वाटून दिली होती. विद्यार्थ्यांना आवडीचे काम करायला मिळाल्याने त्यांच्यात उत्साह होता. प्रत्येक विद्यार्थ्याने आपली भूमिका व्यवस्थित पार पाडली. त्यामुळे अतिशय नियोजनबद्ध झालेल्या बालसभेचे सगळ्या शाळेने कौतुक केले. पाहूया तरी कशी झाली ही बालसभा.**

**नीता :** २८ नोव्हेंबर महात्मा जोतीराव फुले यांची पुण्यतिथी व ६ डिसेंबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन या निमित्ताने ही बालसभा आयोजित केली आहे. या बालसभेचे नियोजन इयत्ता सहावीच्या वर्गाकडे आहे. माझा वर्गमित्र कुणाल याने या बालसभेचे अध्यक्षस्थान स्वीकारावे अशी मी वर्गाच्या वतीने त्याला विनंती करते. शाळेच्या मुख्याध्यापिका, सर्व शिक्षक व आजच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष यांनी मंचावर स्थानापन्न व्हावे, अशी मी त्यांना विनंती करते. तसेच मुख्याध्यापिका व अध्यक्षांनी महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करावा अशीही मी त्यांना विनंती करते.

**तन्वी :** यापुढील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मी करणार आहे. आता आपण या दोन थोर व्यक्तींचे विचार, त्यांचे कार्य, त्यांच्या जीवनातील काही प्रसंग याबाबत ऐकूया. इयत्ता पाचवीच्या वर्गातील अन्वर आपले विचार मांडेल.

**अन्वर :** सन्माननीय व्यासपीठ आणि माझ्या मित्रांनो, आज मी महात्मा फुले यांच्या कार्याबद्दल बोलणार आहे.

मुलींसाठी शाळा सुरू करताना महात्मा फुले यांना अतोनात कष्ट सहन करावे लागले; पण तरीही ते आपल्या विचारांपासून डगमगले नाहीत. त्यांच्या या प्रयत्नांमुळे आज स्त्रियांसाठी शिक्षणाचे दरवाजे खुले झाले आहेत आणि स्त्रिया शिक्षित होऊन आपल्या कुटुंबाबरोबरच देशाच्या विकासाला हातभार लावत आहेत. अशा या महात्म्याला अभिवादन करून माझे दोन शब्द थांबवतो. जयहिंद!

**तन्वी :** धन्यवाद अन्वर! यानंतर इयत्ता सहावीतील निलोफर आपले विचार मांडेल.

**निलोफर :** आज मी डॉ. आंबेडकर यांच्याविषयी बोलणार आहे.

डॉ. बाबासाहेब यांचे मूळ नाव भीमराव होते. त्यांचे वडील रामजी व्यासंगी व शिक्षणाविषयी आस्था असणारे होते; म्हणून त्यांनी बाबासाहेबांना शिक्षण घेण्यास प्रोत्साहन दिले. त्यासाठी त्यांनी अपार कष्ट केले. बाबासाहेबांच्या प्रगतीवर त्यांचे बारीक लक्ष असायचे. वडिलांच्या विचारांचा पगडा आंबेडकर यांच्यावर होता. डॉ. बाबासाहेब यांचे सर्वांत जवळचे मित्र म्हणजे पुस्तके. ते पुस्तकांत खूप रमायचे. वाचनामुळेच त्यांना मनन, चिंतन करण्याची सवय जडली. कुशाग्र बुद्धिमत्ता, उत्तुंग ज्ञान व अखंड वाचन यांमुळे ते आपल्या भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार झाले. या थोर कर्तृत्ववान घटनेच्या शिल्पकाराला मी अभिवादन करून थांबते. जयहिंद !

**तन्वी :** धन्यवाद निलोफर! यानंतर मी इयत्ता सातवीतील गुरुप्रीतला आपले विचार मांडण्यास पुढे बोलवत आहे.

**गुरुप्रीत :** महात्मा जोतिबा फुले यांना आपण महात्मा म्हणतो, कारण त्यांनी समाजासाठी, देशासाठी प्रचंड कार्य केले. सत्यशोधक समाजाची स्थापना केली. विधवा विवाहास प्रोत्साहन दिले. अनाथालये काढली. सर्वांनी शिकावे या तळमळीने अहोरात्र झटले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखून मिलिंद व सिद्धार्थ कॉलेजची स्थापना केली; वसतिगृहे निर्माण करून विद्यार्थ्यांच्या राहण्याची सोय केली, पुस्तकांसारखा दुसरा मित्र नाही असा आपल्याला त्यांनी संदेश दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून ओळखले जाते. या दोन व्यक्ती आपल्यासाठी दीपस्तंभ आहेत. त्यांना मन:पूर्वक अभिवादन करून माझे दोन शब्द पूर्ण करतो. जयहिंद !

**तन्वी :** धन्यवाद गुरुप्रीत! आता मी आजच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षांना विनंती करते, की त्यांनी आपले विचार मांडावे.

**कुणाल :** मित्रांनो, मला अध्यक्षपद दिल्याबद्दल सर्वप्रथम मी आपल्याला धन्यवाद देतो. आपण अनेक विद्यार्थ्यांचे विचार ऐकले. त्यातून आपल्याला या दोन थोर व्यक्तींच्या कार्याची, विचारांची माहिती मिळाली. कवी विंदा करंदीकरांनी म्हटल्याप्रमाणे –

देणाऱ्याने देत जावे,
घेणाऱ्याने घेत जावे.
घेता घेता एक दिवस,
देणाऱ्याचे हात घ्यावे.

महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याने, त्यागाने व सेवेने प्रेरित होऊन आपण ही शिक्षणाची गंगा घरोघरी पोहोचवण्याचा संकल्प करूया व आपल्या

परिसरातील एकही विद्यार्थी शालाबाह्य राहणार नाही यासाठी प्रयत्न करूया. हेच आपल्याकडून त्यांना खरे अभिवादन ठरेल. एवढे बोलून मी थांबतो. जयहिंद!

**तन्वी** : धन्यवाद कुणाल! आता आभार प्रदर्शन चंदर करेल.

**चंदर** : आज आमच्या वर्गाच्या या बालसभेला मुख्याध्यापिका, सर्व शिक्षकवृंद उपस्थित राहिले, त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. आमच्या वर्गशिक्षिका बाईंनी आम्हांला मोलाचे मार्गदर्शन केले, तसेच हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी शाळेचे रखवालदार मामा, सेविका मावशींनी आम्हांला कामात खूप मदत केली, म्हणूनच आम्ही ह्या सभागृहाची सजावट, मंचव्यवस्था, मुलांची बैठक व्यवस्था करू शकलो. त्याबद्दल त्यांचेही आभार मानतो. नीता व तन्वीने अतिशय छान सूत्रसंचालन केले, मीनल व जॉनने व्यासपीठ व्यवस्था केली. प्रकाशने ध्वनी व्यवस्था केली. या सभागृहात तुम्हांला महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावरील प्रसंगांचे चित्र रेखाटन दिसते आहे. कुमुद, संपदा, प्रफुल्ल व चिनप्पा यांनी ही प्रसंगचित्रे रेखाटली आहेत. त्यामुळे बालसभेची वातावरण निर्मिती सुरेख झाली, तसेच आपल्या सर्वांचे मी इयत्ता सहावीच्या वतीने आभार मानतो व कार्यक्रम संपला असे अध्यक्षांच्या वतीने जाहीर करतो.

**पाळंदूर शाळेतील विद्यार्थ्यांनी वरील पद्धतीने बालसभा घेतली. ऊर्मिला माने हिच्या दापोलीच्या शाळेतील मुलांनीदेखील या कार्यक्रमाच्या निमित्ताने बालसभेचे आयोजन केले. त्यात वरील बालसभेतील कार्यक्रमांव्यतिरिक्त आणखी काही कार्यक्रमांची भर घातली आणि आपल्या वर्गाची बालसभा संपन्न केली. त्यात महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या पुस्तकांचे प्रदर्शन भरवले. नाटिका सादर केल्या. त्यांच्या जीवनातील काही प्रसंगांचे छोटे छोटे तक्ते व बॅनर्स तयार केले.**

## स्वाध्याय



**प्र. १. दोन-तीन ओळींत उत्तरे लिहा.**

(अ) इयत्ता सहावीच्या बालसभेचे आयोजन कोणत्या निमित्ताने केले होते?

(आ) बालसभेमध्ये इयत्ता सहावीच्या वर्गातील कोणी कोणी सहभाग घेतला?

(इ) बालसभेचे नियोजन करताना मुलांना कोणी कोणी मदत केली?

**प्र. २. महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची माहिती आठ-दहा ओळींत लिहा.**

**प्र. ३. तुमच्या वर्गाला विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन शाळा स्तरावर करायचे आहे. तुम्ही कोणकोणती तयारी कराल? ते क्रमाने लिहा.**

**प्र. ४. शाळेमध्ये बालसभांव्यतिरिक्त होणाऱ्या इतर कार्यक्रमांची यादी करा.**

**प्र. ५. बालसभा कोणकोणत्या विषयांवर घेतल्या जातात? त्या विषयांची यादी करा.**

प्र. ६. तुमच्या शाळेत पर्यावरण दिन साजरा करायचा आहे. खालील आकृतीत काही मुद्दे दिले आहेत. त्याबाबत तुम्ही काय विचार कराल? ते लिहा.

| कोणती घोषवाक्ये बनवाल? | कोणत्या समस्यांवर विचार कराल? | प्रमुख पाहुणे म्हणून कोणाला बोलवाल? |
| --- | --- | --- |
| १. प्रदूषण टाळा, पर्यावरण वाचवा. | १. कचरा समस्या | १. गावातील ज्येष्ठ नागरिक |
| ______ | ______ | ______ |
| ______ | ______ | ______ |
| ______ | ______ | ______ |
| ______ | ______ | ______ |
| ______ | ______ | ______ |

## हे करून पाहूया.

(अ) तुमच्या शाळेत 'बालिका दिन' साजरा केला आहे. त्या कार्यक्रमाची बातमी तयार करा.

(आ) स्वातंत्र्यदिनानिमित्त होणाऱ्या कार्यक्रमासाठी तुम्हांला शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षांना निमंत्रणपत्रिका पाठवायची आहे. शिक्षकांच्या मदतीने निमंत्रणपत्रिका तयार करा.

(इ) तुमच्या शाळेच्या स्नेहसंमेलनाच्या उद्‌घाटन सोहळ्याचा ओघतक्ता खाली दिलेला आहे. त्याचे निरीक्षण करा आणि त्याप्रमाणे तुमच्या शाळेतील क्रीडास्पर्धेचा ओघतक्ता तयार करा.

पाहुण्यांचे स्वागत → दीप प्रज्वलन → प्रास्ताविक → पाहुण्यांचा परिचय → बक्षीस वितरण → पाहुण्यांचे मनोगत → आभार प्रदर्शन



## वाचा.

बऱ्याचदा आपला असा समज होतो, की ज्यांना कार्यक्रमांत प्रत्यक्ष रंगमंचावर अथवा व्यासपीठावर संधी प्राप्त होते, त्यांच्याच गुणांचे संवर्धन होते, परंतु असे नाही. अशा कार्यक्रमांतून त्याचे नियोजन, रंगमंचाची मांडणी, साहित्यांची जमवाजमव अशा अनेक कामांतून व्यवस्थापन, नेपथ्य, सजावट, रंगभूषा अशा कलात्मक कार्याचा अनुभव घेऊन, आपण आपल्यातील सुप्त गुणांना संधी देऊ शकतो. चित्रकलेचे प्रदर्शन, क्रीडास्पर्धा, संगीत, नाट्य अशा वेगवेगळ्या कार्यक्रमांतून आपण आपल्या आवडीचे क्षेत्र निवडून त्यात अवश्य सहभाग घेतला पाहिजे.

**शिक्षकांसाठी :** शाळेमध्ये होणाऱ्या विविध उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, म्हणून त्यांना प्रोत्साहन द्यावे.

## आपण समजून घेऊया.

वाक्यातील क्रियापदाला ‘कोण’ असा प्रश्न विचारल्यावर जे उत्तर मिळते, तो शब्द त्या वाक्याचा ‘कर्ता’ असतो. वाक्यातील क्रियापदाला ‘काय’ असा प्रश्न विचारल्यानंतर जे उत्तर मिळते, तो शब्द म्हणजे त्या वाक्यातील ‘कर्म’ होय.

- **खालील वाक्ये वाचा.**

(१) श्रीरंगने बासरी वाजवली. (३) राजूने पतंग उडवला.

(२) सुगंधाने आंबे खाल्ले. (४) मधूने पुस्तक वाचले.

वरील वाक्यांतील क्रियापदांना ‘कोण’ आणि ‘काय’ या शब्दांनी प्रश्न विचारूया.

| अ.क्र. | क्रियापद | ‘कोण’ ने प्रश्न | उत्तर (कर्ता) | ‘काय’ ने प्रश्न | उत्तर (कर्म) |
|---|---|---|---|---|---|
| १. | वाजवली | वाजवणारा कोण ? | श्रीरंग | वाजवले ते काय ? | बासरी |
| २. | खाल्ले | खाणारी कोण ? | सुगंधा | खाल्ले ते काय ? | आंबे |
| ३. | उडवला | उडवणारा कोण ? | .......... | उडवले ते काय ? | .......... |
| ४. | वाचले | वाचणारी कोण ? | .......... | वाचले ते काय ? | .......... |

- **पुढील वाक्ये वाचा व त्यांतील कर्ता, कर्म, क्रियापद ओळखा.**

| वाक्य | कर्ता | कर्म | क्रियापद |
|---|---|---|---|
| १. तारा क्रिकेट खेळते. | | | |
| २. यास्मीन पुस्तक वाचते. | | | |
| ३. पक्षी किलबिल करतात. | | | |
| ४. राजू अभ्यास करतो. | | | |
| ५. शबाना स्वयंपाक करते. | | | |
| ६. जॉन व्यायाम करतो. | | | |

## विचार करून सांगूया.



परीक्षेची वेळ झाली होती. सीमाने सायकल काढली आणि ती निघाली. रोजच्यासारखी आज ती रमतगमत जात नव्हती. तिला वेळेच्या आत शाळेत पोहोचायचे होते. तेवढ्यात सायकल पंक्चर झाली. ओह.... आता काय करावे ? उशीर होऊन चालणार नाही. पेपरला वेळेवरच पोहोचायला पाहिजे. सीमाने काय केले असेल बरे ?

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना वाक्यातील कर्ता, कर्म, क्रियापद ओळखण्यास सांगून उपयोजनात्मक सराव करून घ्यावा.

# १६ सफर मेट्रोची

**क्रांती गोडबोले-पाटील-** (जन्म-१९९०) नवोदित लेखिका. किशोरवयीन मुलांसाठी तसेच सामाजिक विषयांवर ललितलेखन.

विज्ञान व तंत्रज्ञानाच्या युगामध्ये अनेक नवे नवे शोध लावले जात आहेत. प्रवासाच्या वाहनांमध्येही वेगाने बदल होत आहेत. ज्या त्या प्रदेशाची भौगोलिक परिस्थिती व मानवांच्या गरजा यांचा विचार करून वाहतुकीच्या साधनांत प्रगती होत आहे. मेट्रोची पहिली महिला सारथी रुपाली चव्हाण यांचा मेट्रो चालवण्याचा अनुभव व मेट्रोचा परिचय संवादरूपाने दिलेला आहे. 'वयम्' या मासिकातून हा संवाद घेतलेला आहे.

- **खालील तक्त्यात दिलेल्या क्षेत्रांतील कर्तृत्ववान महिलांची नावे लिहा.**

| क्षेत्र | क्रीडा | विज्ञान | वैद्यकीय | शिक्षण | राजकीय |
|---|---|---|---|---|---|
| **महिलांची नावे** | | | | | |



मुंबईत मेट्रो ट्रेन सुरू झाली आणि त्यातून प्रवास करण्यासाठी खूप झुंबड उडाली. मेट्रो खरोखरच अजब आहे. प्लॅटफॉर्म चढण्यासाठी आणि उतरण्यासाठी सरकते जिने, टोकन टाकताच उघडणाऱ्या झडपा, मेट्रोच्या डब्यांचे आपोआप उघडणारे-बंद होणारे दरवाजे, वातानुकूलित स्वच्छ डबे, झूम वेगात धावणारी ही गाडी. पावसाळ्यात उड्डाण पुलावरून मेट्रोतून प्रवास करताना ढगांतून तरंगत जात असल्याचा अनुभव येतो. बोगद्यातून जाताना जगाशी संबंध तुटल्यासारखा भासतो. या आधुनिक मेट्रोतून प्रवास करून आल्यावर काही प्रश्न मनात आले.



रुपाली चव्हाण ह्यांच्याशी साधलेला हा संवाद. त्या मेट्रो चालवणाऱ्या पहिल्या महिला सारथी ठरल्या आहेत.

**प्रश्न** : मेट्रो पायलट होण्यासाठी तुम्ही काय काय प्रयत्न केले. कोणता अभ्यास केला?

**रुपाली** : मी कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मुलगी. सिंधुदुर्ग शिक्षण प्रसारक मंडळाच्या अभियांत्रिकी महाविद्यालयातून इंजिनियर झाले. मेट्रोमध्ये पायलट होण्यासाठी इंजिनियर व्हावे लागते. एवढेच नाही तर चाचणी परीक्षाही पास व्हावे लागते. ही चाचणी खूप अवघड असते.

**प्रश्न** : फक्त परीक्षा पास झालात की तुम्हांला पायलट म्हणून मान्यता मिळते का?

**रुपाली** : नाही, नाही. यानंतर उमेदवाराची मानसिक आणि शारीरिक चाचणी घेतली जाते. या सर्व चाचण्यांत पास झालात, की मग मुलाखत घेतली जाते. मुलाखतीमध्ये निवड झाल्यावर मग मेट्रो चालवण्याचे एक वर्षाचे प्रशिक्षण दिले जाते आणि मगच तुम्ही मेट्रो पायलट बनू शकता.

प्रश्न : रुपालीताई, पहिल्यांदा मेट्रो चालवताना तुम्हांला कसं वाटलं?

रुपाली : मेट्रोचं उद्‌घाटन झालं तो दिवस माझ्यासाठी अविस्मरणीय आहे. पहिली मेट्रो चालवण्याची जबाबदारी माझ्यावर होती. मनात थोडी धाकधूक होती, की मी सर्वांना व्यवस्थित घेऊन जाईन की नाही? एकदा का मी मेट्रो चालवायला सुरुवात केली आणि मनातील सर्व भीती क्षणात पळून गेली. बिनधास्तपणे, न घाबरता, आत्मविश्वासाने मी मेट्रो चालवली. आता तर मी रोजच मेट्रो चालवत असल्याने सवय झाली आहे.

प्रश्न : मेट्रोच्या उद्‌घाटनाचा दिवस तुमच्यासाठी अविस्मरणीय का होता?

रुपाली : रेल्वे आणि मेट्रो यांच्यामध्ये बरेच साम्य आहे; पण मेट्रोचे तंत्रज्ञान अत्याधुनिक आहे. पहिल्यांदाच मेट्रो धावणार होती. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, अनेक मान्यवर मंडळी, मीडिया तसेच माझ्या घरची सर्व मंडळी तेथे उपस्थित होती. या सर्वांना मेट्रोतून घेऊन जायचे होते आणि तेही मला.

प्रश्न : पहिली मेट्रो कुठून कुठपर्यंत धावली?

रुपाली : मेट्रोच्या उद्‌घाटनाच्या दिवशी मेट्रो वर्सोवा स्थानकावरून घाटकोपरपर्यंत धावली.

प्रश्न : मेट्रो कोणत्या इंधनावर चालते?

रुपाली : मेट्रो विजेवर चालते.

प्रश्न : एका मेट्रोत किती पायलट असतात?

रुपाली : एका मेट्रोत एकच पायलट असतो.

प्रश्न : मेट्रोला दोन्ही बाजूंना इंजिन असते का?

रुपाली : लोकलप्रमाणे मेट्रोलाही दोन्ही बाजूंस इंजिन असते. मेट्रो ट्रेन फक्त चार डब्यांची असते. मेट्रोला स्वतःची कारशेडही असते. घाटकोपरहून वर्सोव्याला मेट्रो पोहोचली, की ती कारशेडमध्ये जाते. तिथे पायलट उतरून घाटकोपरच्या दिशेने इंजिन असलेल्या केबिनमध्ये येतो, मग मेट्रो घाटकोपरच्या दिशेने नेतो.

प्रश्न : मेट्रोत एका वेळी साधारणतः किती प्रवासी प्रवास करू शकतात?

रुपाली : मेट्रोत एका वेळी साधारणतः पंधराशे प्रवासी प्रवास करू शकतात.

प्रश्न : मेट्रोचे वेगळेपण काय ?

रुपाली : मेट्रोचे डबे स्टेनलेस स्टीलने बनवलेले असतात. विशेष म्हणजे हे डबे वातानुकूलित असतात. डब्यात व स्टेशनवर सी.सी. टीव्ही कॅमेरे लावलेले असतात. मेट्रोचे दरवाजे आपोआप उघडतात. मात्र ते आपोआप बंद होत नाहीत, तर ते पायलटला बंद करावे लागतात. पायलटसाठी बंद केबिन असते. केबिनमध्ये मेट्रो चालवण्याची पूर्ण यंत्रणा बसवलेली असते. मेट्रोच्या यंत्रणेत मध्येच बिघाड झाला तर काय करायचं याचंही पूर्ण प्रशिक्षण पायलटला दिलेलं असतं.

प्रश्न : मेट्रो दिवसरात्र धावते का?

रुपाली : सकाळी ५.२० वाजल्यापासून ते रात्री १२ वाजेपर्यंत मेट्रो सुरू असते.

प्रश्न : टोकन म्हणजे काय?

रुपाली : मेट्रोमधून प्रवास करण्यासाठी टोकन दिले जाते. टोकन म्हणजे मेट्रोचे तिकीट, तसेच रोज मेट्रोने प्रवास करायचा असल्यास प्रीपेड कार्डही मिळते. प्रीपेड कार्डमध्ये भरलेले पैसे प्रवासानुसार संपत जातात. ते

संपले की पुन्हा मेट्रोच्या तिकीट विंडोवर जाऊन त्यात पैसे भरावे लागतात. मेट्रोने प्रवास करतेवेळी हे टोकन किंवा प्रीपेड कार्ड असावेच लागते. हे टोकन टाकल्यावर किंवा प्रीपेड कार्ड मशीनवर ठेवल्यानंतरच मेट्रोचे दरवाजे उघडतात आणि मगच प्लॅटफॉर्मवर जाता येते. म्हणजे कुणी विना तिकीट प्रवास करूच शकत नाही. थोडक्यात आधुनिक सोईंनी परिपूर्ण अशी ही मेट्रो आहे.

मेट्रोच्या या सोईमुळे अनेक प्रवासी सुखी झाले आहेत. प्रवासाचा वेळ तर वाचतोच, शिवाय प्रवास आनंददायी आणि सुखकारक होतो, असे रुपाली आवर्जून सांगते. मेट्रो आपल्यासाठी अभिमानाची गोष्ट ठरली आहे, हेही ती तेवढ्याच अभिमानाने सांगते.

## स्वाध्याय



**प्र. १. तीन–चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) मेट्रो पायलट होण्यासाठी कोणकोणत्या टप्प्यांतून जावे लागते ?


(आ) पहिल्यांदा मेट्रो चालवताना रुपालीची मनस्थिती कशी झाली होती ?

(इ) मेट्रोच्या उद्‌घाटनाचा दिवस रुपालीसाठी अविस्मरणीय का होता ?

**प्र. २. मेट्रोबाबतीत पुढील मुद्द्यांवर थोडक्यात माहिती लिहा.**

(अ) केबिन
(आ) कॅमेरे
(इ) मेट्रोचा प्रवास
(ई) जिने
(उ) दरवाजे
(ऊ) प्रवासी संख्या
(ए) इंजिन
(ऐ) तिकीट

**प्र. ३. खालील आकृती पूर्ण करा.**




**प्र. ४. मेट्रो तुमच्याशी बोलते आहे अशी कल्पना करा. मेट्रो तिची कहाणी काय सांगेल ते लिहा.**

**प्र. ५. तुम्हांला मोठे झाल्यावर कोणते वाहन चालवायला आवडेल ? का ते सांगा.**

**प्र. ६. तुमच्या परिसरातील रिक्षाचालक, एस.टी. चालक यांच्याशी संवाद साधण्यासाठी दहा प्रश्न तयार करा.**

### नवीन काही शोधूया.

(अ) आंतरजालाचा वापर करून भारतात कोणकोणत्या ठिकाणी मेट्रो धावते याची माहिती घ्या व त्या ठिकाणांची यादी तयार करा.

(आ) वाहनांचे वर्णन असणाऱ्या कविता शोधा व संग्रह करा.

(इ) महिलांनी कोणकोणत्या क्षेत्रांत नव्याने पदार्पण केले आहे ते शोधा व त्या क्षेत्रांची यादी करा.

## आपण समजून घेऊया.

**क्रियापदांचे प्रकार**

सकर्मक | अकर्मक | संयुक्त | सहायक

- **पुढील वाक्ये वाचा व त्यांतील कर्ता, कर्म आणि क्रियापदे ओळखून तक्त्यात लिहा.**

| वाक्य | कर्ता | कर्म | क्रियापद |
|---|---|---|---|
| १. तेजवंत फुटबॉल खेळतो. | | | |
| २. शिक्षक कविता गातात. | | | |
| ३. निशा निबंध लिहिते. | | | |
| ४. जोसेफ रस्त्यात पडला. | | | |
| ५. दादा घरी आला. | | | |
| ६. सुरेश उद्या पुण्याला जाईल. | | | |

सकर्मक क्रियापद – कर्म असलेले क्रियापद

अकर्मक क्रियापद – कर्म नसलेले क्रियापद

वरील वाक्यांच्या निरीक्षणावरून असे लक्षात येते की १, २, ३ क्रमांकांच्या वाक्यांत कर्म आहे व ४, ५, ६ क्रमांकांच्या वाक्यांत कर्म नाही.

ज्या क्रियापदांचा अर्थ पूर्ण करण्यासाठी कर्माची गरज असते, ती 'सकर्मक' क्रियापदे होय.

ज्या क्रियापदांचा अर्थ पूर्ण होण्यासाठी कर्माची गरज लागत नाही, ती अकर्मक क्रियापदे होय.

## सारे हसूया.




बंड्या आपल्या मामाकडे आला होता. दिवसभर त्याच्या उचापती चालायच्या. प्रारंभी मामांनी त्याच्याकडे दुर्लक्ष केलं. पण त्याचा वाह्यातपणा फारच वाढू लागला. तेव्हा एके दिवशी त्याला समोर बसवून मामांनी भरपूर उपदेश दिला.

वागणुकीसंबंधीचे दहा नियमच त्यांनी बंड्याला घालून दिले अन् शेवटी म्हणाले, ''या दहा नियमांपैकी एक जरी नियम तू मोडलास तर काय होईल ठाऊक आहे ?''

''नऊ उरतील.'' बंड्या पटकन म्हणाला.

**शिक्षकांसाठी :** क्रियापदांच्या विविध प्रकारांची उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांकडून उपयोजनात्मक सराव करून घ्यावे.

# १७ दुखणं बोटभर

**डॉ. चित्रा सोहनी–**(जन्म–१९५५) निवृत्त प्राध्यापिका व लेखिका. ‘भाषा मुलांची’, ‘शैक्षणिक मानसशास्त्र’, ‘भाषिक कौशल्ये’, ‘अध्यापनाची प्रतिमाने’ इत्यादी पुस्तकांचे लेखन. आकाशवाणीच्या शैक्षणिक कार्यक्रमात सहभाग. दूरदर्शनवरील शैक्षणिक कार्यक्रमांसाठी पटकथा लेखन. विविध नियतकालिकांतून शैक्षणिक लेखन.

‘बोटभर’ हा शब्द अगदी क्षुल्लक या अर्थी वापरला जातो; पण याच ‘बोटभर’ दुखण्याने लेखिका किती आणि कशा हैराण होतात, याचे मजेशीर वर्णन या पाठात आले आहे. बोट आणि हात या शरीराच्या अवयवांवर अनेक शब्दसमूह, वाक्प्रचार, शब्दांच्या छटा, गमती, शाब्दिक विनोद यांमुळे या पाठाला आलेली रंगत आनंद देऊन जाते.



(१) या मुलाची अवस्था अशी का झाली असेल? विचार करा. या मुलाची अशी अवस्था होण्यामागची कारणे सांगा. चर्चा करा.
(२) तुमच्या हाताला जखम झाली तर रोजची कामे तुम्ही कशी कराल?

बरेच दिवसांत कोणाची खुशाली कळली नसली, की ‘बोटभर चिठ्ठीसुद्‌धा का नाही पाठवली!’ असे म्हणतात. आमच्या वाड्यातल्या एक बाई, ‘भावजयीनं ‘मला बोटभर चिंधीसुद्‌धा नाही दिली हो’, अशी तक्रार करायच्या. आता दहा हात साडीही नीट न पुरणाऱ्या बाई, बोटभर चिंधीचं काय करणार होत्या? असं आम्हांला वाटे.

सांगायचा मथितार्थ असा, की ‘बोटभर’ हा शब्द अगदी छोटंसं, क्षुल्लक अशा अर्थी वापरला जातो; पण माझ्या ‘बोटभर’ दुखण्यानं मला कसं हैराण केलं, त्याची ही ‘हातभर’ कहाणी आहे.

कुठलातरी कडक गूळ बत्त्यानं ठेचताना (आणि त्याबरोबर इकडच्या–तिकडच्या गप्पा करताना) एक घाव उजव्या हाताच्या बोटाच्या वर्मी बसला. तो घाव ‘वर्मी’ बसला याचं मर्मज्ञान उशिराच झालं. घाव बसताना वेदना होऊन मी बोट तोंडात घातलं; पण ‘तू डावखोरी नसताना उजव्या हाताचं बोट कसं दुखावलं?’ म्हणून इतरांनी आश्चर्यानं तोंडात बोटं घातली. नंतर बोटावर तीन महिने चाललेला खर्च, वेळ, वायफळ चर्चा यांमुळे दुखऱ्या बोटासकट हात कपाळाला लावायची वेळ माझ्यावर आली.



सुरुवातीला बोट ठसठसायला लागल्यावर मला एका जाहिरातीची आठवण झाली, ‘मलम मलिए, काम पे चलिए’. मी बोटावर मलम लावले; पण कामासाठी ते मुळीसुद्‌धा नाही वळले. मी बोटाकडे दुर्लक्ष केल्याचा बेट्याला राग आला असणार, त्यामुळे ते मानी

माणसाप्रमाणे ताठलं. आता या बेट्या बोटाचा 'ताठा' कमी करावा, म्हणून बुडत्याला काडीचा आधार यानुसार मी वागायचं ठरवलं. अहो, म्हणजे गरम पाण्यानं शेकून पाहिलं होतं! पण छे! मोडेन पण वाकणार नाही, असा मराठी बाणा दाखवला त्यानं! शिवाय रागानं हुप्प होऊन फुगून बसलं. अन् हेऽऽ टम्म झालं बोट! त्याही स्थितीत जरा मस्का मारून पाहावा म्हणून तेलमालीश केलं; पण 'वो टस से मस नहीं हुआ ।'

शेवटी 'हा नाद सोड, डॉक्टरांचा फोन जोड' असा भाच्याचा उपदेश शिरोधार्य मानून मी डॉक्टरांना फोन केला. 'तपासल्याशिवाय कसं कळेल?' त्यांनी प्रश्न केला. मग दवाखाना गाठला. तिथे ही ऽऽ गर्दी. कुणाचा पाय प्लास्टरमध्ये, कुणी कुबड्याधारी, कुणाचे हात गळ्यात (म्हणजे स्वत:चे हात स्वत:च्या गळ्यात) असल्या अलौकिक अवस्थेतले एकेक जण पाहिल्यावर पोटात गोळा आला. इथून पळ काढावा असं वाटत होतं. आमच्या त्या 'बाणेदार' बोटात आता असंख्य बाण घुसल्याच्या वेदना होत होत्या. त्यामुळे डॉक्टरांना भेटणं भागच होतं. हाडबिड तुटलं नसेल ना? अशी भीती वाटत होतीच.

मग त्या चिमुकल्या बोटाची नुसती तपासणी. क्ष किरणांनी फोटो वगैरे झाल्यावर डॉक्टरांनी हसत सांगितलं, 'काही नाही. घाबरू नका. प्लास्टरसुद्‍धा नकोय. नुसतं स्ट्रॅपिंग करायचंय.' डॉक्टरांच्या मिठ्ठास, बोलण्यामुळे मन अगदी हलकं झालं. मनावरचा ताण उतरला; पण थोड्याच वेळात भ्रमनिरास झाला. त्या स्ट्रॅपिंग नामक प्रकारात ते एकच बोट काय आजूबाजूची दोन बोटंही ताणून बांधून, वर हातही गळ्यात अडकवला. त्यामुळे जड हातानं आणि पर्स हलकी झाल्यामुळे जड अंत:करणानं घरी परतले.

आता शब्दश: हात बांधलेल्या अवस्थेत. त्यामुळे कामावर रजा टाकून घरी बसले. आपण उगाच 'डावउजवं' काही मानायला नको, असा सुज्ञ विचार करून डाव्या हातानं कामं सुरू केली; पण हा डावा हात कामाच्या बाबतीत अंमळ डावाच निघाला. विंचरणं, पकडणं, ढवळणं, शिवणं, लिहिणं काहीही नीट जमेना. शेवटी हात चोळत गप्प बसावं लागलं. कळ लागल्यामुळे आणि बोटं वळवायची नसल्यामुळे मी आपली नुसतीच कळवळायची. दिवसभरात पाच-सहा प्रकारच्या गोळ्याही घ्यायला दिल्या होत्या डॉक्टरांनी. आता पोटात गेलेल्या या गोळ्यांना बोट बरं करायचं की पोट हे कसं काय समजत असावं? अशी माझी बालपणापासूनची बाळबोध शंका आहे; पण ती विचारायचं धाडस होत नाही. त्यामुळे अवसान गोळा करून (कारण गोळ्यांच्या किमती पाहून ते गळालेलंच होतं) गोळ्या गिळंकृत केल्या.

बोटं नुसती घट्ट गुंडाळली होती, तरी 'रॅपिंग' असा सोपा शब्द सोडून 'स्ट्रॅपिंग' असा जड शब्द का वापरतात हे डॉक्टरच जाणे. स्ट्रॅपिंग निघाल्यावरही सगळं लगेच आलबेल झालं नाहीच. आणखी थोड्या गोळ्यांची फैर झडली आणि चेंडू वळण्याचा व्यायाम सांगितला. 'बच्चों का खेल', असं वाटून मी दुर्लक्ष केलं, तर पुढच्या भेटीत बोट न वळण्याचं कारण म्हणून या टाळलेल्या व्यायामावरच डॉक्टरांनी बोट ठेवलं. मग काय? चेंडू वळणं, कागदाचे घट्ट बोळे करणं असले व्यायाम सुरू. रजा संपून कामावर गेले; पण बोटामुळं कामाचा बट्ट्याबोळच!

हळूहळू हत्तीच्या पावलांनी आलेलं दुखणं मुंगीच्या पावलांनी बरं होऊ लागलं; पण अजूनही मी (कोणाच्याही नावानं) बोटं मोडू शकत नाही. राग आला तरी त्वेषानं घट्ट मूठ वळवू शकत नाही. बोट आपला हात दाखवत राहतंच. आपल्याकडे 'प्रभाते करदर्शनम्' करण्याची प्रथा का पडली असावी, हे समजून चुकलं आहे आणि आता बोटांचं महत्त्वही समजलं आहे.

**शिक्षकांसाठी :** या पाठातील कठीण शब्द व वाक्प्रचार यांची विद्यार्थ्यांकडून यादी करून घ्यावी. अकारविल्ह्यानुसार त्यांची मांडणी कशी करावी याविषयी मार्गदर्शन करावे. शब्दकोशाप्रमाणे त्यांची मांडणी करून घ्यावी.

# स्वाध्याय



**प्र. १. चार–पाच वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) लेखिकेच्या बोटाला दुखापत कशी झाली? दुखापत झाल्यावर लेखिकेने काय केले?

(आ) ठसठसणाऱ्या बोटाचं वर्णन लेखिकेने कसे केले आहे?

(इ) बोटाला लागल्यामुळे लेखिकेच्या कामावर काय परिणाम झाला?

**प्र. २. का ते लिहा.**

(अ) लेखिकेला कपाळाला हात लावण्याची वेळ आली.

(आ) लेखिका डॉक्टरांकडे जाण्यास तयार झाली.

(इ) दवाखान्यात गेल्यावर लेखिकेच्या पोटात गोळा आला.

(ई) दवाखान्यातून लेखिका जड अंतःकरणाने घरी परतली.

(उ) लेखिकेला आता बोटाचे महत्त्व समजले आहे.

**प्र. ३. तुमच्या वर्गमित्राला दुखापत झाली, तर तुम्ही त्याला कशी मदत कराल?**

**प्र. ४. पाठामध्ये बोटाला दुखापत होण्यापासून बोट बरे होईपर्यंत आलेल्या घटना क्रमवार लिहा.**

**प्र. ५. दुखापत झालेले बोट तुमच्याशी बोलते आहे अशी कल्पना करून दहा–बारा ओळी लिहा.**

**प्र. ६. तुम्हांला ठेच लागून जखम झाली तर.... काय कराल ते लिहा.**

## खेळूया शब्दांशी.

**(अ) खालील शब्दांचे पाठात आलेले समानार्थी शब्द लिहा.**

| | | |
|---|---|---|
| (अ) वहिनी – | (ई) ललाट – | (ए) नवल – |
| (आ) कथा – | (उ) त्रास – | (ऐ) तोरा – |
| (इ) आघात – | (ऊ) सकाळ – | (ओ) हात – |

**(आ) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.**

| | |
|---|---|
| (अ) गरम x | (इ) घट्ट x |
| (आ) उजवा x | (ई) दुर्लक्ष x |

**(इ) वाक्यांत उपयोग करा.**

| | |
|---|---|
| (अ) वायफळ चर्चा – | (उ) बट्ट्याबोळ – |
| (आ) ठसठसणे – | (ऊ) हत्तीच्या पावलांनी येणे – |
| (इ) बाळबोध – | (ए) मुंगीच्या पावलांनी जाणे – |
| (ई) जड अंतःकरण – | (ऐ) जायबंदी – |

(ई) ‘हा नाद सोड, डॉक्टरांचा फोन जोड’ यासारखे यमक जुळवून खालील वाक्ये लिहा.

(अ) त्याचा खिसा गरम, -------

(आ) मोडेन पण वाकणार नाही, -------


(इ) बोटभर दुखणं, -------

(ई) मनावरचा उतरला ताण, -------

(उ) ‘हाडबिड’ यासारखे अवयवांवर आधारित जोडशब्द लिहा.

(ऊ) गप्प, हुप्प, टम्म यांसारखी जोडाक्षरे लिहा.

(ए) आकृतीत दिल्याप्रमाणे पुढे दिलेल्या शब्दांचे शेवटचे अक्षर सारखे असणारे शब्द लिहा.





(अ) मात्र (ई) गर्दी

(आ) बत्ता (उ) साडी

(इ) पळ

(ऐ) ‘बोट’ याप्रमाणे ‘हात’ व ‘पोट’ यांवर आधारित वाक्प्रचार व म्हणी लिहा.





(ओ) हात व हस्त हे एकाच अर्थाचे शब्द आहेत. खालील शब्दांत हात व हस्त लपलेले आहेत. ते शब्द वाचा व त्यांचे अर्थ समजून घ्या.

हातोडा, हातकंकण, हातकडी, हस्तक्षेप, हस्तकला, हातमोजे, हस्तरेषा, हस्ताक्षर, हातखंडा, हस्तलिखित, हस्तांदोलन, हस्तगत.

## शोध घेऊया.

**(अ) या पाठातील विनोदी वाक्ये शोधून लिहा.**

**(आ) पाठातील बोट या शब्दासाठी आलेली विशेषणे खालील आकृतीत लिहा.**




**(इ) हत्तीच्या पावलांनी येणे, मुंगीच्या पावलांनी जाणे यांसारख्या म्हणी शोधा.**

- **पुढील वाक्यांतील क्रियापदे सकर्मक की अकर्मक ते ओळखा व रिकाम्या जागेत लिहा.**

(१) आई भाकरी करते. ______ (४) अनुराधा पत्र लिहिते. ______

(२) गणेश रस्त्यात पडला. ______ (५) सुरेखाचे डोके दुखते. ______

(३) उद्या दिवाळी आहे. ______ (६) गाई झाडाखाली बसल्या. ______

- **खालील वाक्ये वाचा व अधोरेखित शब्दांचे निरीक्षण करा.**

(१) क्रीडांगणावर मुले खेळू लागली.

(२) मीना पुस्तक वाचत आहे.

(३) सरिताने सर्व अभ्यास करून आणला.

वरील वाक्यांमध्ये एकाच वाक्यात दोन क्रिया दिसतात. त्यांतील एक क्रिया वगळली तर वाक्य पूर्ण होत नाही. वाक्याचा अर्थ पूर्ण कळत नाही. इतकेच नाही तर काळही कळत नाही, म्हणून वाक्यांमध्ये क्रिया कळण्यासाठी दोन क्रियादर्शक शब्द वापरावे लागतात, म्हणजेच जोड क्रियापद वापरावे लागते. अशी जोड क्रियापदे म्हणजे 'संयुक्त क्रियापदे' होय.

वाक्यातील क्रिया दाखवणाऱ्या क्रियापदाच्या मूळ रूपापासून तयार झालेले खेळू हे धातुसाधित (कृदन्त) आहे, तर 'खेळ' ही मूळ क्रिया किंवा धातू आहे.

| अ.क्र. | मूळ धातू | धातुसाधित | संयुक्त क्रियापद |
|---|---|---|---|
| १. | खेळ | खेळू | खेळू लागला. |
| २. | वाच | वाचू | वाचू लागला. |
| ३. | कर | करून | करून आणला. |

# १८ बहुमोल जीवन

- **ऐका. म्हणा. वाचा.**


मनासारखे सारे काही जीवनात या घडते का?
फुले निखळुनी पडती, तरिही झाड सारखे झडते का?

भोगावे लागतेच सकला जे येते ते वाट्याला
गुलाब बोटे मोडत नाही आसपासच्या काट्याला
काटे देते म्हणुनी लतिका मातीवरती चिडते का?
मनासारखे सारे काही जीवनात या घडते का?

वसंत येतो, निघुनी जातो, ग्रीष्म जाळतो धरणीला
पुन्हा नेसते हिरवा शालू, पुन्हा नवेपण सृष्टीला
देह जळाला म्हणुनी धरणी एकसारखी रडते का?
मनासारखे सारे काही जीवनात या घडते का?

रोज नभाचे रंग बदलती, घन दाटुनि येतात तरी
निराश आशा पुन्हा नव्याने नक्षत्रे नेतात घरी
अवसेला पाहून पौर्णिमा नभात रुसुनी बसते का?
मनासारखे सारे काही जीवनात या घडते का?

सुखदुःखाची ऊनसावली येते, जाते, राग नको
संकटास लीलया भिडावे, आयुष्याचा त्याग नको
बहुमोलाचे जीवन वेड्या कुणास फिरुनी मिळते का?
मनासारखे सारे काही जीवनात या घडते का?



**रमण रणदिवे –** (जन्म – १९४९) प्रसिद्ध कवी. 'ऋतू फुलांचा', 'चंद्रमेंदीच्या खुणा', 'संप्रधार', 'काहूर', 'समर्पण' हे कवितासंग्रह प्रसिद्ध. ही कविता 'काहूर' या कवितासंग्रहातून घेतली आहे.

जीवन जगताना प्रत्येकास सुख-दुःखांना सामोरे जावे लागते. जीवनात आलेल्या संकटांना आपल्याला तोंड देता आले पाहिजे. असा बहुमोल संदेश या कवितेतून कवीने दिला आहे.

## स्वाध्याय



**प्र. १. दोन–तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) गुलाबाचे मोठेपण कवीने कसे सांगितले आहे?

(आ) ग्रीष्म ऋतूमुळे धरणीवर कोणता परिणाम होतो?

(इ) निराश–आशा कवीला कोणाबद्दल वाटते?

(ई) सुख–दुःखाची ऊन–सावली म्हणजे काय?

(उ) आयुष्याचा त्याग करू नको असे कवी का म्हणतात?

**प्र. २. थोडक्यात उत्तरे लिहा.**

(अ) मनासारखे सारे काही घडते का? यासाठी कवी कोणाकोणाची उदाहरणे कवितेतून देतात?

(आ) कवीने माणसाला कोणता बहुमोल संदेश दिला आहे?

**प्र. ३. तुमच्या मनाने उत्तरे लिहा.**

(अ) तुम्ही ठरवलेली गोष्ट घडत नाही तेव्हा तुम्ही काय करता?

(आ) ढग दाटून येतात परंतु पाऊस पडत नाही, तेव्हा तुमच्या मनात कोणते विचार येतात?

(इ) खूप ऊन लागू लागले, की तुम्ही सावली शोधता. सावलीमध्ये येताच तुम्हांला काय वाटते?

**प्र. ४. या कवितेत मनासारखे काही घडते का? असे कवी म्हणतात. आपल्याला मनासारखे घडावे असे नेहमी वाटते. मनासारखे काय काय घडावे, असे तुम्हांला वाटते? कल्पना करा व लिहा.**

### खेळूया शब्दांशी.

**(अ) या कवितेत सुखदुःख, ऊनसावली असे विरुद्धार्थी शब्द जोडून आलेले आहेत. असे प्रत्येकी पाच शब्द लिहा.**

**(आ) समानार्थी शब्द लिहा.**

| | |
|---|---|
| (अ) लतिका | (इ) देह |
| (आ) धरणी | (ई) नभ |

**उपक्रम :** वसंतऋतूत झाडांना पालवी फुटते अशा वेळी झाडांचे निरीक्षण करा व कडूनिंबाच्या झाडाचे पानाफुलांसहित चित्र काढा. रंग द्या.

### सुविचार.

(१) जीवन हा महासागर होय. त्याच्या तुफान लाटांना बघून मनुष्य घाबरतो; परंतु त्याच्या तळाशी दडलेल्या रत्नांचा शोध घेण्याचा तो प्रयत्न करत नाही.

(२) जीवन फुलासारखे असू द्या. मात्र ध्येय मधमाशीसारखे ठेवा.

- **खालील धातूंपासून धातुसाधिते तयार करा.**

| मूळ धातू | धातुसाधिते |
|---|---|
| (१) बोल | बोलणे, बोलत, बोलता, बोलणारा, बोलून, बोलला |
| (२) कर | ............................................... |
| (३) धाव | ............................................... |

- **खालील वाक्यांतील संयुक्त क्रियापदे अधोरेखित करा.**

(१) मुले योगासनाची प्रात्यक्षिके पाहायला गेली.

(२) पालक मुलांसाठी सतत राबत असतात.

(३) गणूने सर्व कामे झटपट आटपून घेतली.

(४) मला चित्रे रेखाटायला आवडते.

- **खालील तक्ता वाचा व समजून घ्या.**

| अ.क्र. | उदाहरण | मुख्य धातूचे कृदन्त | सहायक क्रियापद | संयुक्त क्रियापद |
|---|---|---|---|---|
| १. | सुरेश समुद्रात पोहू शकतो. | पोहू | शकतो | पोहू शकतो. |
| २. | चोर पोलिसाला पाहून पळाला. | पाहून | पळाला | पाहून पळाला. |
| ३. | आरोपीला आपली बाजू मांडू दे. | मांडू | दे | मांडू दे. |
| ४. | पोस्टमन हल्ली रोज येऊ लागला. | येऊ | लागला | येऊ लागला. |



**वाचा.**

आपल्या भारत देशाला पाण्याचा प्रश्न भेडसावू लागला आहे. वर्षातून एकदा तरी डोळ्यांतून पाणी आणण्याइतपत तर कधी कधी तोंडचे पाणी पळण्याइतपत पाण्याची समस्या गंभीर होऊ लागली आहे. पावसाचा अनियमितपणा, भूजल पातळी खालावणे, पावसाच्या पडणाऱ्या व वाहून जाणाऱ्या पाण्याचे संवर्धन करण्याकडे दुर्लक्ष, पाण्याचा भरमसाट वापर यांमुळे पाण्याचे दुर्भिक्ष्य जाणवू लागले आहे.

आपले आई-वडील किंवा आपले आजी-आजोबा म्हणताना आपण ऐकतो, की आमच्या लहानपणी प्रत्येकाच्या घरामागे स्वयंपाकघरातील, स्नानगृहातील पाणी छोट्या-छोट्या ओहळांतून अळू, केळी, फुलझाडे, मिरच्या किंवा वांग्यांची झाडे यांना दिले जाई. म्हणजेच सांडपाण्याच्या व्यवस्थापनाचा हा एक भाग होता, असे आपल्या लक्षात येते. घरगुती सांडपाण्यात स्वयंपाकघरातील सांडपाणी, हात-पाय धुणे, तोंड धुणे, अंघोळ करणे, कपडे-भांडी यांच्या धुणावळीचे पाणी येते. हे सांडपाणी राखाडी रंगाचे असते. ते मलमूत्र असलेल्या सांडपाण्यापेक्षा कमी प्रदूषित असते. तंत्रज्ञानाचा उपयोग करून ह्या पाण्याचे शुद्धीकरण करणे व त्याच्या पुनर्वापरावर भर देणे गरजेचे आहे.

पावसाचे पडणारे पाणी संवर्धित करून त्याचा उपयोग शेती वा अन्य हितकर कामांसाठी करणे आवश्यक आहे. त्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन, चर्चा विनिमय करून प्रयत्न करणे, ठोस पावले उचलणे हितावह ठरेल.

# १९ मले बाजाराला जायाचं बाई!

**प्रभा र. बैकर**–(जन्म–१९४८) प्रसिद्‌ध लेखिका. 'प्राजक्त पाकळ्या', 'तिची गोष्ट' हे लघुकथासंग्रह, तसेच 'मनोगत', 'दवबिंदू झगमगणारे' हे ललितलेख प्रसिद्‌ध. 'बाई मी (विसर) भोळी ' हा विनोदी लेखसंग्रह, तसेच 'आनंदमेळा' हा बालगीतसंग्रह प्रसिद्‌ध.

माणसाने स्वतःच्या सुखसोईंसाठी प्लॅस्टिकच्या विविध वस्तू बनवल्या. त्यांच्या अतिवापरामुळे जनावरांचे मृत्यू, पर्यावरणाचा होणारा ऱ्हास असे भयावह परिणाम दिसू लागले आहेत. हे घडू नये म्हणून सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत. या सर्वांचे चित्रण अतिशय मार्मिकपणे भारुडाच्या अंगाने जाणाऱ्या या पथनाट्यातून केले आहे. 'प्लॅस्टिक टाळा, पृथ्वी वाचवा!', असा बहुमोल संदेश यातून दिला आहे.

BA5A23

- किराणा माल खरेदी करायला जाताना तुमचे आई-वडील कोणती तयारी करतात? त्याचे निरीक्षण करा व लिहा.



(आठवड्याच्या बाजाराला जाण्यासाठी काही स्त्रिया व काही पुरुष निघाले आहेत. जाताना एका घराच्या दारात एक स्त्री डोक्याला हात लावून बसलेली ते पाहतात. ते सर्व तिच्याजवळ येतात व त्यांच्यात हा संवाद सुरू होतो.)

**बाई** : 'मले बाजाराला जायाचं न्हाई,
मले बाजाराला जायाचं न्हाईऽऽ.'

**इतर** : का गं बाई, का गं बाई, का गं बाई?

**बाई** : नगं बाई, नगं बाई, नगं बाई.

**पहिला** : का बरं जायाचं न्हाई?
कारण काय ते सांगशील की न्हाई?

**बाई** : आवं, बाजाराला जायाचं, कशाकशाची खरेदी करायची?

**दुसरा** : कशाकशाची? कशाकशाची?

**बाई** : आवं मंडळी, डाळ, तांदूळ अन् भाजीपाला, साबण, कपडे, चपला,
काय बाय लागतं आपल्या सौंसाराला.

**तिसरा** : मग त्ये सम्दं घिऊन येकी, त्यात अवघड काय?

**बाई** : आरं, आणू कशात? ठेवू कशात?

**दुसरा** : आता तर समद्या वस्तू कॅरीबॅगमध्ये देतात की.

**बाई** : आवं, त्योच तर मोठा घोटाळा हाय!

**इतर** : कसा काय? कसा काय? कसा काय?

**पहिला** : कॅरीबॅग भरून आणावी,
वस्तू वतून डब्यात भरावी,
अन् कॅरीबॅग फेकून द्यावी. म्हंजी झालं.

**बाई** : त्या कॅरीबॅगा समद्या गटारीत अडकतात,
समद्या नाल्या तुडुंब भरतात,
अन् सांडपाणी येतं रस्त्यांत.

**दुसरा** : काय सांगता काय बाई ?

**बाई** : मंग ध्यानात येतं का न्हाई? म्हणून म्हन्ते...
'मले बाजाराला जायाचं न्हाई,
मले बाजाराला जायाचं न्हाई.'

**इतर** : का गं बाई, का गं बाई, का गं बाई ?

**बाई** : (रडत) अवं माजी हरणी... दुधाची म्हैस.

**तिसरा** : आता तिले काय झालं ?

**बाई** : अवं माजी हरणी मला सोडून गेली.

**दुसरा** : कुठं ? जंगलात की अरण्यात ?

**बाई** : न्हाई वो, ती मरून गेली.

**इतर** : कशापायी मेली तुजी हरणी,
तिच्यासाठी तू का गाते रडगाणी,
का न्हाई केलं तू औषधपाणी ?

**बाई** : ते तर सांगतेय म्या, ध्यानात येतं का न्हाई ?
प्लॅस्टिकच्या कॅरीबॅगा तिनं चाऱ्यागत चगळल्या. तिच्या पोटात गेल्या. म्हणून तिचं मरणच ओढवलं.
तिचं बिचारं रेडकू रडरड रडलं,
दुधावाचून त्या लेकराचं अडलं,
माझं मन खूप तडफडलं.
प्लॅस्टिकचा कचरा हेच कारण,
जनावरांचं ओढवतंय मरण.
म्हणून म्हन्ते.

**इतर** : काय म्हन्ते ?

**बाई** : 'मले बाजाराला जायाचं न्हाई,
मले बाजाराला जायाचं न्हाई.'

**पहिला** : अवं सरकारनी काढलाय आदेश,
प्लॅस्टिक नका वापरू हे त्यातलं विशेष,
'सजीवांना वाचवूया' हा दिलाय संदेश.
पेपरातली बातमी वाचली की न्हाय, आता काय तुमी अंगठाबहाद्दर नाय.

**तिसरा** : सांग रे बाबा सांग. मले आठवत नाय. पेपरात आलंय तरी काय ?

**बाई** : त्या समिंदर किनाऱ्यावर, त्या समिंदर किनाऱ्यावर.

**दुसरा** : काय झालं समिंदर किनाऱ्यावर ?

**बाई** : त्या समिंदर किनाऱ्यावर,
मरून पडली बिचारी दोन हजार कासवं,
त्येच्यासाठी डोल्यातून वाहतात आसवं.

**तिसरा** : आरं आरं आरं! फार वाईट घडलं.
प्लॅस्टिकच्या विळख्यातून जलचरसुदीक न्हाई वाचलं.

**बाई** : ध्यान देऊन ऐका. यवढंच न्हाय.

**पहिला** : आनखी आक्रीत घडलंय काय ?

**बाई** : प्लॅस्टिक वापरू नका.
सरकारनं केलाय कायदा.
सजीवांना वाचवायचा केलाय वायदा.

**दुसरा** : खरंच की काय ?

**बाई** : आपण अन् पोरंबाळ खाणार काय!
आपली काळी माय ओसाड होत हाय.

**तिसरा** : कशी काय, कशी काय ?

**बाई** : जमीन नांगरली,
प्लॅस्टिकची जाळी वरती आली.
शेतात पीक येईल कसं,
कशी मिळतील खंडीभर कणसं.
म्हणून म्हंते,
'मले बाजाराला जायाचं न्हाई,
मले बाजाराला जायाचं न्हाई.'

**पहिला** : यापेक्षा म्या सांगतो तसं कर. समद्या लोकांना उपदेश कर.

**बाई** : त्यो वो काय ?

**तिसरा** : 'वापरू पिशवी कापडाची अन् कागदाची,
प्लॅस्टिक पिशवी नकोच, काळजी घेऊ वसुंधरेची.'

**इतर** : आता तरी बाजाराला जाशील का न्हाई ?

**बाई** : व्हय. व्हय. व्हय.
पर मी.... प्लॅस्टिक थैली हातात धरनार न्हाई!
'मले बाजाराला जायाचं हाईऽ



मले बाजाराला जायाचं बाईऽ'.

**सर्वजण:** चला, चला, चला...ऽ बाजाराला चला. कापडाची थैली.... घेऊन बाजाराला चला...ऽ

**कागद-कपडाच वापरा, नको प्लॅस्टिकचा कचरा ।**
**होत नाही त्याचा निचरा, आर्ततेने सांगते वसुंधरा ।**
**कागद-कपडाच वापरा ॥**

## स्वाध्याय



**प्र. १. तीन-चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) बाजाराला जायचे नाही असे बाई का म्हणतात ?

(आ) कॅरीबॅग इतरत्र फेकून दिल्याने काय घडते ?

(इ) बाईच्या हरणीचे मरण का ओढवले ?

**प्र. २. असे का घडले ?**

(अ) काळी माय ओसाड झाली.

(आ) सरकारने आदेश काढून संदेश दिला.

(इ) समुद्रकिनाऱ्यावर जलचर मरून पडले.

(ई) बाई बाजाराला जायला तयार झाल्या.

**प्र. ३. कोण, कोणास व का म्हणाले ?**

(अ) 'सांग रे बाबा सांग. मले आठवत नाय. पेपरात आलंय तरी काय ?'

(आ) 'प्लॅस्टिकची जाळी वरती आली.'

**प्र. ४. कोणकोणत्या प्लॅस्टिक वस्तूंचा पुन्हा वापर करता येईल ? याबाबत मित्रांशी चर्चा करा व त्याची यादी तयार करा.**

प्र. ५. तुम्ही किराणा दुकानात गेले असताना कापडी पिशवी घेऊन न येणाऱ्या काकांनी दुकानदाराला प्लॅस्टिकची पिशवी मागितल्यानंतर तुम्ही, काका व दुकानदार यांच्यातील संवाद लिहा.

प्र. ६. ओला कचरा व सुका कचरा यांमध्ये कोणकोणत्या वस्तूंचा समावेश होतो याबाबत मित्रांशी चर्चा करा व त्यांची यादी तयार करा.

प्र. ७. प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर बंद केल्याने कोणकोणते फायदे होतील याची कल्पना करा व लिहा.

प्र. ८. शाळा-शाळांमधून प्लॅस्टिक कचरामुक्त अभियान हा उपक्रम राबवला गेला. प्लॅस्टिकचा कचरा गोळा करताना तुम्ही कोणकोणत्या वस्तू उचलल्या ते लिहा.

## खेळूया शब्दांशी.

(अ) खालील शब्द प्रमाणभाषेत लिहा.

| | | |
|---|---|---|
| (१) न्हाई | (५) म्हन्ते | (९) यवढंच |
| (२) सौंसाराला | (६) माजी | (१०) हाय |
| (३) म्हंजी | (७) त्येच्यासाठी | (११) व्हय |
| (४) समद्या | (८) डोल्यातून | (१२) त्यो |

(आ) खालील वाक्य वाचा.

माझी आजी अंगठाबहाद्दर आहे. अंगठाबहाद्दर म्हणजे अशिक्षित. तसे खालील शब्दांचे अर्थ समजून घ्या. त्यांचा वाक्यांत उपयोग करा.

(१) अकलेचा कांदा - मूर्ख मनुष्य.
(२) उंटावरचा शहाणा - मूर्खपणाचा सल्ला देणारा.
(३) उंबराचे फूल - क्वचित भेटणारी व्यक्ती.
(४) एरंडाचे गुऱ्हाळ - कंटाळवाणे भाषण करणे.
(५) कळीचा नारद - भांडणे लावणारा.
(६) गळ्यातला ताईत - अतिशय प्रिय.
(७) जमदग्नी - अतिशय रागीट मनुष्य.
(८) झाकले माणिक - साधा पण गुणी मनुष्य.
(९) दीड शहाणा - मूर्ख.
(१०) लंकेची पार्वती - अंगावर दागिने नसलेली स्त्री.

## हे करून पाहूया.

(अ) टाकून दिलेल्या प्लॅस्टिकच्या वस्तूंमध्ये रोपटी लावा व छान बाग तयार करा.

(आ) प्लॅस्टिक पिशव्या न वापरण्याच्या संदर्भात गटनिहाय किमान दहा घोषवाक्ये तयार करा.

(इ) 'मले बाजाराला जायाचं बाई' या पथनाट्याचे वर्गात सादरीकरण करा.

## आपण समजून घेऊया.

- **काळाचे मुख्य प्रकार**

(१) वर्तमानकाळ (२) भूतकाळ (३) भविष्यकाळ

**वर्तमानकाळाचे चार उपप्रकार पडतात.**

साधा वर्तमानकाळ | अपूर्ण वर्तमानकाळ | पूर्ण वर्तमानकाळ | रीती वर्तमानकाळ

- **पुढील वाक्यांचे निरीक्षण करा.**

(१) रमाकांत गाणे ऐकतो.
(२) दादा सायकल चालवतो.
(३) पक्षी किलबिल करतात.

वरील सर्व क्रिया वर्तमानकाळात घडतात. म्हणून वरील सर्व वाक्यांत साधा वर्तमानकाळ आहे.

- **खालील वाक्यांचे निरीक्षण करा.**

(१) माझ्या ताईने गाणे गायले आहे.
(२) सूर्य पश्चिमेला मावळला आहे.
(३) संजय घरी पोहोचला आहे.

वरील वाक्यांमधील गाणे गाण्याची, सूर्य मावळण्याची, घरी पोहोचण्याची क्रिया नुकतीच पूर्ण झालेली आहे, म्हणून हा पूर्ण वर्तमानकाळ होय.

- **पुढील वाक्यांचे निरीक्षण करा.**

(१) पूनम अभ्यास करत आहे.
(२) आई भाजी चिरत आहे.
(३) मुले क्रीडांगणावर खेळत आहेत.

वरील वाक्यांत अभ्यास करण्याची, चिरण्याची, खेळण्याची क्रिया अजून अपूर्ण असल्यामुळे हा अपूर्ण वर्तमानकाळ होय.

- **खालील वाक्यांचे निरीक्षण करा व क्रियापदे अधोरेखित करा.**

(१) संध्या गीत गात असते.
(२) रोहिणी चित्र रंगवत असते.
(३) आई उत्तम पदार्थ बनवत असते.

वरील क्रियापदांवरून गाण्याची, चित्र रंगवण्याची, पदार्थ बनवण्याची क्रिया सतत, नेहमी घडण्याची रीत (प्रथा) आहे असा अर्थ व्यक्त होतो, म्हणून त्याला रीती वर्तमानकाळ म्हणतात.


- **खालील तक्ता पूर्ण करा.**

| अ.क्र. | साधा वर्तमानकाळ | अपूर्ण वर्तमानकाळ | पूर्ण वर्तमानकाळ |
|---|---|---|---|
| (१) | ................ | आजी भाजी विकत आहे. | ................ |
| (२) | ................ | ................ | सोनाराने दागिना घडवला आहे. |
| (३) | आज पाऊस आला. | ................ | ................ |
| (४) | ................ | अजय सहलीला जात आहे. | ................ |
| (५) | आई बाळाला भात भरवते. | ................ | ................ |

**शिक्षकांसाठी :** वर्तमानकाळ, भूतकाळ व भविष्यकाळ यांच्या प्रकारांची विविध उदाहरणे देऊन उपयोजनात्मक सराव करून घ्यावा.

- खालील चित्राचे निरीक्षण करा. चित्रातील हे दृश्य पाहून सूचनांचे फलक तयार करा.





- खालील चौकटींत काही म्हणींचे अर्थ दिले आहेत ते वाचा. त्यावरून म्हणी ओळखा व लिहा.

न आवडणाऱ्या माणसाने कितीही चांगली गोष्ट केली, तरी ती वाईट दिसते. त्या व्यक्तीचे काम आवडत नाही.

एखाद्या माणसाला काम करता येत नसले, की तो कारणे देत असतो.

एखादी गोष्ट तात्काळ व्हावी याकरिता काही लोक उतावळेपणाने जे उपाय करतात त्यांना हे म्हटले जाते.

जे समोर दिसते त्यासाठी कोणत्याही पुराव्याची गरज भासत नसते.

# ओळख थोरांची

## भाग १ – खाशाबा जाधव

**संजय दुधाणे –** (जन्म – १९७६) बालपणापासून खेळाची आवड. 'ऑलिंपिकवीर खाशाबा जाधव', 'ध्रुवतारा सचिन तेंडुलकर', 'मेजर ध्यानचंद', 'अजिंक्यतारा', 'फ्लाईंग शीख मिल्खासिंग', 'वाटचाल एशियाडची', 'वाटचाल ऑलिंपिकची', 'क्रीडा पर्वणी', 'कथा ऑलिंपिकच्या' इत्यादी क्रीडाविषयक पुस्तके प्रकाशित. 'ऑलिंपिकवीर खाशाबा जाधव' या पुस्तकातून हा उतारा घेतला आहे.




कराडमधील कृष्णा नदीच्या काठावरील गोळेश्वर हे छोटेसे गाव. पुतळाबाई व दादासाहेब यांचा खाशाबा हा छोट्या चणीचा मुलगा. 'अण्णा' या टोपणनावाने ओळखला जाणारा हा मुलगा पुढे ऑलिंपिकवीर झाला.

खाशाबांचे आजोबा उत्तम कुस्तीपटू होते, तर वडिलांनीही तरुणपणात आखाड्यातील कुस्त्या गाजवल्या होत्या. वडिलांच्या तालमीत खाशाबांच्या कुस्तीचा श्रीगणेशा झाला आणि त्यांचे नाते मातीशी जुळले. प्रतिस्पर्धी मल्लास चीत कसे करायचे, मान कशी पकडायची, पट कसा काढायचा याचे धडे खाशाबांनी वडिलांकडून आत्मसात केले. त्याकाळी गावागावांत उरूस भरायचे. या उरुसांत, जत्रेत आखाडे भरत. खाशाबांनी वयाच्या आठव्या वर्षी पहिल्यांदा जत्रेतील कुस्ती जिंकली होती.

शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी टिळक हायस्कूलमध्ये प्रवेश घेतला. गोळेश्वर गावापासून हायस्कूल पाच किलोमीटर दूर होते. सकाळी शाळेत लवकर पोहोचण्यासाठी खाशाबा रोज चालत न जाता पळत जायचे व अंधार पडण्यापूर्वी घरी परतता यावे म्हणून पळत यायचे. पळत जाण्या-येण्याच्या सवयीमुळे त्यांचा कुस्तीतला दम चांगलाच तयार होत गेला. अनवाणी पायाने धावल्यामुळे पाय काटक बनले. पावसाळ्यात झाडाझुडपांतून गुडघ्यापर्यंत चिखल तुडवत, पावसाची तमा न बाळगता खाशाबांनी शिक्षण व व्यायामाची साधना केली.

जगातील सर्वोत्तम समजल्या जाणाऱ्या ऑलिंपिक क्रीडास्पर्धेचा पंधरावा महोत्सव फिनलँडची राजधानी हेलसिंकी येथे १९५२ साली पार पडला. तेथे खाशाबांनी भारताला कुस्ती या खेळप्रकारात कांस्यपदक मिळवून दिले. ऑलिंपिक क्रीडास्पर्धेत भारताला मिळालेले हे पहिले पदक होय.

**चर्चा करून सांगूया.**



(अ) तुम्हांला सर्वांत जास्त कोणता खेळ आवडतो ?

(आ) तुम्हांला कोणता खेळाडू सर्वांत जास्त आवडतो ? का आवडतो ?

(इ) दूरदर्शनवरील क्रीडाजगतमधल्या बातम्या पाहा व ऐका. वर्गात त्यावर चर्चा करा.

## भाग २ – दादाजी रामजी खोब्रागडे




तांदळाच्या अनेक जाती आहेत. त्यांपैकी एका जातीचे नाव आहे एचएमटी. तांदळाची ही नवी जात शोधून काढली एका शेतकऱ्याने. त्यांचे नाव दादाजी रामजी खोब्रागडे. ते चंद्रपूर जिल्ह्यातील नागभीड तालुक्यातील नांदेड या गावचे. दादाजींचे वडील रामजी. ते फार काळजीपूर्वक शेती करायचे. पेरणीच्या अगोदर बियाणे निवडायचे. खराब दाणे बाजूला काढायचे. दादाजींनी वडिलांना 'असे का करता?' म्हणून विचारले. तेव्हा वडील म्हणाले, 'चांगले बी पेरले तर चांगली उगवण होते.' दादाजींना तेव्हापासून बियाणे निवडण्याची सवय लागली, तशीच निरीक्षणाचीही लागली.

ते मोठे झाले आणि शेती करू लागले. एकदा शेतात फिरत असताना त्यांच्या लक्षात आले, की भाताच्या काही ओंब्या जास्त गडद पिवळ्या रंगाच्या आहेत. त्यांनी नेमक्या त्या हेरून ठेवल्या व त्या परिपक्व झाल्यानंतर बाजूला काढून एका वेगळ्या पिशवीत ठेवल्या. दुसऱ्या वर्षी त्यांनी ते बियाणे शेताच्या मधोमध पेरले. त्यांच्या लक्षात आले, की या बियाणांपासून आलेल्या ओंब्यांना इतरांपेक्षा अधिक दाणे आहेत. त्यांनी असे अनेक वर्षे केले. त्यांची खात्री पटली, की हे बियाणे अधिक उत्पादन देऊ शकते. त्यांनी गावातील लोकांना ते लावण्याची विनंती केली; पण कोणी तयार झाले नाही, शेवटी भीमराव शिंदे तयार झाले. त्यांनी चार एकरांवर पहिल्यांदा ते बियाणे वापरले आणि आश्चर्य असे, की अवघ्या चार एकरांमध्ये ९० क्विंटल तांदळाचे उत्पादन झाले. तळोधी बाळापूरच्या बाजारात हा तांदूळ गेला, तेव्हा त्यावर व्यापाऱ्यांच्या अक्षरश: उड्या पडल्या. तेथेच या तांदळाचे नाव पडले 'एचएमटी'. वर्षभर मजुरी करून उदरनिर्वाह करणाऱ्या या संशोधक शेतकऱ्याने हंगामाच्या काळात मुलीच्या दीड एकर शेतीमध्ये अनेक प्रयोग केले. त्यांनी तांदळाच्या एकूण आठ जाती शोधून काढल्या आहेत. या शेतकरी शास्त्रज्ञाला कृषिभूषणसह अनेक पुरस्कार मिळाले आहेत. अवघ्या दीड एकर शेतावर प्रयोग करणारा असा हा शेतकरी.

### नवीन काही शोधूया.

**(अ) धान्य व फळांच्या दुकानात जा. खालील वस्तूंच्या जातींची नावे विचारा. यादी करा.**

| | | |
|---|---|---|
| (१) गहू – | (४) डाळिंब – | (७) ज्वारी – |
| (२) केळी – | (५) तांदूळ – | (८) आंबे – |
| (३) ऊस – | (६) संत्री – | (९) तूर – |

**(आ) तांदूळ या धान्यापासून कोणकोणते पदार्थ तयार केले जातात त्याची यादी तयार करा.**

**(इ) आंतरजालाच्या साहाय्याने महाराष्ट्रामध्ये कोणकोणत्या जिल्ह्यांत तांदळाचे उत्पादन घेतले जाते याची माहिती मिळवा व लिहा.**

**उपक्रम :** तुम्हांला आवडणाऱ्या थोर व्यक्ती, खेळाडूंविषयीची माहिती विविध संदर्भग्रंथांतून मिळवा. वर्गातील सर्व मुलांनी लिहिलेल्या माहितीचे मासिक, हस्तलिखित तयार करा.

# २१ या काळाच्या भाळावरती

- ऐका. म्हणा. वाचा.


या काळाच्या भाळावरती, तेजाचा तू लाव टिळा
आणि फुलू दे तुझ्या श्रमातुन मानवतेचा इथे मळा ॥धृ॥

नित्य नवी तू पाही स्वप्ने
साकाराया यत्न करी
सूर्यफुलांच्या फुलवी बागा
उजेड यावा घरोघरी
वाहत येवोत समृद्धीच्या,
नद्याच सगळ्या खळाखळा ॥१॥

काट्यांमधल्या वाटांमधुनि
चालत जा तू पुढे पुढे
या वाटा मग अलगद नेतील
पाऊस भरल्या नभाकडे
झळा उन्हाच्या सरुन जातील,
नाचत येईल पाणकळा ॥२॥

अंधाराला तुडवित जाऊन
घेऊन ये तू नवी पहाट
कणाकणाला उजेड देऊन
उजळ धरेचे दिव्य ललाट
डोंगर सागर फत्तर यांना,
सुवर्णसुंदर देई कळा ॥३॥

उंच आभाळी घेऊन झेपा
काढ शोधुनि नव्या दिशा
नवीन वारे घेऊन ये तू
घेऊन ये तू नव्या उषा
करणीमधुनी तुझ्या गाऊ दे,
धरणीवरल्या शिळा शिळा ॥४॥



**उत्तम कोळगावकर**–(जन्म १९४९) ग्रामीण परिसराशी निगडित अशा अनुभवांतून व प्रतिमासृष्टीतून चिंतनशील कविता रचणारे कवी. अनेक मासिकांतून काव्यलेखन. ‘जंगलझडी’, ‘तळपाणी’ हे काव्यसंग्रह आणि ‘छप्पापाणी’ हा बालकवितांचा संग्रह प्रसिद्ध.

कोणतीही गोष्ट साध्य करायची असेल तर आपण श्रमाची तयारी ठेवावी. येणाऱ्या अडचणींना, समस्यांना न घाबरता सामोरे गेलो तर अशक्य असे काही नसते. हे या कवितेतून कवीने स्पष्ट केले आहे.

## स्वाध्याय



**प्र. १. चार–पाच वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) नवीन स्वप्ने साकार करण्यासाठी कोणकाणते प्रयत्न करण्यास कवी सांगत आहे?

(आ) पानकळा नाचत केव्हा येईल असे कवीला वाटते?

(इ) नवीन दिशा शोधायला कवी का सांगत आहे?

**प्र. २. 'आणि फुलू दे तुझ्या श्रमातून मानवतेचा इथे मळा' या ओळीचा अर्थ सांगा.**

**प्र. ३. मानवतेचे कार्य केलेल्या एका व्यक्तीच्या कार्याची माहिती आठ–दहा वाक्यांत लिहा.**

**प्र. ४. तुमची इतरांना मदत होईल, असे कोणते चांगले काम तुम्ही करू इच्छिता ते सविस्तर लिहा.**

**प्र. ५. कवितेतील मानव रोज नवी स्वप्ने पाहतो, तशी तुम्ही कोणकोणती स्वप्ने पाहता?**

**प्र. ६. खालील तक्त्यात 'अ' गटात कवितेच्या ओळी दिल्या आहेत. 'ब' गटात ओळींचा अर्थ लिहा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (अ) सूर्यफुलांच्या फुलवी बागा<br>उजेड यावा घरोघरी | (१) |
| (आ) काट्यांमधल्या वाटांमधुनि<br>चालत जा तू पुढे पुढे | (२) |
| (इ) अंधाराला तुडवित जाऊन<br>घेऊन ये तू नवी पहाट | (३) |
| (ई) उंच आभाळी घेऊन झेपा<br>काढ शोधुनि नव्या दिशा | (४) |

### खेळूया शब्दांशी.

**(अ) पुढील शब्दांचे समानार्थी शब्द कवितेतून शोधा व लिहा.**

(अ) कपाळ (ई) पृथ्वी

(आ) प्रयत्न (उ) सकाळ

(इ) आकाश (ऊ) दगड

**(आ) कवितेतील शेवटचे अक्षर सारखे असणारे शब्द लिहा.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (१) | टिळा | मळा | (५) | देऊन | |
| (२) | | घरी | (६) | पहाट | |
| (३) | खळखळा | | (७) | दिशा | |
| (४) | धरणी | | (८) | नेतील | |

(इ) 'कणाकणाला' म्हणजे प्रत्येक कणाला अशा प्रकारचे इतर शब्द शोधून लिहा.

प्र. ७. नवी स्वप्ने, नवी पहाट, नव्या दिशा हे शब्दसमूह कवितेत आलेले आहेत. हे शब्दसमूह कोणत्या अर्थाने आले आहेत ते लिहा.

प्र. ८. या कवितेत कवी माणसाला नवीन काही करण्यासाठी प्रोत्साहन देतो. तसे तुम्हांला घरातील व्यक्ती कोणत्या गोष्टींसाठी कसे प्रोत्साहन देतात ? ते लिहा.


**वाचा.**

## यश : जसा विचार तसा दृष्टिकोन

रोजचा दिवस आपल्यापुढे नवीन आव्हाने घेऊन येतो. ती आव्हाने पेलण्याचे सामर्थ्य अंगी बाणायचे असेल तर स्वतःला घडवले पाहिजे. स्वतःला घडवायचे ते कशासाठी, तर जीवनात यशस्वी होण्यासाठी. काहीजण कमावलेल्या अफाट पैशाला यश मानतात; पण यश म्हणजे पैसा नव्हे, ती फार फार तर यशाची पावती असू शकते. तुम्हांला खूप प्रसिद्धी मिळाली म्हणजे तुम्ही यशस्वी झालात असे मुळीच नाही. तुम्ही अनेक मित्र जोडले, सतत तुम्ही त्यांच्या गराड्यात असता, म्हणून तुम्हांला यशस्वी म्हणता येत नाही. मग यश म्हणजे नेमके काय? आपण जे उद्दिष्ट ठरवलेले असते, ते प्राप्त करणे म्हणजे यश. आपल्या प्रत्येकाच्या अंगी काही कौशल्ये असतात, गुणवत्ता असते. त्या कौशल्यांची, गुणवत्तेची सर्वोत्तम पातळी गाठणे म्हणजे यश.

यश मिळवणे जितके महत्त्वाचे असते, त्यापेक्षा मिळवलेले यश टिकवणे अधिक महत्त्वाचे असते. स्वकष्टाने निर्माण केलेले स्थान टिकवण्यासाठी आपल्याला रोज नवे नवे शिकावे लागते. हे शिकत असताना चुका होणे काहीच गैर नाही; पण एकदा केलेली चूक पुन्हा पुन्हा करणे मात्र आपल्या प्रगतीतील धोंड आहे. तुमची खरी स्पर्धा इतरांशी नसते. ती स्वतःशीच असते. दुर्दैवाने याचाच आपल्याला विसर पडतो. मग आपले सगळे आयुष्य आपण इतरांशी स्पर्धा करण्यात, त्यांच्याशी तुलना करण्यात घालवतो. इतरांशी तुलना जरूर करावी; पण ती स्वतःची क्षमता वाढवण्यासाठी, दुसऱ्याला कमी लेखण्यासाठी नव्हे. काल तुम्ही जे केले त्यापेक्षा आज तुम्ही निश्चित काही वेगळे, चांगले, उत्तम करू शकता. मग यश म्हणजे नेमके काय? तर जसा विचार तसा दृष्टिकोन.

**विचार करून सांगूया.**



सानिया आईबाबांबरोबर बाजारात गेली होती. तिला बाजारात दोन-अडीच वर्षांची एक मुलगी एकटीच रडताना दिसली. ती लहान मुलगी फारच घाबरलेली होती. कदाचित ती बाजारात हरवली होती. तिला पाहून सानिया अस्वस्थ झाली. तिला काही सुचेना आता काय करावे? तुम्ही तरी सांगा.....

**शिक्षकांसाठी :** पाठाखाली वाचनासाठी दिलेल्या उताऱ्याचे विद्यार्थ्यांकडून श्रुतलेखन व अनुलेखन करून घ्यावे.

## आपण समजून घेऊया.

वर्तमानकाळाप्रमाणेच भूतकाळाचे चार उपप्रकार पडतात.

साधा भूतकाळ | अपूर्ण भूतकाळ | पूर्ण भूतकाळ | रीती भूतकाळ

- **पुढील वाक्यांचे निरीक्षण करा व क्रियापदे अधोरेखित करा.**

(१) सकाळी मुलांनी प्रार्थना म्हटली.
(२) काल आम्ही सहलीत खूप मजा केली.
(३) केवढा मुसळधार पाऊस पडला काल.

वरील वाक्यांतील क्रियापदे भूतकाळी आहेत. सर्व क्रिया भूतकाळात घडतात म्हणून हा साधा भूतकाळ होय.

- **पुढील वाक्यांचे निरीक्षण करा आणि क्रियापदे अधोरेखित करा.**

(१) शंतनू क्रिकेट खेळत होता.
(२) जॉन चित्र काढत होता.
(३) मीना ग्रंथालयात पुस्तक वाचत होती.

क्रियापदाच्या निरीक्षणावरून असे लक्षात येते की वरील वाक्यांत खेळण्याची, चित्र काढण्याची, वाचण्याची क्रिया भूतकाळात अपूर्ण आहे. अपूर्ण भूतकाळात संयुक्त क्रियापदांचा वापर केला जातो.

- **पुढील वाक्यांचे निरीक्षण करा आणि क्रियापदे अधोरेखित करा.**

(१) गिर्यारोहकाने कडा सर केला होता.
(२) आमच्या वर्गाने क्रिकेटचा सामना जिंकला होता.
(३) स्वातंत्र्यप्राप्तीसाठी क्रांतिकारकांनी बलिदान दिले होते.

वरील वाक्यांमधील क्रियापदांच्या रूपावरून सर्व क्रिया भूतकाळात पूर्ण झालेल्या आहेत, म्हणून हा पूर्ण भूतकाळ होय.

- **पुढील वाक्यांचे निरीक्षण करा व क्रियापदे अधोरेखित करा.**

(१) उन्हाळ्यात ऊसतोडणी सुरू होत असे.
(२) तो नेहमी गाडीत पेट्रोल भरत असे.
(३) चंदू सनई वाजवत असे.

अधोरेखित क्रियापदावरून ऊसतोडणीची, पेट्रोल भरण्याची, सनई वाजवण्याची क्रिया भूतकाळात सतत घडण्याची रीत आहे असा अर्थ व्यक्त होतो, म्हणून हा रीती भूतकाळ होय.

- **खालील वाक्यांत क्रियापदांची योग्य रूपे घाला.**

(१) बिरबल स्वचातुर्याने सभा.........(जिंकणे)
(२) अभय गोष्टी .........(लिहिणे)
(३) सायकल चालवण्यामागे वीणा पर्यावरणाचा .............(विचार करणे)

- **पुढील वाक्यांत क्रियापदाचे अपूर्ण भूतकाळी रूप घाला.**

(१) काल पाच वाजता सोनाली शाळेतून ..........(येणे)
(२) वैभवी कालच्या नाटकात उत्तम अभिनय..... (करणे)
(३) काल नऊ वाजता सौरभ आकाशाचे ............. (निरीक्षण करणे)

# २२ वडिलांस पत्र

आजच्या युगात संदेशवहनाची वेगवेगळी अद्ययावत तंत्रज्ञान असणारी साधने उपलब्ध असली तरी पत्राद्वारे मनातील भावना व्यक्त करणे ही एक सुखावह बाब आहे. सहलीहून आलेल्या मुलाने वडिलांना पत्र लिहिले आहे. त्याने सहलीत पाहिलेल्या स्थळाबाबत झालेला आनंद पत्रातून कळवला आहे.

पुढील तक्त्यात संदेश-वहनाच्या काही साधनांची नावे दिली आहेत. तुम्ही संवाद साधताना ज्या साधनांचा वापर करता त्यापुढे ✓ अशी खूण करा.

| टपाल सुविधा | | ई-सुविधा | |
|---|---|---|---|
| पत्र | | दूरध्वनी | |
| स्पीडपोस्ट | | मोबाईल | |
| पार्सल | | एस.एम.एस | |
| कुरियर | | ई-मेल | |



समीर.
दि. २२ नोव्हेंबर, २०२१

तीर्थरूप बाबांना,
साष्टांग नमस्कार.



बाबा, कालच मी सहलीहून परतलो. सहल खूपच आनंददायी आणि अभ्यासपूर्ण झाली. खरंच बाबा, या सहलीमुळेच मला महाराष्ट्रात खूप किल्ले आहेत हे कळले. महाराष्ट्र किल्ल्यांचे राज्य आहे हेही मला उमगले.

बाबा, मावळातल्या सह्याद्रीच्या अत्युच्च शिखरावर वसलेला 'राजगड' आम्ही बघितला. अहो! या राजगडाला 'गडांचा राजा आणि राजांचा गड' असे म्हणतात. सहलीला जाण्यापूर्वीच शाळेत शिक्षकांनी आम्हांला राजगडाची प्रतिकृती दाखवली होती. त्यांनी सांगितले, '१६४६ साली छत्रपती शिवाजी महाराजांनी राजगड ताब्यात घेतला. हा किल्ला जुना, दुर्लक्षित, ओसाड पण बळकट आहे. इतकेच नव्हे तर तो अतिउंच असून अवघड अशा डोंगरावर आहे.'

बरं का बाबा, रायगडाप्रमाणेच राजगडसुद्धा छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजधानीचे ठिकाण. किती प्रचंड आणि भव्य किल्ला हा! या राजगडाचे भौगोलिक स्थान आणखीनच आगळेवेगळे. उत्तरेला गुंजवणी नदी, दक्षिणेला वेळखंड नदीवर भाटघर धरण, पूर्वेला पुणे-सातारा रस्ता तर पश्चिमेला सह्याद्रीचा घाटमाथा. भाटघर धरणाचे अथांग जलाशय आणि सृष्टिसौंदर्य बघून मला तिथून परतावंसंच वाटतं नव्हतं. बाबा, आमच्यासोबत अत्यंत बोलका आणि तज्ज्ञ मार्गदर्शक होता. तुम्ही मला नेहमीच किल्ल्यांबाबत सांगता तशी त्या मार्गदर्शकाने

आम्हांला किल्ल्याबाबत खूप छान माहिती पुरवली. त्याने सांगितले, 'या किल्ल्याची उंची सर्वांत जास्त आहे. याचा घेर बारा कोसांचा आहे. शिवाजी महाराजांनी त्याचा विस्तार केला. त्याला राजधानीचे ठिकाण बनवले. राजधानीला आवश्यक असलेले सर्व बांधकाम इथे करून घेतले.' बाबा, मी त्या किल्ल्याचे दुरून निरीक्षण केले. मला या किल्ल्याचा आकार उपड्या ठेवलेल्या सिलिंग फॅनसारखा जाणवला. मध्यभागी पंख्याचा उंचवटा म्हणजे बालेकिल्ला. पंख्याची तीन पाती म्हणजे पद्‌मावती, सुवेळा आणि संजीवनी या तीन माच्या.

किल्ल्याला देखणा व प्रसन्न परिसर लाभला आहे. परिसरात पर्यटकांसाठी अनेक फलक लावलेले आहेत. मी सर्व फलक वाचले. मला एक फलक खूप आवडला. त्यावर लिहिले होते, 'या गडावर नेताजी पालकर, तानाजी मालुसरे, येसाजी कंक, शिळीमकर या थोर व्यक्तींचे वास्तव्य होते. राजगडाने शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्य स्थापनेचे कार्य पाहिले. अंधाऱ्या रात्रीतील गुप्त खलबते ऐकली. महाराजांच्या अनेक नव्या मोहिमांची तयारी राजगडाने बघितली. अफझलखानाशी लढण्याचे बेत राजगडावर ठरले. पुरंदर पायथ्याशी तह करण्यास महाराज राजगडावरून गेले होते. महाराज आग्र्याहून सुटून बैराग्याच्या वेशात परत आले ते या राजगडावरच.' बाबा, आमच्या सरांनी सांगितले, 'जगातील सर्वोत्कृष्ट अशा चौदा किल्ल्यांच्या प्रतिकृती स्वित्झर्लंडमधील म्युझियममध्ये ठेवल्या आहेत. आपल्या सर्वांसाठी अभिमानाची गोष्ट अशी, की भारतातील एका किल्ल्याचा त्यात समावेश आहे आणि तो म्हणजे राजगड.'

या भव्य आणि ऐतिहासिक किल्ल्याचे दर्शन घेताना माझा ऊर अभिमानाने भरून आला. त्याचे वैभव मी डोळे भरून बघितले. आपल्या पुरातन वास्तूंत देशाचा गौरवशाली इतिहास दडलेला आहे. बाबा, आपण प्रत्येक मोठ्या सुट्‌टीत एक किल्ला बघण्याचे ठरवूया का? आई कशी आहे? इकडे आल्यापासून आजीच्या रात्री गुणगुणत असणाऱ्या भजनांना मी मुकलो आहे असे वाटते. वसतिगृहातले जेवण बरे आहे. तरीही आईच्या हातच्या जेवणाची खूप आठवण येते. अरे हो, मी निघालो, तेव्हा माझा मित्र महंमदची तब्येत बरी नव्हती. आता कशी आहे ते जरूर कळवा.

तुमचा,<br>
समीर.

## स्वाध्याय



**प्र. १. चार-पाच वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) राजगडाला 'गडांचा राजा आणि राजांचा गड' असे का म्हणतात?

(आ) शिक्षकांनी मुलांना राजगडाबाबत कोणती माहिती दिली?

(इ) राजगडाचे भौगोलिक स्थान आगळेवेगळे आहे असे का म्हटले असावे?

(ई) मार्गदर्शकाने मुलांना राजगडाविषयी कोणती माहिती पुरवली?

(उ) समीरला किल्ल्याचा आकार उपड्या ठेवलेल्या सिलिंग फॅनसारखा का जाणवला?

(ऊ) राजगडाने कोणकोणत्या ऐतिहासिक घटना पाहिल्या आहेत?

**प्र. २. समीर असे का म्हणाला असावा ?**

(अ) महाराष्ट्र किल्ल्यांचे राज्य आहे.
(आ) किल्ल्याहून मला परतावंसं वाटत नव्हतं.
(इ) मला एक फलक खूप आवडला.
(ई) आपल्या सर्वांसाठी अभिमानाची गोष्ट अशी, की भारतातील एका किल्ल्याचा त्यात समावेश आहे.
(उ) आपण प्रत्येक मोठ्या सुट्टीत एक किल्ला बघण्याचे ठरवूया का ?
(ऊ) आईच्या हातच्या जेवणाची खूप आठवण येते.

**प्र. ३. बसस्थानकावर प्रवाशांसाठी ध्वनिक्षेपकातून दिल्या जाणाऱ्या सूचना कोणकोणत्या भाषांमध्ये दिल्या जातात ? त्यांतील तुम्हांला आवडलेल्या कोणत्याही पाच सूचना लिहा.**

**प्र. ४. राजगडाने कार्य पाहिले, खलबते ऐकली असे वर्णन आले आहे म्हणजे निर्जीव वस्तूला सजीव समजून असे वर्णन केले आहे. खालील वस्तूंचे या पद्धतीने दोन ओळींत वर्णन लिहा.**

उदा.,










**प्र. ५. राजगडाची वैशिष्ट्ये दिलेल्या तक्त्यात लिहा.**




**प्र. ६. तुम्ही पाहिलेल्या एखादया किल्ल्याचे आठ-दहा वाक्यांत वर्णन करा.**

**प्र. ७. समीरचे पत्र वाचून समीरचे बाबा त्याला काय उत्तर पाठवतील याची कल्पना करा व लिहा.**

## खेळूया शब्दांशी.

**(अ) खालील शब्दांत लपलेले शब्द लिहा.**

(अ) वसतिगृहातले (आ) भारतातील (इ) राजधानी

**(आ) खालील शब्दांना दायी, शाली यांपैकी योग्य प्रत्यय लावून नवीन शब्द बनवा.**

| | | |
|---|---|---|
| (अ) गौरव | (इ) सुख | (उ) आनंद |
| (आ) वैभव | (ई) भाग्य | (ऊ) आराम |

## शोध घेऊया.

**(अ) स्वित्झर्लंडमधील म्युझियममध्ये जगातील चौदा किल्ल्यांच्या प्रतिकृती आहेत. त्या किल्ल्यांची नावे आंतरजालावरून मिळवा व लिहा.**

## वाचा.

**खालील तक्त्यात पत्राचे काही मायने दिले आहेत, त्यांचे वाचन करा.**

| कोणास | सुरुवात | शेवट |
|---|---|---|
| (१) आई/वडील | तीर्थरूप... यांना सा.न.वि.वि. | तुझा/तुमचा/तुझी/तुमची |
| (२) वडील मंडळीस | तीर्थस्वरूप... यांना सा.न.वि.वि. | आपला/आपली |
| (३) शिक्षकांस | गुरुवर्य... यांना सादर नमस्कार वि. वि. | आपला/आपली आज्ञाधारक |
| (४) धाकटा भाऊ, बहीण | प्रिय... यास अनेक आशीर्वाद | तुझा/तुझी |
| (५) मित्र/मैत्रीण | प्रिय मित्र/मैत्रीण/यांस/हीस सप्रेम नमस्कार | तुझा/तुझी |
| (६) सन्माननीय व्यक्ती | माननीय... यांना सा.न.वि.वि. | आपला/आपली नम्र |


## सारे हसूया.

**शिक्षक** : (रिनाला) – समज तुझ्याकडे १० बकऱ्या आहेत, त्यांपैकी ५ बकऱ्या भिंत ओलांडून निघून गेल्या तर किती उरतील?

**रिना** : सर, काहीच नाही.

**शिक्षक** : ते कसं? तुला वजाबाकी करता येत नाही?

**रिना** : सर, तुम्हांला बकऱ्यांबद्दल ठाऊक नाही ! एक गेली की तिच्यामागे सगळ्या निघून जातात.



## नेहमी लक्षात ठेवा.




जीव धोक्यात घालू नका,
दरीत डोकावून पाहू नका.

भर रस्त्यात गाडी थांबवू नका,
इतरांना जाण्यासाठी व्यत्यय
आणू नका.

शिस्त, नियम पाळूया,
पोहण्याचा आनंद घेऊया.



सर्वांगसुंदर व्यायाम पोहण्याचा,
आळस जाईल तना-मनाचा.

## विचार करून सांगूया.



संध्याकाळी अचानक ध्वनिक्षेपक वाजू लागला. आधी पोरांची गर्दी झाली मग गावची माणसेही आली. अरे वाह...! सरपंच आलेले दिसतात. आज गावात ग्रामसभा आहे तर !

अचानक कशासाठी ही सभा घेतली असावी ?

**आपण समजून घेऊया.**

वर्तमानकाळ आणि भूतकाळाप्रमाणेच भविष्यकाळाचेही चार उपप्रकार पडतात.

- साधा भविष्यकाळ
- अपूर्ण भविष्यकाळ
- पूर्ण भविष्यकाळ
- रीती भविष्यकाळ

- खालील वाक्यांचे निरीक्षण करा व क्रियापदे अधोरेखित करा.

(१) मी खूप शिक्षण घेणार.
(२) नंदिनी सायकल चालवणार.
(३) मुले विज्ञान प्रदर्शनात भाग घेणार.

वरील वाक्यांतील सर्व क्रियापदे भविष्यकाळातील आहेत.

- खालील वाक्यांचे निरीक्षण करा व क्रियापदे अधोरेखित करा.

(१) वैमानिकाने विमान चालवले असेल.
(२) प्रकाशला बक्षीस मिळालेले असेल.
(३) वाहनचालकाने गाडी गॅरेजमध्ये ठेवलेली असेल.

वरील वाक्यांतील चालवले असेल, मिळालेले असेल, ठेवलेली असेल ही या क्रियापदांवरून क्रिया भविष्यकाळात पूर्ण होणार आहे असे दर्शवतात. हा पूर्ण भविष्यकाळ आहे.

- खालील वाक्यांचे निरीक्षण करा व क्रियापदे अधोरेखित करा.

(१) तो निबंध लिहीत असेल.
(२) गाडी प्लॅटफॉर्मवर येत असेल.
(३) श्रेया स्पर्धा जिंकत असेल.

वरील वाक्यांतील लिहीत असेल, येत असेल, जिंकत असेल या क्रियापदांवरून भविष्यकाळात घडणाऱ्या अपूर्ण क्रियेचा बोध होतो, म्हणून ती वाक्ये अपूर्ण भविष्यकाळातील आहेत.

- खालील वाक्यांचे निरीक्षण करा व क्रियापदे अधोरेखित करा.

(१) सुरेश नेहमी गाणे म्हणत राहील.
(२) पक्षी चिवचिवाट करत राहतील.
(३) साहिल कविता रचत राहील.

वरील वाक्यांतील म्हणत राहील, करत राहतील, रचत राहील या क्रियापदांवरून भविष्यकाळात क्रिया सुरू राहतील, अशी रीती (प्रथा) सांगितल्यामुळे इथे तो रीती भविष्यकाळ आहे.

- खालील सारणी पूर्ण करा.

| काळ | सामान्य | अपूर्ण | पूर्ण | रीतिकाळ |
|---|---|---|---|---|
| वर्तमान | मधुबाला तबला वाजवते. | ............. | ............. | मधुबाला तबला वाजवत असते. |
| भूतकाळ | ............. | मधुबाला तबला वाजवत होती. | ............. | ............. |
| भविष्यकाळ | ............. | ............. | मधुबालाने तबला वाजवला असेल. | ............. |

# २३ परिवर्तन विचारांचे

B86T8N

एका मुलाच्या मनात निर्माण झालेली गैरसमजूत किती अवास्तव आहे हे त्याच्या शिक्षकांनी त्याला कसे पटवून दिले, या प्रसंगाचे अतिशय मार्मिक व उद्‌बोधक चित्रण या पाठात केले आहे.

- तुम्ही शाळेच्या सहलीला गेला होता का? कुठे ?
- तुम्हांला सर्वात कोणती सहल आवडली ? का आवडली ?
- तुम्ही सहलीला गेल्यावर काय काय केले ? तुमचा अनुभव पाच-सहा ओळींत लिहा.

अजय आठवीत शिकणारा मुलगा. अत्यंत साधा, सरळ आणि सहकार्यवृत्तीचा. अभ्यासात जेवढा हुशार, तेवढाच खेळातही प्रवीण. जसा मैदानं गाजवायचा, तसा वर्गातल्या मुलांच्या अभ्यासातल्या अडचणी सोडवायला एका पायावर तयार असायचा. त्यामुळे सगळ्यांना तो आपला वाटायचा. अगदी शिक्षकांचाही तो आवडता विद्यार्थी होता.

शाळेत सहलीचे वारे वाहू लागले, तसा अजय हिरमुसला, कारण त्याला माहीत होते, सहलीची फी आई भरू शकत नाही. घरातली ओढाताण त्याला जाणवत होती. त्यामुळे त्याने सहलीचा विषय घरात काढला नाही; पण आईला कुठून तरी सहलीचे समजले. तिने अजयला सहलीची फी दिली. त्याचा आनंद गगनात मावेना. तो पहिल्यांदाच सहलीला जात होता, त्यामुळे त्याच्या डोक्यात सतत सहलीचा विचार डोकावत होता. कधी एकदाचा सहलीचा दिवस उजाडतो असे त्याला झाले होते. सहलीचा दिवस निश्चित झाला. त्याची सहल शनिवारी जाणार होती. हे ऐकूनच अजयच्या कपाळावर आठ्या पसरल्या.

उद्या अजयची सहल जाणार होती. त्याने आईला बजावून बजावून सांगितले, 'आई, मला सकाळी लवकर उठव, नाहीतर मला उशीर होईल.' रात्री त्याला झोप येईना. कधी एकदाची सकाळ होते असे त्याला झाले होते. सकाळ झाली. अजय उठला. स्वत:चे पटपट आवरू लागला. तेवढ्यात भिंतीवरची पाल चुकचुकली. अजयने पालीकडे पाहिले. त्याला कसेतरीच झाले. स्वत:चे आवरून आईने दिलेला डबा घेऊन तो निघाला. घराबाहेर आला अन् त्याला मांजर आडवे गेले. परत एकदा त्याचे मन खट्टू झाले. आपली सहल नीट पार पडेल का? या विचारात अजय शाळेत पोहोचला. बस आली होती. मुलांमधला उत्साह ओसंडून वाहत होता. सहलीच्या प्रवासाला सुरुवात झाली. पाच-सहा किलोमीटर प्रवास झाला अन् बसचा टायर पंक्चर झाला.

मुले नाराज झाली. सगळी मुले बसखाली उतरू लागली. अजयच्या मित्राचा पाय बसमधून उतरताना मुरगळला. तो वेदनेने रडू लागला. अजय अस्वस्थ झाला. सकाळपासून हे काय होते आहे? असे त्याला वाटू लागले. पाल चुकचुकणे, मांजर आडवे जाणे या गोष्टींना आई अपशकुन मानते. खरंच असतील का हे शकुन-अपशकुन?

अजय बसखाली उतरला. त्याने बसकडे पाहिले व जवळच्या एका खडकावर जाऊन बसला. पाय मुरगळलेल्या मित्राला एका सरांनी दवाखान्यात नेले होते. अजय उदास दिसत होता. त्याच्या वर्गशिक्षकांचे त्याच्याकडे लक्ष गेले. ते अजयजवळ आले. त्यांनी अजयच्या पाठीवर हात ठेवला तसा अजय दचकला. सर अजयला म्हणाले, 'काय झाले अजय ? असा का बसलास?' अजयने सरांना त्याच्या मनात चाललेले विचार व अस्वस्थता सांगितली. शेवटी तो सरांना म्हणाला, 'सर, सकाळपासून हे असे अपशकुन. त्यात आज शनिवार. शनिवार म्हणजे ना कर्त्याचा वार; वाईट वार. सर, आपली सहल नीट पार पडेल ना?' सर हसले व म्हणाले, 'चल, बस सुरू झाली आहे.'

तेवढ्यात डॉक्टरांकडे गेलेला अजयचा मित्र व शिक्षक आले. जाताना रडत गेलेला मित्र, हसत आलेला पाहून अजयला बरे वाटले. डॉक्टरांनी त्याच्या पायाचा

मुरगळा काढला अन् त्याला औषधही दिले होते.

दिवसभर मुलांनी सहलीत धमाल केली. मजा केली. कविता गायल्या. गाण्याच्या भेंड्या खेळल्या. खूप गप्पा मारल्या. नाच केला. एकमेकांना कोडी घातली. विनोद सांगून व ऐकून पोट धरून हसले. निसर्गाचे निरीक्षण केले. निसर्गात फिरले. खूप गमतीजमती केल्या.

संध्याकाळी सहल परतली. सगळे एकमेकांना टाटा करून घरी निघाले. सरांनी अजयला हाक मारली अन् म्हणाले, 'अजय, कशी झाली सहल? कसा गेला आजचा दिवस?' अजय आनंदाने म्हणाला, 'सर, खूप मस्त, खूप मजा आली. धमाल केली सर सहलीत. आजचा दिवस खूपच आनंदात गेला.' सर खळखळून हसले. अजयच्या खांद्यावर हात ठेवत सर म्हणाले, 'अजय, कोणताही वार हा वाईट नसतो. तू तर विज्ञानाचा अभ्यास करणारा विद्यार्थी आहेस अन् असल्या अशास्त्रीय गोष्टींवर विश्वास ठेवतोस?' अजयची चलबिचल झाली. तो कावराबावरा होऊन सरांकडे पाहू लागला. सर पुढे म्हणाले, 'अरे, विज्ञानाने किती प्रगती केली आहे. जग किती पुढे गेले आहे. रोज नवे नवे शोध लागताहेत आणि आपण असल्या खुळचट, बिनबुडाच्या कल्पना धरून बसायचे? बाळा, आपण काही खात असू, तर आवाज होतोच ना ! स्वाभाविक नाही का हे ? आणि मांजर सजीव आहे म्हटल्यावर ते इकडून तिकडे फिरणारच. एका जागेवर बसून तर राहू शकत नाही ना. तिच्या येण्या-जाण्याने आपल्याला कसला अडथळा येऊ शकतो ? बसच्या टायरला काही अणकुचीदार रुतले तर बस पंक्चर होते. हो की नाही ? अपशकुन वगैरे काही नसते. आणि बरं का बाळा, सगळे दिवस, वार चांगलेच असतात. मी तर म्हणेन, ज्या दिवशी आपण वाईट काम करू, दुसऱ्याला त्रास होईल असे वर्तन करू किंवा दुसऱ्याची मने दुखवू तो दिवस, तो वार वाईट म्हटला पाहिजे. समजले का?'



अजयच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. आपण किती अशास्त्रीय विचार करतो हे त्याला जाणवले. त्याचे मत परिवर्तन झाले आणि स्वच्छ मनाने व विचाराने तो घरी निघाला.



## स्वाध्याय

**प्र. १. चार ते पाच वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) अजय अस्वस्थ का झाला?

(आ) कोणताही वार हा वाईट नसतो हे सरांनी अजयला कसे पटवून दिले?

(इ) कोणत्या दिवसाला किंवा वाराला वाईट म्हटले पाहिजे असे सर म्हणतात?

**प्र. २. अजयचे मत परिवर्तन कसे झाले ते सविस्तर लिहा.**

**प्र. ३. कोण, कोणास व का म्हणाले ते सांगा.**

(अ) 'आपली सहल नीट पार पडेल ना ?'

(आ) 'तू तर विज्ञानाचा अभ्यास करणारा विद्यार्थी आहेस.'

## खेळूया शब्दांशी.


**(अ) खालील वाक्प्रचारांचा वाक्यांत उपयोग करा.**


(अ) मैदान गाजवणे.
(आ) एका पायावर तयार असणे.
(इ) कपाळावर आठ्या पसरणे.
(ई) मन खट्टू होणे.

**(आ) खालील शब्द वाचा व लिहा.**

चलबिचल, कावराबावरा, अघळपघळ, चटकमटक, ओबडधोबड, अवतीभवती, शेजारीपाजारी, आरडाओरडा, मोडतोड, जाडाभरडा, संगतसोबत, इडापिडा, टंगळमंगळ, अचकटविचकट, अदलाबदल, जडणघडण, अक्राळविक्राळ, उपासतापास, ठाकठीक, शेतीभाती.

**(इ) 'बिन' हा उपसर्ग लावून तयार झालेले शब्द खालील आकृतीत दिले आहेत. हे शब्द अभ्यासा. त्यानुसार 'गैर' हा उपसर्ग लावून तयार होणारे शब्द पुढील आकृत्यांमध्ये लिहा.**




**(ई) 'झपझप' या शब्दातून चालण्याची रीत समजते. तसे खालील शब्दांतून कोणत्या क्रियेची रीत समजते ते लिहा.**

| | |
|---|---|
| १. भरभर | चालणे, खाणे, बोलणे, आवरणे. |
| २. फाडफाड | |
| ३. धपधप | |
| ४. पटपट | |
| ५. धाडधाड | |

## हे करून पाहूया.

**(अ) अंधश्रद्धा निर्मूलनाविषयी काही घोषवाक्ये तयार करा. ही घोषवाक्ये वर्गात किंवा परिसरात लावा.**

**(आ) अंधश्रद्धा निर्मूलनाविषयक बातम्यांची कात्रणे वर्तमानपत्रांतून काढून वहीत चिकटवा.**

**(इ) अंधश्रद्धा निर्मूलनावर आधारित नाटक तयार करा व वर्गात सादर करा.**

# २४ रोजनिशी

BHB6HK

रोजनिशी लिहिल्याने माणसाला जीवनाकडे बघण्याची नवी दृष्टी मिळते. दिवसभरातील सर्व घडामोडींची नोंद आपण रोजनिशीमध्ये रोज रात्री झोपण्यापूर्वी करत असतो. रोजनिशी कशी लिहितात हे विद्यार्थ्यांना समजावे, त्यांनी रोजनिशी लिहावी हे या पाठामागचे प्रयोजन आहे. वैभवच्या रोजनिशीचे चौथे पान रिकामे आहे.

शाळेतून तुम्ही घरी आला आहात. शाळेत खूप धमाल झाली आहे. तुम्हांला हे कोणालातरी सांगायचे आहे; पण घरी कोणीच नाही. अशा वेळी तुम्ही काय कराल?

वैभवला एक नवीन छंद जडला आहे. तो नियमितपणे रोजनिशी लिहितो. त्याने लिहिलेली तीन दिवसांची रोजनिशी वाचूया.

**१५ नोव्हेंबर**

शाळेजवळच्या बस स्टॉपवरून संध्याकाळी साडे पाच वाजता बसमध्ये चढलो. एक आजोबा आणि त्यांची लहानगी नात यांच्याजवळ मला जागा मिळाली. कंडक्टरने माझा पास बघितला व आजोबांकडे तिकिटाचे पैसे मागू लागला. आजोबांनी खिशात हात घातला; पण त्यांच्या हाताला पैशाचे पाकीट लागेना. कंडक्टर म्हणाला, "अहो आजोबा! लवकर पैसे काढा." आजोबा म्हणाले, ''बापरे! पैशांचे पाकीट बसस्टॉपवर कुणीतरी मारले वाटते. घरून निघताना मी ते खिशात टाकले होते." कंडक्टर म्हणाला, "त्याला मी काय करू? तुम्हांला नीट सांभाळता येत नाही. चला पुढल्या स्टॉपवर उतरून जा." चिडलेल्या आवाजातील संवाद ऐकून नात जोराने रडू लागली. आजोबाही कावरेबावरे झाले. मी दप्तराच्या खिशात हात घालून माझे खाऊचे पैसे काढले, त्या पैशांतून आजोबांचे व त्या मुलीचे तिकीट काढले. माझ्याजवळचा बिस्किटाचा पुडा छोटीला दिला. तिने डोळे पुसले. ती खुदकन हसली.

**१६ नोव्हेंबर**

शाळेच्या सहलीबरोबर 'नागझरी' ला गेलो होतो. रस्त्यात एक शिवार लागले. शिवारातील कणसे, ओंब्या पाहिल्या. तेथे हरभऱ्याचे डहाळे लागले होते. ते पाहून आमच्या तोंडाला पाणी सुटले. शेतात घुसलो आणि डहाळे उपटू लागलो. तेवढ्यात तिकडून कोणीतरी जोरात ओरडले.

शेतकऱ्याच्या परवानगीशिवाय आम्ही डहाळे उपटले, हे पाहून गुरुजी आमच्यावर खूप रागावले. आम्ही त्या शेतकऱ्याची माफी मागितली. खरंच, आमचं चुकलंच होतं. शिवार फिरून झाल्यावर परतताना मात्र त्या शेतकऱ्याने आम्हां सर्व मुलांना हरभऱ्याचे थोडेसे डहाळेही दिले.



**१७ नोव्हेंबर**

आज वर्गातील आठ-दहा मुलांना मुख्याध्यापकांनी विशेष कामासाठी बोलावले होते. आम्ही खाली रांगेत जाताना राजूने मला जोरात ढकलले. त्याला सर्वांत पुढे उभे राहायचे होते आणि मलासुद्धा. आमच्या दोघांमध्ये वादावादी सुरू झाली. तेवढ्यात आमचे सर आले. त्यांनी दोघांनाही वर्गात बोलावले.

वर्गात गेल्यावर आम्हां दोघांनाही सर खूप रागावले अन् म्हणाले, ''रांगेत सर्वांत पुढे राहण्यासाठी भांडता? त्यापेक्षा सगळ्या कामांत सर्वांत पुढे कसे राहाल याकडे लक्ष द्या.'' आम्ही दोघेही खाली मान घालून वर्गात बसलो. क्षुल्लक भांडणामुळेच मुख्याध्यापकांकडून मिळणारी विशेष कामाची आमची संधी हुकली होती, म्हणून मला सारखे वाईट वाटत राहिले.



**१८ नोव्हेंबर**

आज माझा वाढदिवस होता. खूप मजा आली. ........

## स्वाध्याय



**प्र. १. तीन-चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) वैभवच्या रोजनिशीतील कोणते पान तुम्हांला सर्वांत जास्त आवडले ते लिहा.

(आ) रोजनिशी का लिहावी? तुमच्या शब्दांत लिहा.

**प्र. २. का ते लिहा.**

(१) आजोबांची नात जोराने रडू लागली.

(२) वैभवने आजोबा व त्यांच्या नातीचे तिकीट काढले.

(३) आजोबांची नात खुदकन हसली.

(४) मुलांनी शेतकऱ्यांची माफी मागितली.

(५) शेतकऱ्याने मुलांना थोडेसे डहाळे दिले.

(६) वैभवची विशेष काम करण्याची संधी हुकली.

प्र. ३. तुम्ही महिन्यातील पहिल्या आठवड्याची रोजनिशी लिहा व ती दुसऱ्या महिन्याच्या पहिल्या आठवड्यात वाचा. तुम्हांला काही आठवते का ते सांगा.

## खेळूया शब्दांशी.

(अ) खालील वाक्प्रचारांचा वाक्यांत उपयोग करा.

(१) कावरेबावरे होणे.
(२) तोंडाला पाणी सुटणे.
(३) वादावादी होणे.
(४) खाली मान घालणे.

(आ) हरभऱ्याचा डहाळा तसे खालील गोष्टींसाठी काय म्हणतात ते लिहा.

(१) गहू
(२) लसूण
(३) ज्वारी
(४) चिंच
(५) ऊस

प्र. ४. हरभऱ्याचे डहाळे पाहून मुलांच्या तोंडाला पाणी सुटले. शिवार वा शेतातून जाताना कोणत्या वस्तू पाहिल्यावर तुमच्या तोंडाला पाणी सुटते ? त्या वस्तूंची यादी करा.

प्र. ५. वैभवची शाळा सुटल्यापासून तो घरी पोहोचेपर्यंत कोणकोणत्या घटना घडल्या ते क्रमवार लिहा.
उदा., शाळा सुटल्यावर बसस्टॉपवर पोहोचणे.

प्र. ६. तुमचे मुख्याध्यापक किंवा वर्गशिक्षक कोणकोणती विशेष कामे तुम्हांला सांगतात? त्या कामांची यादी करा.

प्र. ७. वर्गात तुमचे काही चुकले असेल आणि ते तुम्हांला पटले असेल, त्यावेळी तुमच्या मनात कोणते विचार येतात? तुमचा अनुभव सात–आठ ओळींत लिहा.

प्र. ८. खालील गोष्टींसाठी केल्या जाणाऱ्या क्रियांना काय म्हणतात ते लिहा.

उदा., डहाळे - उपटणे

(१) ज्वारीचे कणीस
(२) भेंडी, मिरच्या
(३) रताळी, बटाटे
(४) बाजरीचे कणीस
(५) ऊस

प्र. ९. खालील घटना घडल्या हे पाठातील कोणत्या वाक्यांवरून समजते ?

(१) वैभवची शाळा पाच वाजता सुटते.
(२) आजोबांची नात खूप घाबरली.
(३) सहलीला गेलेल्या मुलांना हरभरा आवडतो.
(४) सहलीतील मुलांना त्यांची चूक समजली.

# २५ नवा पैलू

BNK2P8

**प्रतिभा पानट**–(जन्म–१९४२) अमरावती येथील श्री बुलिदान राठी मूक-बधिर विद्यालयामध्ये शिक्षिका म्हणून कार्यरत होत्या. मूक-बधिर व अपंग यांच्या समस्यांची उकल करणाऱ्या अनेक कथा, लेख प्रसिद्ध.


बोलू व ऐकू न शकणाऱ्या मुलांची योग्य वेळी तपासणी करून, त्यावर उपचार केल्यास ती मुले ऐकू-बोलू शकतात. त्यासाठी 'शाळा' हा एक चांगला उपाय आहे, हे या कथेतून सांगितले आहे.

आजी आपल्या चार-पाच वर्षांच्या नातवाला घेऊन बसमधून उतरल्या. आभाळ अगदी गच्च भरून आलेले होते. क्षणभरातच पाऊस कोसळणार असे दिसत होते. स्टँडपासून दवाखाना अगदी जवळ असल्याने आजी नातवाला घेऊन चालत निघाली. आजीचा नातू दिगू आजूबाजूला पाहत हळूहळू चालत होता.

''चल रे बाबा लवकर लवकर. पाऊस सुरू व्हायच्या आत पोहोचलं पाहिजे दवाखान्यात.'' आजी दिगूला म्हणाली. पण.... ! 'त्याला सांगून काय उपयोग ? ऐकू कुठं येतंय त्याला ? आजी खंत करत पुटपुटली आणि स्वतःशीच पुटपुटत पुढे चालू लागली.

दवाखान्याच्या बंद दाराकडे आजीचे लक्ष गेले. आता कुठे थांबणार ? आजी विचारात पडली. एवढ्यात रिक्षाचा जोराचा आवाज ऐकू आला. तिने मागे वळून पाहिले, तर रिक्षाच्या समोर दिगू उभा होता आणि रिक्षावाला त्याला काहीतरी बोलत होता, ''अरे पोरा, केव्हाचा आवाज देतोय; पण ढिम्म हालत नाही ! बहिरा आहे की काय ?'' रिक्षावाल्याचे बोलणे ऐकून आजीच्या डोळ्यांत चटकन पाणी आले.

ज्या दिवशी दिगू बहिरा आहे असे लक्षात आले, त्या दिवसापासून त्याचे घरदार सर्व काळजीत पडले



आहे. आता गावातल्या लोकांच्या सांगण्यावरून आजी त्याला घेऊन वेड्या आशेने शहराच्या डॉक्टरकडे आली होती. दवाखाना बंद होता. बाहेर मुसळधार पाऊस. तशीच दिङ्मूढ होऊन ती भिंतीच्या आडोशाला थांबून राहिली. इतक्यात एक तरुण मुलगी 'वत्सला' आजीच्या शेजारी येऊन उभी राहिली. आजी शहराच्या डॉक्टरबद्दल स्वतःशीच बोलत होती. ते सारे वत्सलेने ऐकले होते. रिक्षावाल्याने दिगूला हटकले होते, तेही तिने पाहिले होते. काहीतरी मनाशी ठरवून ती आजींना म्हणाली,

''कोणत्या गावाला जायचं आजी? पाऊस तर फार पडतोय.''

''कोण ग बाई तू ?''

''माझं नाव वत्सला आहे. शिक्षिका आहे मी.'' वत्सला म्हणाली.

''अस्सं होय ? मला वाटलं, तू एखादी डॉक्टरच आहेस. ज्याच्यासाठी मी शहराला आले होते, तो दवाखाना बंद आहे. काय करावं कळेनासं झालंय बघ.'' आजी बोलली.

''एवढ्या पावसात कुठे जाता ? या वादळात झाडंबिडं रस्त्यात पडतात. आजी, त्यापेक्षा माझ्या घरी चला.''

''नको, घरी या पोराची आई वाट पाहील.''

''पाहू द्या. आजची रात्र माझ्याकडे राहा. उद्या मी तुम्हांला जे काय दाखवीन ते पाहून हसत घरी जाल.'' वत्सलाने आजीला मोहात पाडले.

आजी थोडीशी विचारात पडली आणि मनाशी काहीतरी ठरवून म्हणाली, ''अस्सं होय ? हसणं मिळणार असेल तर तुझ्या घरी येते मी. गेली पाच वर्षे झालीत, हसणं विसरलो आम्ही !''


पाऊस ओसरल्यावर आजी, दिगू वत्सलाच्या घरी गेले. जेवणे झाली. गप्पा मारणे सुरू झाले.

वत्सला ही मूक-बधिर मुलांच्या शाळेत शिक्षिका होती. अत्यंत आनंदी, हसऱ्या स्वभावाची.

तिने विचार केला, की बोलकी मुले शिकतात, हसतात, खेळतात, आनंदी जीवन जगतात. त्यांना कोणीही शिकवील; पण ज्यांच्या वाट्याला बहिरेपणाचे, मुकेपणाचे दुःख आले आहे, त्यांना कोण शिकवणार, कोण सुखावणार, त्या मूक कळ्या कोण उमलवणार ?

त्यांच्यातील स्वत्व जागवून त्यांच्या चेहऱ्यावर अभिमानाचे, विश्वासाचे हास्य फुलवायचे, हा पक्का निर्धार करूनच ती मूक-बधिर मुलांच्या शाळेत शिक्षिकेचे काम करत होती.

आजीशी गप्पा मारत तिने त्यांची सर्व माहिती काढून घेतली.



आजीपण कितीतरी दिवसांनी असे मनमोकळे बोलायला मिळाल्यागत बोलत होती.

''आमच्याकडे कोणीच असं मूक-बधिर नाही पोरी. त्यामुळे आम्हांला फार धक्का बसला.'' आजी हळहळली. वत्सलाला खूप वाईट वाटले.

''ऐकू येत नाही म्हणजे सारे संपले असे नाही. शहरात त्याच्या कानांची तपासणी करून त्याचा श्रवणऱ्हास वेळीच पाहिला असता, त्यानुसार श्रवणयंत्र दिले असते, तर आतापर्यंत तो ऐकू-बोलू शकला असता. किती लवकर हे व्हायला पाहिजे होते. मुलांची पहिली पाच वर्षे म्हणजे भाषा शिकण्याचे वय.'' वत्सला म्हणाली.

दुसऱ्या दिवशी आजीबाईंना घेऊन वत्सला शाळेत आली. मुक्या मुलांची शाळा असते, हे पाहून आजीला आश्चर्य वाटले. हेडफोन्स लावून बसलेली मुले, माईकमधून शिकवणाऱ्या बाई, हे सगळे आजीला नवलच वाटत होते.

शाळेतील एक बाई एका छोट्या मुलाला यंत्राच्या साहाय्याने गोष्ट शिकवत होत्या, हे वत्सलाने आजीला दाखवले.

आजी उत्सुकतेने बघत होत्या. बहिऱ्या मुलाच्या तोंडून बाहेर पडलेले उच्चार टिपायला त्यांचे कान सावध झाले होते आणि मूल बाईंसारखेच हसत हसत बोलले तेव्हातर आजींच्या अंगभर आनंदलहरी उसळल्या.

आजी खूपच उल्हसित झाल्या. वत्सला त्यांना यंत्राची माहिती करून देत होती, ''यंत्रामुळे बहिऱ्या मुलाला आवाज ऐकू येतो. आवाज आल्याच्या आनंदाने ते मूल आपल्या चेहऱ्याकडे पाहते, आपल्या ओठांच्या हालचाली पाहते व तसे बोलण्याचा प्रयत्न करते.''

तिने त्यांना हिअरिंग एड्स दाखवले. इंडक्शन लूप सिस्टीमची खोली दाखवली अन् हळूच आजीला विचारले, ''काय आजी, मग दिगूला ठेवायचं का आमच्या शाळेत ?''

आजी खुदकन हसली अन् म्हणाली, ''होय गं, माझा दिगू येऊ दे तुमच्या शाळेत.''

''पण....'' असे पुटपुटत आजी एका वेगळ्या स्वप्नात हरवली.

आजीला नातवाच्या दुःखावरून सर्वच मुक्यांच्या दुःखाची जाणीव झाली होती. तिच्या मनात विचार आला, 'आपल्याही खेड्यात अशी मूक-बधिर शाळा काढली तर.... !'

मनाशी काहीतरी ठरवून आजी म्हणाली, ''पोरी, माझ्या गावी अशी शाळा काढून देशील ?''

''आजी, शाळा काढायची म्हणजे जागा पाहिजे, पैसा पाहिजे. यंत्रे किती महाग ?'' वत्सला म्हणाली.

''वत्सलाबाई, आम्ही खेड्यातले लोक शिक्षणानं अडाणी राहिलो; पण कष्टानं आम्ही शेती खूप जमवली. एक शेत विकलं, तर लाखाला जाईल.'' आजी म्हणाली.

आता मात्र वत्सला थक्क होऊन ऐकत होती.

''म्हणजे शेत विकून एवढा पैसा देणार तुम्ही मुक्यांच्या शाळेला ?''

''हो देणार ! अगंबाई, माझ्या गावची मुलं शाळेत जातील, शिकतील, त्यांना वळण लागेल. स्वतःच्या पायांवर उभी राहतील.''

आजीने या मूक-बधिरांसाठी काही करण्याचे ठरवले आणि तिने तसे बोलून दाखवले. आजीच्या विचारातील या नव्या पैलूचे दर्शन होताच वत्सलाचे अंतःकरण भरून आले. ती म्हणाली, ''आजी, मी म्हटलं होतं ना, उद्या मी जे दाखवीन. ते पाहून तुम्ही हसत घरी जाल म्हणून !''

''होय गं वत्सला, त्या कालच्या पावसाने माझ्यावर फार उपकार केले. मी शहरातल्या डॉक्टरकडे निघाले होते. तुझ्या रूपात मला डॉक्टरच भेटला बघ.'' आजी हसू लागल्या. आजीच्या उत्तराने वत्सलाही आनंदित झाली. तिलाही हसू आले.

कालपासून ही आपल्या आईसारखी दिसणारी बाई हसतेय, आजी हसतेय हे पाहून कसे का होईना दिगूच्या चेहऱ्यावर हसू उमटले !

## स्वाध्याय



**प्र. १. तीन-चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) आजी नातवाला लवकर चल, म्हणून घाई का करत होती ?

(आ) रिक्षावाल्याच्या बोलण्याने आजीच्या डोळ्यांत पाणी का आले ?

(इ) वत्सलाबाईंनी आजीला घरी येण्याचा आग्रह का केला ?

(ई) शाळेत गेल्यावर आजीला आनंद का झाला ?

(उ) मूक-बधिरांची शाळा पाहून आजीच्या मनात कोणते विचार आले ?

**प्र. २. का ते लिहा.**

(१) आजी शहरात गेली.

(२) आजी वत्सलाबाईंच्या घरी गेली.

(३) आजीने गावात शाळा काढायचे ठरवले.

(४) वत्सलेने आजीला शाळेत नेले.

**प्र. ३. थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) वत्सलाबद्दल पाच ते सहा ओळी लिहा.

(२) या पाठाला 'नवा पैलू' हे शीर्षक आहे ते योग्य कसे ते थोडक्यात लिहा.

(३) आजीच्या थोर विचारांबाबत पाच ते सात ओळी लिहा.

**प्र. ४. खालील वाक्प्रचारांचा वाक्यांत उपयोग करा.**

खंत वाटणे, दिङ्मूढ होणे, विश्वासाचे हास्य फुलणे, पक्का निर्धार करणे, धक्का बसणे, जाणीव होणे, थक्क होणे.

**प्र. ५. तुमच्या परिसरातील मूक-बधिरांच्या शाळेला भेट द्या. त्या मुलांशी संवाद साधा. ती मुले यंत्राचा वापर करून कसे शिक्षण घेतात हे जाणून घ्या.**

**उपक्रम :** वत्सलाबाई मूक बधिरांच्या शाळेत शिक्षिका म्हणून काम करतात म्हणजे त्या समाजसेवा करतात. तुमच्या परिसरातील अशा काम करणाऱ्या समाजसेवकांशी संवाद साधा. ते कोणते काम करतात त्याची माहिती घ्या.

### विचार करून सांगूया.



मुजावर रोजच्या सारखा शाळेला जात होता. काय झाले ते कळले नाही; पण मोटारसायकलवर जाणारा एक मनुष्य खाली पडला. त्याला उठता येत नव्हते. त्याच्या पायाला लागले होते, म्हणून तो कण्हत होता. डोक्याला मोठी जखम झाली होती. मुजावर एकटाच तेथे होता. त्याला काही सुचेना आता काय करावे? तुम्ही तरी सांगा..

# २६ संतवाणी

- ऐका. म्हणा. वाचा.

निंबा कडूपण देत असे कोण । युक्षा गोडपण कवण करी ।।१।।
बीज तैसे फळ गोडीचा निवाडा । हा अर्थ उघडा दिसतसे ।।२।।
इंद्रवनामुळी कोण घाली विष । अमृत आम्रास देत कवण ।।३।।
बचनागाआंगी विष कोण लावी । सुगंधता द्यावी नलगे पुष्पा ।।४।।
तीक्ष्ण मोइरी करितसे कोण । खारीक निर्माण मधुर का हो ।।५।।
बहेणि म्हणे बीजाऐसे येते फळ । उत्तम वोंगळ परीक्षावे ।।६।।

**– संत बहिणाबाई**

रात्रंदिवस मन करी तळमळ । बहु हळहळ वाटे जीवा ।।१।।
काय करूं आतां पाउलें न दिसती । पडिलीसे गुंती न सुटे गळें ।।२।।
बहु हा उबग आला संसाराचा । तोडा फांसा याचा मायबापा ।।३।।
निर्मळा म्हणे आतां दुजेपण । चोखियाची आण तुम्हां असे ।।४।।

**– संत निर्मळा**

जैसी हरळांमाजि रत्नकिळा । कि रत्नांमाजि हिरा निळा ।
तैसी भासांमाजि चोखळा । भासा मराठी ॥१॥
जैसी पुस्पांमाजि पुस्प मोगरी । कि परिमळांमाजि कस्तुरि ।
तैसी भासांमाजि साजिरी । मराठिया ॥२॥
पखिआंमधें मयोरु । व्रुखिआंमधें कल्पतरु ।
भासांमधें मानु थोरु । मराठियेसि ॥३॥
तारांमधें बारा रासी । सप्त वारांमाजि रवी ससी ।
यां दीपिचेआं भासांमधें तैसी । बोली मराठिया ॥४॥

**– फादर थॉमस स्टीफन्स**

# शब्दार्थ

**शिक्षकांसाठी :** या पाठ्यपुस्तकातील प्रत्येक पाठात आलेले कठीण शब्द व वाक्प्रचार यांचे अर्थ खाली दिलेले आहेत. इयत्ता तिसरीमध्ये विद्यार्थ्यांनी शब्दकोश कसा पाहावा, तयार करावा हे अभ्यासलेले आहे. त्याप्रमाणे खाली दिलेले शब्दार्थ व वाक्प्रचार यांची मांडणी शब्दकोशाप्रमाणे वहीत करायला सांगावी.

अध्ययन-अध्यापनामध्ये आलेल्या कठीण शब्दांची भर घालून त्यांचे अर्थ मिळवून विद्यार्थ्यांना 'माझा शब्दकोश' तयार करण्यास सांगावा.

### ◈ सायकल म्हणते, मी आहे ना!

**रखडत चालणे** – रेंगाळत चालणे. **किंमत माफक असणे** – किंमत यथायोग्य, बेताची असणे. **धडा शिकणे** – नियम, शिस्त शिकणे. **परवाना काढणे** – परवानगी काढणे. **मेद** – चरबी. **चलन** – पैसे. **हातभार लावणे** – मदत करणे.

### ◈ डॉ. कलाम यांचे बालपण

**दुर्मीळ** – दुर्लभ, मिळण्यास कठीण. **वितरक** – वितरण करणारा. **रस असणे** – आवड असणे. **एक खांबी तंबू असणे** – सर्व जबाबदारी, भार एकावर असणे. **दृश्य परिणाम जाणवणे** – प्रत्यक्ष परिणाम जाणवणे. **नि:संशय** – शंका नसणे. **आंतरिक शक्ती** – आतील उर्मी. **सर्जनशीलता** – नवनिर्मिती. **ओढेवेढे घेणे** – हो, नाही म्हणणे.

### ◈ गवतफुला रे! गवतफुला! (कविता)

**नभ** – आकाश. **हरखून जाणे**– आनंदून जाणे. **रेशिम-पाती** – मऊ पाने. **गोजिरवाणी** – सुंदर, सुरेख. **पराग** – फुलांतील कण. **तळी** – खालची. **भान हरपणे** – स्वत:ला विसरून जाणे. **झगमगणे** – चमकणे.

### ◈ बाकी वीस रुपयांचं काय?

**नाराजी व्यक्त करणे** – नाराज होणे.

**वावर** – येणे-जाणे असणे. **नित्याचा** – नेहमीचा. **आवाहन करणे** – विनंती करणे. **भुकेने व्याकूळ होणे** – खूप भूक लागणे. **हायसे वाटणे** – आश्चर्य वाटणे. **भारी कौतुक** – खूप कौतुक. **अनुभवशून्य** – अनुभव नसलेला. **निरुत्तर होणे** – उत्तर देता न येणे.

### ◈ पण थोडा उशीर झाला...

**सेवा बजावणे** – कर्तव्य बजावणे. **प्रतिकूल** – अनुकूल नसणे. **आठवणींना उजाळा देणे** – जुन्या आठवणी जाग्या होणे. **जीव तीळ तीळ तुटणे** – अतिशय काळजी वाटणे. **उर अभिमानाने फुलून येणे** – खूप अभिमान वाटणे. **अंतरंगाचा ठाव घेणे** – मनाचा ठाव घेणे. **सैरभैर होणे** – मन अस्थिर होणे, गोंधळणे. **मन हेलावणे** – दु:ख होणे. **तळवट** – अनेक पोती एकाला एक जोडून शिवलेले, अंथरण्याचे साधन. **कानोसा घेणे** – अंदाज घेणे.

### ◈ आपले परमवीर

**वज्र** – शस्त्र. **मरणोत्तर** – मृत्यूनंतर. **प्राणांची आहुती देणे** – प्राणाचा त्याग करणे. **अस्थी** – हाडे. **घोंगावणे** – आवाज करत फिरणे. **वेध घेणे** – अचूक मारणे. **निर्धार** – निश्चय. **सामोरे जाणे** – संकटांना तोंड देणे.

### ◈ माय (कविता)

**तव्हा** – तेव्हा. **माही** – माझी. **फनकाट्या** –

जळणाची लाकडे. **अनवाणी** - पायात वहाणा नसणे. **जव्हा** - जेव्हा. **खाय** - खाणे. **टुमणे लावणे** - सतत मागणी करणे. **रुमणं** - नांगर, तिफण, कोळपे इत्यादींचा दांडा, मूठ. **हाये** - आहे. **आन** - शपथ. **कान भरणे** - उलट सुलट सांगणे. **डोयात** - डोळ्यांत. **तुहे** - तुझे. **शिक्शन** - शिक्षण. **माया** - प्रेम, जिव्हाळा.

## वारली चित्रकला

**नागरी संस्कृती** - नगराची संस्कृती. **मृण्मूर्ती** - मातीच्या मूर्ती. **पाषाणमूर्ती** - दगडाच्या मूर्ती. **आदिम** - मूळचा, पहिला. **भित्तिचित्रे** - भिंतीवरील चित्रे. **अप्रतिम** - अति सुंदर. **पाचारण करणे**- विनंती करणे. **चितारणे** - रेखाटणे. **मोहर उमटणे** - ठसा उमटणे. **धवलेरी** -ज्यांचे पती हयात नाहीत अशा वारली समाजातील महिला.

## सुगंधी सृष्टी

**मोहरणे** - बहरणे. **उत्कट आतूर भासणे** - अतिशय उत्सुकता वाटणे. **निरुपाय** - उपाय नसणे. **आनंदात अभिमानाची साखर पडणे** - अधिक आनंद होणे. **टिपून मारणे** - लक्षपूर्वक एक एक करून मारणे. **निरिच्छ** - कोणतीही इच्छा व्यक्त न करणे.

## माझ्या आज्यानं पंज्यानं (कविता)

**येसणी** - बैलांच्या नाकातून ओवलेली दोरी. **मातले गोरपे** - न ऐकणारे बैल. **इनल्या** - विणल्या. **तवा** - तेव्हा. **नेमानं** - नियमाने. **चऱ्हाट** - दोर, जाड दोरखंड. **बाजा** - काथ्याच्या दोरीने विणून बसण्यासाठी बनवलेली खाट. **रेघाळ्या** - घामाने भिजलेला मनुष्य. **काण्या** - गुरांना बांधण्यासाठी वापरले जाणारे दावे, दोरी. **दुभती म्हैस** - भरपूर दूध देणारी म्हैस. **दावण्या**- अनेक दावी बांधलेली आहेत असा दोर. **सोनियाचा** - सोन्यासारखा.

## भाषेचे नमुने

### १. वऱ्हाडी बोली

**च्या** - चहा. **काहाले** - कशाला. **धाळलं** - धाडणे. **न्हानोरा** - नवरदेव, नवरीला स्नान घालण्याचा एक लग्न विधी. **गुतून पळल्या** - गुंतून पडणे. **सकाऊनच** - सकाळीच. **गळ्याले** - गडी. **आगावर** - अंगावर. **नोका** - नको. **सती** - सारखे. **गुयाचा** - गुळाचा. **अळकित्ता** - अडकित्ता, सुपारी कापण्याचे एक हत्यार. **बयना** - बाई. **मावदातून** - घराच्या अंतर्भागातील खोलीतून. **डाबलं** - लहान डबी, कुंकवाचा करंडा. **कपाई** - कपाळी. **आखीन येकडाव** - आणखी एकदा. **निरा** - सारखी. **कलकल** - गोंधळ. **नासाचा धूस** - नासधूस, उधळपट्टी. **गोळ** - गोड. **निपूर** - गरज.

### २. मराठवाडी बोली

**बसलते** - बसले होते. **झोपलता** - झोपला होता. **गप्पमन्** - एकदम. **घेटले** - घेतले. **पाजीवलाले** - पाजू लागले. **घिवून** - घेऊन. **आंगी** - अंगातला सदरा. **यिवलालतं** - येऊ लागलं. **रडलाल्याला** - रडू लागलेला. **पाजिवलेव** - पाजवले. **अई** - आई. **त्येला** - त्याला. **बाहीर** - बाहेर.

## मला मोठ्ठं व्हायचंय!

**आकाशाला गवसणी घालणे** - अशक्य गोष्ट करावयास धजणे. **अनंत अडचणी** - अनेक अडचणी. **निश्चय दांडगा असणे** - पक्का निर्धार असणे.

## आपली सुरक्षा, आपले उपाय!

**आच्छादित** - पसरलेले, आच्छादलेले. **आटोक्यात आणणे** - नियंत्रित करणे. **आपत्कालीन** - कठीण वेळी, संकटाच्या वेळी. **व्यत्यय येणे** - अडथळा येणे.

## आतां उजाडेल! (कविता)

**खिन्न** - दु:खी. **कलाबूत**- चांदीची अथवा सोन्याची जर, रेशमी दोरा. **पालवले** - पसरणे. **दहिंवर** - दंव. **महादान** - सर्वात मोठे दान. **ज्योतिर्मय** - प्रकाशमान होणे.

## बालसभा

**प्रतिमा** – छायाचित्र. **हातभार लावणे** – मदत करणे. **आस्था** – आवड, आपुलकी. **विचारांचा पगडा** – विचारांचा प्रभाव. **प्रेरित होणे** – प्रेरणा मिळणे, प्रोत्साहित होणे.

## सफर मेट्रोची

**सफर** – प्रवास. **सारथी** – चालक. **अविस्मरणीय** – कायम आठवणीत राहणारे. **धाकधूक होणे** – भीती वाटणे.

## दुखणं बोटभर

**चिंधी** – जुन्या फाटक्या कापडाचा तुकडा. **मथितार्थ** – सारांश. **हैराण करणे** – वैतागून सोडणे. **वर्मी बसणे**– नाजुक, दुखऱ्या भागावर घाव बसणे. **मर्मज्ञान** – सुप्त, कुशल ज्ञान. **आश्चर्याने तोंडात बोटे घालणे** – खूप नवल वाटणे. **हात कपाळाला लावणे** – वैतागणे. **बुडत्याला काडीचा आधार** – अडचणीच्या काळात मदत करणे. **रागानं हुप्प होणे** – गप्प बसणे. **मस्का मारणे** – पुढे पुढे करणे. **मन हलकं होणे** – बरे वाटणे. **भ्रमनिरास होणे**– अपेक्षाभंग होणे. **अवसान गोळा करणे** – शक्ती एकवटणे. **कामाचा बट्ट्याबोळ होणे** – कामात अडचणी निर्माण होणे. **मुंगीच्या पावलांनी बरं होणे** – हळूहळू बरे वाटणे.

## बहुमोल जीवन (कविता)

**भोगावे लागणे** – सोसणे. **सकला** – सर्वांना. **बोटे मोडणे** – दोष देणे. **लतिका** – वेल. **देह** – शरीर. **नभ** – आकाश. **घन** – ढग. **अवस** – अमावस्या. **लीलया भिडणे** – सहजपणे करणे. **बहुमोल जीवन** – मौल्यवान जीवन.

## मले बाजाराला जायाचं बाई!

**सम्दं** – सगळं. **म्हंजी** – म्हणजे. **न्हाई** – नाही. **डोल्यातून** – डोळ्यांतून. **आक्रीत घडणे** – विचित्र घडणे. **खंडीभर** – खूप जास्त.

## ओळख थोरांची

**श्रीगणेशा होणे** – सुरुवात होणे. **चीत करणे** – पाठीवर उताणे पाडणे, हरवणे. **धडे आत्मसात करणे** – शिकणे. **तमा न बाळगणे** – फिकीर, काळजी न करणे. **साधना करणे** – मिळवणे.

## या काळाच्या भाळावरती (कविता)

**भाळ** – कपाळ. **झळा** – उष्ण वाऱ्याची धग, झुळूक. **पाणकळा** – पावसाच्या धारा. **फत्तरे** –दगड. **उषा** – पहाट, सकाळ. **करणी** – कर्मातून, कामातून. **शिळा** – मोठे दगड.

## वडिलांस पत्र

**उमगणे –** समजणे. **गुप्त खलबते** – गूढ चर्चा.

## परिवर्तन विचारांचे

**हिरमुसणे** – निराश होणे. **कपाळावर आठ्या पसरणे** – अतिशय त्रासणे. **मन खट्टू होणे** – वाईट वाटणे, धाकधूक वाटणे. **उत्साह ओसांडून वाहणे** – खूप आनंद होणे. **कावराबावरा होणे** – भयभीत होणे, गोंधळणे. **डोक्यात लख्ख प्रकाश पडणे** – समजणे, कळून येणे, उमजणे. **परिवर्तन** – बदल.

## रोजनिशी

**शिवार** – गावाचा परिसर. **ओंब्या** – गव्हाचे कणीस. **डहाळे** – हरभऱ्याच्या झाडाच्या फांद्या.

## नवा पैलू

**खंत करणे** – झुरणे, एकसारखे आठवत राहणे.
**पुटपुटणे** – स्वत:शी बोलणे.
**दिङ्मूढ होणे** – अचंबित होणे, चकित होणे.
**मोहात पाडणे** – भुरळ पाडणे, प्रेमात पाडणे.
**पक्का निर्धार करणे** – पक्का निश्चय करणे.
**थक्क होणे** – आश्चर्यचकित होणे.

***

# इयत्ता ९ ली ते १२ वी ई-लर्निंग साहित्य

## मराठी, इंग्रजी माध्यमांमध्ये उपलब्ध

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ

ebalbharati

वैशिष्ट्ये

- विषय योजनेनुसार निर्धारित करण्यात आलेल्या विषयांचा समावेश.
- पाठ्यपुस्तकावर आधारित परिपूर्ण ई-लर्निंग साहित्य.
- दृक-श्राव्य स्वरूपात.
- पाठनिहाय आशयाचे सादरीकरण व आवश्यकतेनुसार प्रश्नांचा समावेश.
- विविध कृती, चित्रे, आकृत्या इत्यादींचा समावेश.
- सहज व सोप्या अध्ययनासाठी ॲनिमेशनचा वापर.
- स्वाध्यायांचा समावेश.

पाठ्यपुस्तक मंडळ, बालभारती मार्फत इयत्ता १ ली ते १२ वी च्या मराठी व इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांसाठी ई-लर्निंग साहित्य (Audio-Visual) उपलब्ध करून देण्यात येत आहे.

ई-लर्निंग साहित्य घेण्यासाठी....

- वरील Q.R.Code स्कॅन करून ई-लर्निंग साहित्य मागणीसाठी नोंदणी करा.
- Google play store वरून ebalbharati app डाऊनलोड करून ई लर्निंग साहित्यासाठी मागणी नोंदवा.
- पाठ्यपुस्तक मंडळाच्या www.ebalbharati.in, www.balbharati.in या संकेतस्थळांवर भेट द्या.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

बालभारती इयत्ता ६ वी (मराठी)

₹ ४६.००